सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २१ फेब्रुवारी २०२५ | युगाब्द ५१२६ | वर्ष ४१ वे अंक १०५ | पाने १२ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## महत्त्वाचे

### मध्यप्रदेशात 'छावा' चित्रपट करमुक्त



**जबलपूर :** विकी कौशलचा 'छावा' चित्रपट मध्यप्रदेशात करमुक्त होणार आहे. शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त प्रदर्शित होणारा हा चित्रपट संपूर्ण राज्यात करमुक्त करण्याची घोषणा मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी केली. मुख्यमंत्री डॉ. यादव यांनी जबलपूर येथील स्टेडियमच्या उद्घाटन कार्यक्रमात ही घोषणा केली. ते म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराजांनी त्यांच्या आयुष्यात सर्व छळ सहन केले आणि राष्ट्र तसेचधर्मासाठी आपले जीवन अर्पण केले. छावा हा चित्रपट एक ऐतिहासिक चित्रपट आहे. हा चित्रपट देशभक्तीचा संदेश देतो. शिवाजी महाराजांचे सुपुत्र संभाजी महाराज यांच्या देशभक्तीबद्दल आणि त्यांच्या जीवनातील विविध महत्त्वाच्या घटनांबद्दल नागरिकांना जाणीव करून देण्यासाठी, हा चित्रपट मध्यप्रदेशात करमुक्त असेल.

### धनंजय मुंडे यांना 'बेल्स पाल्सी' आजार

**बीड :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडामुळे अडचणीत सापडलेले राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांना बेल्स पाल्सी नामक आजार झाला आहे. त्यांनी स्वतःच एका पोस्टद्वारे ही माहिती दिली आहे. या आजारामुळे मला साधे २ मिनिटेही व्यवस्थित बोलता येत नाही. त्यामुळे मला कॅबिनेट व पक्षाच्या जनता दरबाराला उपस्थित राहता येत नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या पक्षाच्या सर्वच मंत्र्यांना व आमदारांना आपापल्या मतदारसंघातील जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी जनता दरबार घेण्याचे आदेश दिलेत. पण मंत्री मुंडे यांनी मागील ६ आठवड्यांपासून एकदाही हा जनता दरबार घेतला नाही. त्यामुळे त्यांनी पवारांच्या आदेशाला केराची टोपली दाखवल्याची चर्चा सुरू आहे.

# आजपासून दिल्लीत अ. भा. मराठी साहित्य संमेलन

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन

**नवी दिल्ली, २० फेब्रुवारी**

सरहद पुणे आयोजित ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला शुक्रवारपासून राजधानी दिल्लीत प्रारंभ होत आहे. तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी साहित्य संमेलनाचे उद्घाटन दोन सत्रात होणार आहे. संमेलनाचे औपचारिक उद्घाटन शुक्रवारी दुपारी ३.३० वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विज्ञान भवनात होणार आहे. यावेळी संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, स्वागताध्यक्ष शरद पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत.





यानंतर उद्घाटनाचे दुसरे सत्र सायंकाळी ६.३० वाजता साहित्य संमेलन होणार असलेल्या तालकटोरा स्टेडियममध्ये होणार आहे. माजी केंद्रीय गृहमंत्री गृहमंत्री सुशीलकुमार शदे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सत्रात संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांचे अध्यक्षीय भाषण होईल. महाराष्ट्राचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यावेळी उपस्थित राहतील. मावळते संमेलनाध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांचेही यावेळी भाषण होणार आहे.

तत्पूर्वी, सकाळी ध्वजारोहण होणार असून, ग्रंथदिंडीही काढण्यात येणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष प्रा. उषा तांबे यांच्या हस्ते ग्रंथदिंडीला प्रारंभ होणार आहे. तालकटोरा स्टेडियममधील संमेलन स्थळाला छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरी असे नाव देण्यात आले असून, याठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यशवंतराव चव्हाण आणि महात्मा फुले अशा तीन महापुरुषांच्या नावांच्या सभामंडपात संमेलनाचे वेगवेगळे कार्यक्रम होणार आहे. साहित्यनगरीच्या प्रवेशद्वाराला अहल्याबाई होळकर यांचे नाव देण्यात आले आहे.

*(तभा वृत्तसेवा)*

### १२०० प्रतिनिधी दिल्लीत दाखल

संमेलनाची जय्यत तयारी झाली असून, पुण्यातून एका विशेष रेल्वेगाडीने १२०० प्रतिनिधी दिल्लीत दाखल झाले आहेत. सरहदचे संस्थापक संजय नहार यांच्या नेतृत्वात कार्यकर्ते संमेलनाच्या यशस्वीतेसाठी झटत आहे.

# कृषिमंत्री कोकाटे यांना दोन वर्षांची शिक्षा

### मंत्रिपद, आमदारकी जाण्याची शक्यता

**नाशिक, २० फेब्रुवारी-**

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांना येथील न्यायालयाने गुरुवारी दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे. यानंतर लगेच त्यांना जामीन मंजूर करण्यात आला. १९९५ मधील एका प्रकरणात त्यांना ही शिक्षा सुनावण्यात आली.



कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा आरोप त्यांच्यावर होता. न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे. या शिक्षेमुळे कोकाटेंच्या मंत्रिपद व आमदारकीवर टांगती तलवार आली आहे. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी १९९५ मध्ये माणिकराव कोकाटे यांच्या विरोधात सदनिकांच्या घोटाळ्यां संदर्भात याचिका दाखल केली होती. माणिकराव कोकाटे आणि त्यांच्या भावावर भादंविच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल झाला होता. २९ वर्षांनंतर या खटल्याचा आज नाशिक जिल्हा न्यायालयाने निकाल दिला. त्यानुसार माणिकराव कोकाटे आणि सुनील कोकाटे यांना दोन वर्षांचा कारावास तसेच ५० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. या सुनावणीत माणिकराव कोकाटे स्वतः जिल्हा न्यायालयात हजर होते. राजकीय कारकीर्दीला 'ब्रेक' लागण्याची शक्यता या प्रकरणामुळे माणिकराव कोकाटे अडचणीत आले आहेत. त्यांच्या आमदारकी आणि मंत्रिपदावर टांगती तलवार आहे. कारण, लोकप्रतिनिधीला दोन किंवा त्यापेक्षा जास्त वर्षांची शिक्षा झाल्यास त्याचे सभागृहाचे सदस्यत्त्व रद्द होते.






### भारताने विजयासह केली चॅम्पियन ट्रॉफीची सुरुवात...

**दुबई : गुरुवारी दुबईमध्ये भारतीय संघाने बांगलादेशचा ६ गडी राखून पराभव केला. भारताकडून शुभमन गिलने शतक झळकावले. आयसीसी स्पर्धेतील त्याचे हे पहिलेच शतक आहे. गोलंदाज मोहम्मद शमीने ५ विकेटस् घेतल्या.**

### एकनाथ शिंदे यांचे वाहन उडवून देण्याची धमकी

**मुंबई, २० फेब्रुवारी**

शिवसेनेचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची गाडी बॉम्बने उडवण्याची धमकी अज्ञात व्यक्तीकडून गोरेगाव पोलिसांना ई-मेलद्वारे देण्यात आली.



पोलिसांकडून ई-मेल पाठविणाऱ्यांचा शोध सुरू आहे. धमकीचा हा मेल मुंबईतल्या जवळपास सात ते आठ पोलिस ठाणी आणि इतर विभागांना आला आहे. बॉम्बस्फोट घडवून शिंदे यांचे वाहन उडवून देण्याची धमकी यात देण्यात आली.

या प्रकरणी अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सर्व तपास यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. गेल्या काही दिवसांपासून निनावी फोन आणि धमकी देण्याचे प्रकार वाढले आहेत. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या नावाचा उल्लेख करण्यात आल्याने पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला आहे. हा ई-मेल कोणी पाठवला, त्यामागे कोणाचा हात आहे, याची चौकशी सुरू आहे.

*(वृत्तसंस्था)*

### कृषी खात्यात ३०० कोटींचा भ्रष्टाचार : सुरेश धस

**बीड, २० फेब्रुवारी-**

धनंजय मुंडे कृषिमंत्री असताना खात्यात ३०० कोटींचा भ्रष्टाचार झाला. वाल्मीक कराडने निविदा ठरवल्या. महाराष्ट्रात ठराविक एजंटची नेमणूक केली, असा गंभीर आरोप गुरुवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये भाजप आमदार सुरेश धस यांनी केला.

धनंजय मुंडे अंजली दमानिया यांच्यावर अब्रू नुकसानीचा दावा करणार म्हणतात. मात्र, मी म्हणतो त्यांनी माझ्यावर खटला दाखल करावा, असे खुले आव्हानही त्यांनी दिले. मुंडे यांनी मूळ बाबी बदलून नॅनो युरिया, नॅनो डीएपीबाबत चर्चा केल्याचा आरोप धस यांनी केला आहे. याबाबतचा प्रस्ताव महाविकास आघाडीचे सरकार असताना मुंडे यांनी पाठवल्याचेही धस म्हणाले.

६ मार्च २०२३ रोजी मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यात मूळ बाबी बदलून नॅनो युरिया, नॅनो डीएपीबाबत चर्चा केली. १२ मार्च रोजी तातडीने नॅनो युरिया, नॅनो डीएपीबाबत जीआर काढण्यात आला. १२ मार्चला प्रस्ताव पाठवला आणि लगेच १२ मार्च २०२३ रोजी जीआर देखील मिळाला.


# रेखा गुप्ता यांनी घेतली दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ

### रामलीला मैदानावर सहा मंत्र्यांचाही शपथविधी

**नवी दिल्ली , २० फेब्रुवारी-**

दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून भाजपाच्या रेखा गुप्ता यांनी आज शपथ घेतली. यामुळे दिल्लीत २७ वर्षांनंतर भाजपाचे सरकार सत्तारुढ झाले. रामलीला मैदानावर झालेल्या ऐतिहासिक अशा शपथग्रहण समारंभात नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना यांनी रेखा गुप्ता यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

शपथग्रहण समारंभाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथसिंह, गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातील अनेक सदस्य, भाजपा तसेच रालोआशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थित होते. रेखा गुप्ता यांच्यानंतर प्रवेश साहिबसिंह वर्मा, आशिष सूद, मनिंदरसिंग सिरसा, रवींद्र इंद्रराजसिंह, कपील मिश्रा आणि पंकजकुमारसिंह यांनी शपथ घेतली.



रेखा गुप्ता आणि भाजपाचे अन्य मंत्री शपथ घेत असताना रामलीला मैदानावर उपस्थित हजारोंच्या संख्येतील भाजपा कार्यकर्त्यांनी जय श्रीरामच्या घोषणांनी आसमंत दणाणून सोडला. शपथविधीनंतर पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि अन्य मंत्र्यांनी व्यासपीठावर समोर येत उपस्थित जनसमुदायाला हात जोडून अभिवादन केले आणि सामूहिक छायाचित्रही काढून घेतले. शपथविधी समारंभाचे संचालन मुख्य सचिव धर्मेंद्रकुमार यांनी केले. नवनिर्वाचित भाजपा आमदारांच्या बुधवारी रात्री झालेल्या बैठकीत रेखा गुप्ता यांची भाजपा विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यात आली. गुप्ता या शालिमारबाग विधानसभा मतदारसंघातून पहिल्यांदाच निवडून आल्या आहेत.

### भारतात बायडेन यांना कदाचित दुसरे सरकार स्थापन करायचे होते

**मियामी, २० फेब्रुवारी**

कदाचित मागील बायडेन सरकारला भारतात दुसरे सरकार स्थापन करायचे होते, असा गंभीर आरोप भारतीय निवडणुकीतील अमेरिकेच्या निधीवर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. यावेळी त्यांनी भारताला निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी दिल्या जाणाऱ्या २.१ कोटी डॉलर्सच्या निधीवर सवाल केला. भारतातील मतदारांची संख्या वाढवण्यासाठी २१ कोटी डॉलर्सचा निधी दिला जात होता. मला वाटते बायडेन प्रशासनाला निवडणुकीत दुसऱ्या कुणाला तरी निवडून आणायचे होते.







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### शिवाजी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची जीई एरोस्पेस कंपनीत निवड

**सांगोला, दि. २० फेब्रुवारी-**
सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमधील मेकॅनिकल इंजीनियरिंग विभागातील ७ विद्यार्थ्यांची जीई ऐरोस्पेस या आंतरराष्ट्रीय कंपनीत निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. आर. ए. देशमुख यांनी दिली. जीई ऐरोस्पेसच्या एच.आर.टीमने घेतलेल्या ऍपटीट्युड टेस्ट व मुलाखतीमधून साक्षी चोरमले, आलोक काशीद, आकाश बाबर, तुषार दिघे, अमित शेंडगे, अमर सावंत व धनेश शिंदे ह्या विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली असल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. पी. सी. चव्हाण यांनी दिली. संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, विश्वस्त मंडळातील सर्व सदस्य, प्राचार्य डॉ.आर.ए.देशमुख, सर्व विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सदर विदयार्थ्यांना प्रा. पी.सी.चव्हाण, प्रा.एस.डी.बावचे, प्रा.अक्षय आटकळे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.



### सह्याद्री फार्मसीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी


**सांगोला, दि. २० फेब्रुवारी-**
सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे येथछत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून प्रतिमेची पूजा करण्यात आली. यावेळी डॉ. एस. ए. माळी, डी.फार्मसी द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी स्नेहल आवताडे यांनी मनोगत व्यक्त केले.

### अक्कलकोटमध्ये गोमांसची विक्री; दोघांवर गुन्हा दाखल

**अक्कलकोट, दि. २० फेब्रुवारी-**
तालुक्यातील दुधनी नगरपरीषदेचे मालकीचे ६० फुट रोड जवळ असलेले भाजीपाला मार्केटमधील मच्छी व मटन मास मार्केटमध्ये ३० किलो मांस विक्री केल्याबाबत अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे मध्ये गुन्हा दाखल झाला. दोन आरोपींना पोलिसांनी पकडले असून एक आरोपी पळून गेला. याबाबत फिर्याद शांतलिंग लाडप्पा चिंचोळी, वय ३५ वर्षे, व्यवसाय नोकरी, रा. दुधनी यांनी दिली. आरोपी छोटुंमियॉ अब्दुल रहमान बेपारी, सोहेल कयुम बेपारी, दोन्ही रा. मैंदर्गी, ता.अक्कलकोट, वली अब्दुल बेपारी, (पत्ता माहीत नाही) यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला. पोलीस सुत्राकडुन मिळालेली अधिक माहिती अशी की, दुधनी गावचे हद्दीतील दुधनी नगरपरीषदेचे मालकीचे ६० फुट रोड जवळ असलेले भाजीपाला मार्केटमधील मच्छी व मटन मास मार्केट मधील गाळा नं ५ मध्ये महाराष्ट्र राज्यात गोवंश कत्तल व गोमांस विक्री करण्यास बंदी असताना देखील आरोपी छोटुमियॉ अब्दुलरहमान बेपारी, सोहेल कयुम बेपारी, दोन्ही रा. मैंदर्गी, (ता. अक्कलकोट) हे गोमांस विक्री करताना ३० किलो मांसासह मिळून आले. यावेळी आरोपी वली अब्दुल बेपारी, हा पळून गेला. अधिक तपास पोसई ढोरे हे करीत आहेत.

### ऊस माझ्या नावावर पाठव म्हणाल्याने मुलाने केले आईला जखमी

**अक्कलकोट दि.१८ फेब्रुवारी**
आईने शेतातील ऊस माझ्या नावावर पाठव असे म्हणाल्याने मुलाने आईस शिवीगाळ, दमदाटी करुन लाकडी काठीने डावे कपाळावर, हातावर, पाठीवर मारुन जखमी केल्याची घटना पानमंगरुळ (ता. अक्कलकोट) येथे घडली. आरोपी मुलगा महेश बसण्णा पडनुरे, महादेव बंडप्पा मुडगी, शांतप्पा सुरेश पडनुरे, मळसिद्ध परमेश्वर पडनुरे सर्व रा. पानमंगरुळ यांच्या विरोधात अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाला. याबाबत फिर्यादआई शिवम्मा बसण्णा पडनुरे (वय ८३वर्षे) व्यवसाय घरकाम रा. पानमंगरुळ (ता. अक्कलकोट) यांनी दिले. पोलीस सुत्राकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, मुलास शेतातील ऊस माझे नावावर पाठव असे म्हणाल्याने मुलगा महेश बसण्णा पडनुरे रा.पानमंगरुळ यांनी शिवीगाळ दमदाटी करुन लाकडी काठीने आईच्या डावे कपाळावर, हातावर, पाठीवर मारुन जखमी केले तसेच महादेव बंडप्पा मुडगी, शांतप्पा सुरेश पडनुरे, मळसिद्ध परमेश्वर पडनुरे सर्व रा.पानमंगरुळ (ता.अक्कलकोट) यानी शिवीगाळ दमदाटी केली. ही घटना पानमंगरुळ येथे ११ फेब्रुवारी रोजी सांयकाळी ५ वा. चे सुमारास शिवम्मा बसण्णा पडनुरे यांचे शेतात घडली. या मारहाणीत फिर्यादी जेष्ठ महिला जखमी झाली. अधिक तपास पो.ना. मुल्ला हे करीत आहेत.



### ओंकार कारखान्यात शिवजयंती साजरी

**पिलीव, दि २० फेब्रुवारी.**
माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याच्या वतीने शिवजयंती साजरी करणात आली .यावेळी प्रतिमेचे पुजन चांदापुरीचे सरपंच जयवंत सुळ यांच्या हस्ते करणयात आले. कार्यक्रमाच्या अधक्षस्थानी जनरल मॅनेजर भिमराव वाघमोडे, होते.छत्रपती शिवाजी महाराज यांचा शेतगविषयक व शेतीविषयक धोरण,पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना पर्यावरण समतोल राखण्यासाठी अत्यंत उपयोगी असल्याचे मत संचालक प्रशांत बोत्रे यांनी व्यक्त केले. प्रशांत बोत्रे पाटील यांच्या उत्तम नियोजन मुळो कारखाना प्रगतीपथावर आहे. यावेळी ऊस उत्पादक शेतकरी मोहन मगर,नितीन जाधव,चिफ इंजिनिअर तानाजी देवकते, केन मॅनेजर शरद देवकर, धनाजी पवार, मेजर मोहन घोडके, अमोल तरंगे,गणेश धायगुडे उपस्थित होते. रमेश आवताडे यांनी आभार मानले.

# श्री विठ्ठलाचे टोकन दर्शन मंडप, स्कायवॉकच्या कामाला खीळ

## टेंडर प्रक्रियेतील काम थांबविल्याने भाविकांत नाराजी; मुख्यमंत्र्यांच्या '१०० दिवसाच्या' आत काम चालू करण्याच्या सुचेनेचे काय?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**
पंढरपुरात श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी लाखो भाविक येत असतात. मात्र दर्शनासाठी त्यांना तासन्तास दर्शन रांगेत ताटकळत उभं राहावे लागते. यावर तोडगा काढण्याची मागणी अनेक वर्षापासून होत होती. त्यानुसार दर्शन मंडप, स्कायवॉकची संकल्पना समोर आली. त्यानुसार तयार केलेल्या दर्शन मंडप आणि स्कायवॉकच्या १२९ कोटीच्या आराखड्यास राज्य सरकारच्या उच्च अधिकार समितीसह शिखर समितीने मान्यता दिली होती. या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदा काढली होती मात्र



या निविदेची प्रक्रियाच थांबविण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर कार्यालयाला आल्याने भाविकांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, हे काम १०० दिवसांच्या सप्तसुत्रीत घेवून तत्काळ चालू करण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा प्रशासनाला सुचना दिल्या होत्या; त्याचे काय? असाही सवाल उपस्थित होत आहे.

पंढरीत येणाऱ्या भाविकांना या आराखड्यातून दर्शन मंडप व स्कायवॉक तयार करून टोकन पद्धतीचे दर्शन सुरू केले जाणार आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाने शासनाकडे १२९ कोटी रुपयांचा आराखडा सादर केला होता. यापैकी आता ११० कोटी रुपयांच्या आराखड्यास मान्यता मिळाली. त्यामुळे दर्शन मंडप आणि स्कायवॉक उभा करण्याचा मार्ग मोकळा झाला होता. या कामामुळे लाखो भाविकांना निश्चितच दिलासा मिळणार आहे. या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ऑनलाईन निविदा काढली असून, त्या कामाची ऑनलाईन निघालेली निविदा थांबविण्याचे आदेश पंढरीतील सार्वजनिक विभागाला आल्याने जाणकार भाविकांतून आणि मोठ्या महाराज मंडळीतून मात्र नाराजी व्यक्त होत आहे. आषाढी यात्रेत भाविकांचे हाल होत असल्याने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अधिक सुलभपणे दर्शन व्हावे, यासाठी पंढरपुरातील पत्राशेडचा पुनर्विकास, दर्शन मंडप आणि स्काय वॉक बांधला जाणार आहे. या कामासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला आहे.

या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ऑनलाईन निविदा काढली होती आणि सोलापुरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता कार्यालयात २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता या निविदा उघडल्या जाणार होत्या. तर या कामासाठी ठेकेदाराला पावसाळ्यासह २४ महिन्यांची मुदत देण्यात आली असल्याची माहिती अधिकृत सूत्राकडून मिळाली.

मात्र वरिष्ठ पातळीवरून ही निविदा रद्द का झाली? याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

> **तांत्रिक कारणामुळे निविदेला स्थगिती**
>
> विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपुरात आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री एकादशीला मोठ्या प्रमाणात भाविक येतात. पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना तत्काळ व सुलभ दर्शन व्हावे, दर्शनासाठी थांबणाऱ्या भाविकांना दर्शन रांगेत मुलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी हे काम हाती घेण्यात आले आहे. मात्र वरिष्ठ पातळीवरील आदेशान्वये आणि तांत्रिक कारणामुळे ही टेंडर प्रक्रियेतील निवीदा थांबविली आहे. ८ दिवसानंतर पुन्हा नव्याने आम्ही निविदा काढणार आहोत.
>
> **-अमित निमकर, कार्यकारी अभियंता,**
> सार्व. बांधकाम विभाग, पंढरपूर

# 'स्थापत्य २०२५' प्रदर्शनाचे आज उद्घाटन




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**
असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सतर्फे भरविण्यात येणाऱ्या स्थापत्य २०२५ या बांधकाम व अंतर्गत सजावट विषयक प्रदर्शनाचे उद्घाटन आज (शुक्रवारी) सकाळी ११ वाजता सोलापूर महानगरपालिकेसमोरील नॉर्थकोट मैदानावर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे अध्यक्ष प्रशांत मोरे यांनी दिली.

'स्थापत्य २०२५' या स्थापत्य प्रदर्शनाचे प्रायोजकत्व मेटारोल इस्पात प्रा. लि. जालना यांनी घेतले आहे. स्थापत्य २०२५ च्या उद्घाटन कार्यक्रमास सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे तसेच मेटारोल इस्पात प्रा. लि. (जालना) चे व्यवस्थापकीय संचालक डी. बी. सोनी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. स्थापत्य २०२५ प्रदर्शन २१, २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी नॉर्थकोर्ट मैदानावर सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत सर्वांसाठी पाहण्यास उपलब्ध राहणार आहे.

स्थापत्य प्रदर्शनासाठी नॉर्थकोट मैदानावर भव्य मंडप उभारण्यात आला आहे. नव्याने घर बांधू इच्छिणाऱ्यांसाठी तसेच घराच्या अंतर्गत सजावटीसाठीची अतिशय उपयुक्त आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती स्थापत्य प्रदर्शन २०२५ मधून सोलापूरकरांना देण्यात येणार आहे. या प्रदर्शनात जागा विक्रीचे विविध प्रकल्प, प्रमोटर आणि बिल्डर, गृह कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्था, सिमेंट कंपन्या, कन्स्ट्रक्शन केमिकल्स, स्टील, प्लंबिंग आणि सॅनेटरी वेअर, इलेक्ट्रिक मटेरियल, बांधकामास लागणारी अत्याधुनिक यंत्रे आणि उपकरणे, दरवाजे आणि खिडक्या, रूफिंग मटेरियल, टाईल्स, घरातील अंतर्गत सजावट, फर्निचर, लँडस्केपिंग, सोलार एनर्जी, लिफ्ट असे एकूण ७० स्टॉल आहेत. या स्टॉलच्या माध्यमातून सोलापूरकरांना माहिती घेता येणार आहे. २१, २२ आणि २३ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या या प्रदर्शनास सोलापूरकरांनी नक्की भेट द्यावी आणि लाभ घ्यावा, असे आवाहन असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे सचिव इंजि. मनोहर लोमटे यांनी केले आहे.



# आस्था सामाजिक संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांना फळे व बिस्किटांचे वाटप

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**
शिवजयंती निमित्त आयोजित जय शिवाजी जय भारत पदयात्रेत आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना फळे व बिस्किटांचे वाटप करण्यात आले.

जिल्हा प्रशासन, सोलापूर शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद सोलापूर व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर आयोजित हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त जय शिवाजी जय भारत पदयात्रेस शहरातील विविध शाळेतील ३००० विद्यार्थी सहभागी झाले होते. ही पदयात्रा जिल्हाधिकारी कार्यालय ते जिल्हा परिषद उद्यान येथे समारोप करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यात अग्रेसर असणारी आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने २००० पदयात्रेतील विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद उद्यान या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी, प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे, संचालक योगेश कुंदुर, वेंदात तालिकोटी, अनुप कस्तुरे यांच्या हस्ते फळाचे व बिस्किटांचे वाटप करुन सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.

नेहमी ही संस्था सामाजिक, शैक्षणिक, कला व क्रीडा आदी कार्यात सहभागी असते. आस्था सामाजिक संस्थेनी आजही विद्यार्थीबद्दल आस्था दाखवून त्यांना फळांचे वाटप केले.

हा उपक्रम राबवण्यासाठी पिंटू कस्तुरे, सिद्धू बेऊर, सुरज छंचुरे, उदय छंचुरे, प्रथमेश गावडे, योगेश आरळीमार, महेश नागणसुरे यांनी परिश्रम घेतले



# शहाजी हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२० फेब्रुवारी-**
डॉ. सुहास पुजार यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठा मंदिरचे श्री शहाजी हायस्कूल अक्कलकोटमधील १९८२-८३ सालातील वर्गमित्र तब्बल ४२ वर्षानंतर एकत्र येऊन शाळा भरवली आणि आनंदोत्सव साजरा केला.

माजी उपनगराध्यक्ष अशपाक बळोरगी यांच्या नेतृत्वाखाली

मराठा मंदिरचे श्री शहाजी हायस्कूल अक्कलकोट मधील १९८२-८३ सालातील विद्यार्थीचे अक्कलकोट वागदरी रस्त्यावरील बळोरगी फार्म हाऊसवर वर्ग मित्राची स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी शंभरहून अधिक वर्गमित्र एकत्रित जमले होते. या वर्गमित्र अनेक वर्षापासून इच्छा असतानाही एकत्र येऊ शकत नव्हते. काही जण गावातील असल्याने काहींची भेट होत होती. परंतु काही विद्यार्थी नोकरी, कामानिमित्त बंगलोर मुंबई पुणे आदी शहरात, बाहेरगावी स्थाईक झाले होते. सोशल मीडियाच्या माध्यमातून दुरावलेले वर्गमित्र एकत्रित आले. प्रत्यक्ष वर्ग मित्राची भेट व्हावी म्हणून काही मित्रांनी व्हाट्सअॅपच्या माध्यमातून एकत्र आले. यावेळी संयोजक एजाज बळोरगी, मल्लिकार्जुन मसुती, सुरेश पुजारी, सुधाकर महिंद्रकर, डॉ. आसावरी पेडगावकर, मनोज लच्याणकर, प्रदीप हिंडोळे, संतोष जिरोळे, निवास इंगळे, सुरेश वेदपाठक, मीना पाटील आदीनी परिश्रम घेतले.

# चक्क दगडातून उमटताहेत 'सा-रे-ग-म-प-ध-नी-सा'चे स्वर

## शिवस्मारक तर्फे 'गाणारे दगड बोलणारे पाषाण' प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**
रांगेने ठेवलेले आठ दगड.... त्या दगडांवर हातोडीने हलकासा प्रहार केल्यास उमटत आहेत सा रे ग म प ध नी सा चे स्वर. ही किमया मंगळवारी सोलापूरकरांनी अनुभवली. छत्रपती श्री शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारकतर्फे शिवस्मारकच्या प्रांगणात आयोजित केलेल्या तीन दिवसीय 'गाणारे दगड बोलणारे पाषाण' या प्रदर्शनाचे उद्घाटन मंगळवारी शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी व्यासपीठावर शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने, कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, संचालक प्रा. देवानंद चिलवंत, प्रसाद जिरांकलगीकर, व्यवस्थापक मल्लिनाथ व्हटकर,



प्रदर्शनाचे संकलक प्रभाकर कुंटे उपस्थित होते. मोरेश्वर कुंटे आणि विजया कुंटे यांनी पाहिलेल्या महाराष्ट्रातील तब्बल १८ हजार मंदिरांपैकी आगळ्यावेगळ्या अविस्मरणीय मंदिरांच्या छायाचित्रांचे हे प्रदर्शन आहे. वाशिम जिल्ह्यातील तीर्थ शिरपूर येथील श्री अंतरिक्ष पार्श्वनाथजी मंदिरातील भगवान महावीरांची अधांतरी मूर्ती, नगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथील श्री रेणुका माता मंदिरातील हलत्या दगडी दीपमाळा, शिखर शिंगणापूर येथील श्री महादेव मंदिरातील सभा मंडपातील हलता दगडी खांब, बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा तालुक्यातील शेंदुरजन गावातील पालथे मंदिरात असलेल्या तरंगणाऱ्या विटा, चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील आंबडी येथील श्री वाळकेश्वर मंदिरातील कुंडाच्या कडेला उभे राहून टाळ्या वाजवल्या असता उसळी मारून वर येणाऱ्या पाण्याचे चमत्कारिक कुंड यांची छायाचित्रे तर कर्नाटकातील होट्टल येथील मंदिरातून देगलूर तालुक्यात आणण्यात आलेले सा रे ग म प ध नि सा स्वर वाजणारे दगड ही प्रदर्शनात ठेवण्यात आल होते.

# कृषी संस्कृती अंगीकारण्याच्या निर्धाराने झाली कार्यशाळेची सांगता

## व्याख्याने, परिसंवाद अन् सांस्कृतिक कार्यक्रमांनी गाजला दुसरा दिवस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**
'कृषी संस्कृती हा मानवी जीवन विकासाचा आत्मा आहे. त्यामुळे कृषी संस्कृती अंगीकारू या ' असा निर्धार करत दोन दिवसीय कृषी संस्कृती कार्यशाळेचा मंगळवारी समारोप झाला. महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात ही दोन दिवसीय कृषी संस्कृती कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात ज्येष्ठ अभ्यासक डॉ. विश्वनाथ शिंदे यांचे 'कृषी संस्कृती आणि जत्रा यात्रा' या विषयावर व्याख्यान झाले. लोक परंपरेत सणांचे महत्त्व अधिक असून कृषी संस्कृती आणि सण यांच्या मिलाफाने महाराष्ट्राचे लोकजीवन समृद्ध होत गेले, असे डॉ. शिंदे यांनी सांगितले. दुसऱ्या सत्रात लोकसंस्कृतीचे अभ्यासक व लेखक मुकुंद कुळे, चित्रपट दिग्दर्शक गजेंद्र अहिरे यांच्याशी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे यांच्या गप्पांचा कार्यक्रम



झाला. कृषी संस्कृती साहित्य संबंधी म्हणी, उखाणे, वाक्यप्रचार, काव्य तसेच चित्रपट माध्यमांमधील कृषी संस्कृतीचे महत्त्व व अस्तित्व या विषयावर रंगलेल्या अभ्यासपूर्ण गप्पांचा अनुभव सोलापूरकरांनी घेतला. दिग्दर्शक गजेंद्र अहिरे म्हणाले, कृषी संस्कृतीशिवाय चित्रपट माध्यमांनाच नव्हे तर एकूणच लोकजीवनाला पर्याय नाही. मनोरंजनाच्या माध्यमातून सर्वच क्षेत्रात पुन्हा कृषी संस्कृती येणे ही काळाची गरज बनली आहे. इंद्रजीत भालेराव यांनी 'शोध कृषी संस्कृतीचा' या विषयावर विस्तृत विवेचन केले. वेद, ज्ञानेश्वरी, भगवान गौतम बुद्धांचा काळ, चक्रधर स्वामींचे साहित्य अशा अनेक साहित्यांमध्ये कृषी संस्कृतीची मांडणी झाली आहे याकडे इंद्रजीत भालेराव यांनी लक्ष वेधले. त्यांनी सादर केलेल्या 'चल माझ्या दोस्ता' या कवितेला सोलापूरकरांनी दाद दिली. संजय बाविस्कर यांनी 'कृषी परंपरेचे घटक' या विषयावर व्याख्यान दिले. तर 'कृषी संस्कृतीवर आधुनिकीकरणाचा परिणाम' या विषयावरील परिसंवादात डॉ.अजित देशपांडे, डॉ. सचिन फुगे, सुप्रिया महेंद्रकर यांनी आपली मते मांडली. 'कला' या विषयावरील कार्यशाळेत संध्या मोहिते आणि निखिल परमेश्वर यांनी मांडणी केली. सांस्कृतिक कार्यक्रमात नेहा रार्चला आणि सहकाऱ्यांनी सादर केलेला नृत्य अविष्कार रसिकांना भावला. स्वप्निल सपना लोककला विकास मंडळाने लोकसंगीतावर आधारित पारंपारिक वाद्यांचे वादन, गीते, लावण्या, लोकनृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे शोभा बोल्ली यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. सुवर्णा पापळ यांनी संपूर्ण कार्यशाळेचा समन्वय उत्तम साधला. या कार्यशाळेसाठी स्थानिक सहसमन्वयक रवी सोलापुरे यांनी सहकार्य केले. त्याशिवाय अमोल धाबले यांनीही परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# हमासने इस्त्रायली ओलिसांचे मृतदेह पाठवले

## महिलेसह दोन मुलांचा समावेश, हवाई हल्ल्यात ठार झाल्याचा दावा

**जेरुस्लेम, २० फेब्रुवारी**

हमासने गुरुवारी ओलिसांचे मृतदेह असलेल्या चार शवपेट्या इस्रायली सैन्याला सोपवल्या. याते आई आणि तिच्या दोन लहान मुलांचा समावेश आहे. ७ आक्टोबर २०२३ रोजी हल्ल्यानंतर हमासने त्यांचे अपहरण केले होते. यात ९ महिन्यांच्या मुलाचा समावेश होता. अपहरण केलेल्यांमध्ये हा मुलगा सर्वांत लहान होता.

ज्या ओलिसांचे मृतदेह इस्रायलला देण्यात आले, त्यात शिरी बिबास, तिची दोन मुले, एरियल बिबास, तिचा पती केफिर बिबास आणि पत्रकार ओडेड लिफशिट्झ यांचा समावेश आहे.

हमासने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यात या नागरिकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर त्यांचे मृतदेह शवपेटीत सांभाळून ठेवण्यात आले. कायमस्वरूपी युद्धबंदी आणि इस्रायली सैन्याने गाझामधून पूर्णपणे माघार घेतल्यानंतरच उर्वरित ओलिसांची सुटका करण्यात येणार आहे. दरम्यान, ७ ऑक्टोबरच्या हल्ल्यानंतर हमासच्या दहशतवाद्यांनी संपूर्ण बिबास कुटुंबाचे किबुट्झ निर ओझ येथून अपहरण केले होते. शिरी बिबास यांचे पती यार्देन बिबास यांची मागील आठवड्यात हमासने सुटका केली.

बिबास कुटुंबातील सदस्यांचे मृतदेह परत आल्यावर इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू म्हणाले की, यामुळे संपूर्ण इस्रायल शोकाकूल झाले आहे. मृतांमध्ये समावेश असलेल्या ओडेड लिफशिट्झ यांचे अपहरण झाले, तेव्हा ते ८३ वर्षांचे होते. ओडेद एक पत्रकार होते आणि पॅलेस्टिनींना अधिकार मिळवून देण्यासाठी लढा देत होते.

**सर्व ओलिसांची करावी अन्यथा नेतान्याहू**

इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी आपल्या संबोधनात म्हटले की, शिरी बिबास कुटुंबातील सदस्यांच्या मृत्यूमुळे मोठा धक्का बसला आहे. संपूर्ण इस्रायलमध्ये शोककळा पसरली असून, संपूर्ण ओलिसांची सुटका करण्यासाठी मी वचनबद्ध आहे. हमासने कराराचे पालन करावे, अन्यथा त्यांना याची मोठी किंमत चुकवावी लागेल. (वृत्तसंस्था)

### युद्धबंदी करारावर प्रश्नचिन्ह

गाझा पट्टीत हमासच्या अतिरेक्यांनी चार शवपेट्या इस्रायली सैन्याच्या स्वाधीन केल्या. त्यानंतर सैन्याचा ताफा शवपेट्या घेऊन इस्रायल येथे परतला असून, मृतदेहाची डीएनए चाचणी केली जाणार आहे. त्यानंतर मृतदेह कुटुंबीयाकडे सोपविले जाईल. दरम्यान, आतापर्यंत इस्रायलच्या २४ ओलिसांची जिवंत सुटका करण्यात आली; मात्र दोन मुले त्यांची आई आणि तिघांचे मृतदेह हमासकडून सोपविण्यात आल्याने युद्धबंदी करार ावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### इस्रायलमध्ये संतापाची लाट

युद्धबंदी कराराच्या पहिल्या टप्प्यांतर्गत हमासने २४ जिवंत ओलिसांना इस्रायलला सोपविले. तथापि, बिबास कुटुंबाचे मृतदेह हमासने पाठविल्याने इस्रायलमध्ये संतापाची लाट पसरली आहे. यामुळे युद्धबंदी कराराच्या दुसऱ्या टप्प्यात अडथळा येण्याची शक्यता आहे. सध्या जवळपास ६० ओलिस हमासच्या ताब्यात असून, यापैकी जवळजवळ निम्म्या नागरिकांचा मृत्यू झाल्याची शंका इस्त्रायली सैन्याला आहे

# जागतिक गुंतवणूकदार परिषदेत ३० देशांचा सहभाग

## सोमवारी पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन

**भोपाळ, २० फेब्रुवारी**

मध्यप्रदेशातील भोपाळ येथे २४ आणि २५ फेब्रुवारी रोजी जागतिक गुंतवणूकदार शिखर परिषदेचे (जीआयएस) उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते केले जाणार आहे. या शिखर परिषदेत गुंतवणूकदार, उद्योजक आणि अधिकारी सहभागी होतील. मध्यप्रदेश सरकार दरवर्षी या शिखर परिषदेचे आयोजन करते. या वर्षी ही शिखर परिषद भोपाळमधील इंदिरा गांधी राष्ट्रीय मानव संग्रहालयात आयोजित केली जाईल.

ही शिखर परिषद जगभरातील प्रतिनिधींना एक व्यासपीठ प्रदान करते. यात मध्यप्रदेशातील प्रमुख उद्योग त्यांचे अनुभव सांगतील. जीआयएस एमपीच्या अधिकृत वेबसाईटनुसार, आठव्या जागतिक गुंतवणूकदार शिखर परिषदेत १० हजारांहून अधिक उद्योजक आणि नेते एकत्र येतील. या शिखर परिषदेचे उद्दिष्ट गुंतवणूकदारांना आकर्षित करणे, मध्यप्रदेशात औद्योगिक गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे, नेटवर्किंगसाठी पाया घालणे हे आहे.

३० देशांतील गुंतवणूकदार सहभागी होतील

या शिखर परिषदेत कॅनडा, जर्मनी, जपान, पोलंड, स्वित्झर्लंड, कोरिया, आयर्लंड, ब्रिटन, इटली, स्लोव्हेनिया, हाँगकाँग, थायलंड, पलाऊ प्रजासत्ताक, जमैका, कोस्टा रिका, जिबूती, फिजी, रोमानिया, रवांडा, श्रीलंका, सेशेल्स, मंगोलिया, मलेशिया, टोगो, म्यानमार, बुर्किना फासो, मोरोक्को, अंगोला, बल्गेरिया आणि नेपाळसह ३० देशांचे प्रतिनिधी सहभागी होतील.

**नोएल टाटा, गौतम अदानींसह मोठे उद्योगपती येणार**

देशातील अव्वल उद्योगपती गौतम अदानी, कुमार मंगलम् बिर्ला आणि नोएल टाटा यांचा जीआयएसमध्ये समावेश आहे. याशिवाय, आनंद महिंद्रा, जमशेद गोदरेज, संजीव पुरी, संजीव बजाज, सतीश रेड्डी, नादिर गोदरेज, पवन मुंजाल, अझीम प्रेमजी, सलील पारेख, दिलीप संघवी, वेणू श्रीनिवासन्, सुनील मित्तल, उदय कोटक इत्यादींचा समावेश असेल. रिलायन्स ग्रुपचे अध्यक्ष मुकेश अंबानी किंवा आकाश अंबानी हे देखील या परिषदेला उपस्थित राहू शकतात. (वृत्तसंस्था)



भाजपाच्या रेखा शर्मा यांच्या शपथविधी सोहळ्याला भाजपा कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांनी रामलीला मैदानावर अशी प्रचंड गर्दी केली होती

### मणिपुरात चार बंडखोरांना अटक

**इम्फाळ** : मणिपुरातील थौबल आणि पूर्व इम्फाळ जिल्ह्यातून किमान दोन वेगवेगळ्या संघटनांच्या चार बंडखोरांना सुरक्षा दलांनी अटक केली, अशी माहिती पोलिसांनी गुरुवारी दिली.

चुराचांदपूर येथील युनायटेड कुकी नॅशनल आर्मीच्या सदस्याला मंगळवारी अटक करण्यात आली. कांग्लेईपाक कम्युनिस्ट पार्टीच्या तीन सक्रिय सदस्यांना थौबल आणि पूर्व इम्फाळ जिल्ह्यातून बुधवारी अटक करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. अटक केलेले बंडखोर खंडणी वसुली, अपहरण, शस्त्रास्त्रांची व मादकपदार्थांची तस्करीत गुंतले होते. सुरक्षा दलांनी थौबल आणि तेंग्नौपाल जिल्ह्यातून मागील दोन दिवसांत मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे जप्त केली. यात रायफली, पिस्तुले, ग्रेनेड आणि मोर्टार्सचा समावेश आहे.

# केवळ 'ब्रेथ अनालायझर' चाचणी दारू प्यायल्याचा ठोस पुरावा नाही : उच्च न्यायालय

**पाटणा, २० फेब्रुवारी**

ब्रेथ अनालायझर यंत्राच्या अहवालातून व्यक्तीने दारू प्यायली आहे की नाही, याचा कोणताही ठोस पुरावा मिळत नाही. त्यामुळे केवळ ब्रेथ अनालायझर (श्वास विश्लेषक)अहवालाच्या आधारे दारू बंदी कायद्याअंतर्गत दाखल केलेला गुन्हा बेकायदेशीर ठरतो, असा निर्णय पाटणा उच्च न्यायालयाने दिला आहे.

2016 पासून बिहार राज्यात दारूबंदी कायदा लागू आहे. किशनगंजमध्ये राहणाऱ्या नरेंद्र कुमार राम यांच्याविरुद्ध दारुबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. नरेंद्र कुमार राम यांना पोटाच्या संसर्गासाठी सुमारे १५ दिवसांपासून होमिओपॅथिक औषध घेत होते.

होमिओपॅथिक औषधात असलेले अल्कोहोल ब्रेथ अनालायझरने शोधून काढले. यामुळे चुकीचा अहवाल आला. उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी त्याचे रक्त आणि लघवीची चाचणी न करताच त्याच्याविरुद्ध एफआयआर दाखल केला. तसेच त्यांनी कोणते असामान्य वर्तन केले याचाही एफआयआरमध्ये उल्लेख नव्हता. ही कारवाई रद्द करण्यात यावी, अशी मागणी करणारी याचिका नरेंद्र कुमार राम यांनी पाटणा उच्च न्यायालयात दाखल केली होती. याचिकाकर्त्यांचे वकील शिवेश सिन्हा यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच दशकांच्या जुन्या निकालाचा हवाला देत म्हटले आहे की, रक्त मूत्र किंवा असामान्य वर्तन या अहवालाचे समर्थन होत नाही तोपर्यंत तोंडाची दुर्गंधी पोटात अल्कोहोलच्या उपस्थितीचा ठोस पुरावा मानत नाही.

**काय म्हणाले पाटणा उच्च न्यायालय?**

या प्रकरणी पाटणा उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले की, ब्रेथ अनालायझर यंत्राचा अहवाल पूर्णपणे बरोबर नाही. हे यंत्र व्यक्ती दारू पिला आहे की नाही हे दर्शवते;पण हा ठोस पुरावा नाही. केवळ या अहवालाच्या आधारे कोणालाही दोषी ठरवता येणार नाही. वैद्यकीय तपासणीशिवाय ब्रेथअलायझर चाचणी खटल्यासाठी आवश्यक असलेल्या पुराव्याच्या मर्यादेची पूर्तता करत नाही आणि त्यामुळे एफआयआर रद्द करण्यात येत आहे. (वृत्तसंस्था)




### ९० हजार कैद्यांना मिळणार कुंभमेळ्यात स्नानाची संधी

**उत्तरप्रदेशच्या** प्रयागराजमध्ये सुरू असलेला महाकुंभमेळ्याची येत्या काही दिवसांत सांगता होणार आहे. अशात उत्तरप्रदेशातील ७५ तुरुंगांमधील कैद्यांना विशेष पद्धतीने महाकुंभमेळ्यात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. तुरुंग प्रशासन प्रयागराजच्या संगमातून पवित्र पाणी आणून सर्व तुरुंगांमध्ये कैद्यांच्या स्नानाची व्यवस्था करीत आहे. उत्तरप्रदेशचे तुरुंग मंत्री दारा सिंह चौहान यांच्या कार्यालयाच्या माहितीनुसार, २१ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० ते १० या वेळेत सर्व तुरुंगांमध्ये हा विशेष कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे. राज्यभरातील तुरुंगांमध्ये एकूण ९० हजारांहून अधिक कैदी आहेत, ज्यात सात मध्यवर्ती कारागृहांचाही समावेश आहे.

याबाबत कारागृह महासंचालक पी. व्ही. रामशास्त्री म्हणाले की, ही विशेष व्यवस्था तुरुंग मंत्र्यांच्या देखरेखीत केली जात आहे. संगमामधून आणलेले पवित्र पाणी तुरुंगातील लहान पाण्याच्या टाक्यांमध्ये भरले जाईल आणि नंतर ते कैद्यांच्या आंघोळीसाठी वापरले जाईल. २१ फेब्रुवारी रोजी लखनौ तुरुंगात होणाऱ्या कार्यक्रमात तुरुंग मंत्री दारासिंह चौहान आणि वरिष्ठ तुरुंग अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

यापूर्वी उन्नाव तुरुंगात कैद्यांसाठी स्नानाची सोययापूर्वी १७ फेब्रुवारी रोजी उन्नाव तुरुंगात कैद्यांसाठी अशाच प्रकारे स्नान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. उन्नाव तुरुंगाचे अधीक्षक पंकज कुमार सिंह म्हणाले की, याचा बऱ्याच काळापासून विचार केला जात होता आणि आता २१ फेब्रुवारी रोजी कैद्यांना पुन्हा पवित्र संगमातील पाण्याने स्नान करण्याची संधी मिळणार आहे. दरम्यान, प्रयागराजमध्ये सुरू असलेला महाकुंभमेळ्याची २६ फेब्रुवारी रोजी सांगता होणार आहे. अशात तुरुंग प्रशासनाने तुरुंगातील कैद्यांनाही महाकुंभमेळ्यात वेगळ्या पद्धतीने सहभागी होण्याची संधी दिली आहे.

# महाविद्यालयीन तरुणांना अनोखा रोजगार

## बाईक टॅक्सीसाठी अनेकांनी घेतली सुटी

**महाकुंभाचा** अखेरचा टप्पा सुरू असूनही दररोज सरासरी कोटीहून अधिक भाविक त्रिवेणी संगमावर स्नानासाठी येत आहेत. यात स्थानिकांनी अर्थकारणदेखील साधले आहे. विशेषतः प्रचंड वाहतूककोंडीमुळे मोठ्या वाहनांना शहरात प्रवेश बंद असल्याने कोट्यवधी भाविकांसाठी स्थानिक दुचाकीस्वार तरुण सारथी झाले. अनेकांनी महिनाभरात यातून लाखोंची कमाई केली आहे. पवित्र संगमावर जाण्यासाठी नाव चालविणाऱ्या नावाड्यांनाही अच्छे दिन आले आहेत.

बहुतांश भाविक हे सरासरी १५ ते २० किलोमीटर पायीच चालत आहेत. महाशिवरात्रीच्या अगोदर पवित्र स्नान व्हावे यासाठी मिळेल त्या साधनाने भाविक प्रयागराजला पोहोचत आहेत. पवित्र संगमावर पोहोचण्यासाठी स्थानिक वाहतूक व्यवस्थाच नसल्याने अडचण होत आहे. दुचाकीस्वार चारशे ते हजार रुपये भाडे आकारतात. यातून दिवसभरात तीन ते चार हजार रुपये कमाई होते. यासाठी अनेक महाविद्यालयीन तरुण पुढे सरसावले असून, त्यांना या निमित्ताने चांगला रोजगार मिळाला आहे. एवढेच नाही तर, नोकरी करणारेसुद्धा आपली दुचाकी या कामी वापरून पैसे कमवत आहेत.



*बोटिंगचे दर दहापटमहाकुंभ प्रशासनाकडून बोटिंगसाठी ४५ रुपये ते १२५ रुपये इतके दर निश्चित करण्यात आले. मात्र, गर्दी लक्षात घेता नावाडी व बोट कंत्राटदारांकडून तब्बल दहा पट दर आकारण्यात येत आहेत. ताज्या पाहणीत एका व्यक्तीकडून १३०० ते १६०० रुपये घेण्यात येत असल्याचे समोर आले.*



# पाणी पुरवठा, ड्रेनेज यासह नागरी सुविधांना प्राधान्य द्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

- **पहिल्याच दिवशी नूतन आयुक्त डॉ. ओंबासे यांनी घेतला विविध कामांचा आढावा**
- **महापालिकेच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची घेतली बैठक**

पाणी पुरवठा, ड्रेनेज,स्वछता, रस्ते,आरोग्य व शिक्षण आदी नागरी सुविधांना प्राधान्य द्यावे असे आदेश महापालिकेचे नूतन आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

सोलापूर महानगरपालिकेचे नूतन आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी आज मिटींग हॉल येथे सर्व विभागातील अधिकारी यांची बैठक घेऊन महापालिकेचा कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी महापालिकेतील व स्मार्ट सिटीच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या विविध प्रकल्प तसेच उजनी ते सोलापूर दुहेरी पाईपलाईनचा सध्यस्थिती, अमृत योजना, मल शुद्धीकरण प्रक्रिया, केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रमाच्या माध्यमातून झालेली कामे, रमाई आवास योजना, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरि वस्ती सुधारणा योजना,शहरतील पाणी पुरवठा, लाईट विभाग, रस्ते, ड्रेनेज,घनकचरा विभाग,आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, अमृत योजना,उद्यान विभाग,पर्यावरण विभागा संदर्भातील माहिती तसेच सोलापूर महानगरपालिका व स्मार्ट सिटी च्या माध्यमातून इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या नियंत्रण कक्ष, स्काडा प्रणाली, घंटागाडी रूट मॅप, शहरातील सीसीटीव्ही, सुरक्षा यंत्रणा, पाणीपुरवठा वितरण तसेच ड्रेनेज बाबत तक्रारी,अग्निशमन विभाग,आपत्ती व्यवस्थापन आदी संदर्भात माहिती घेतली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार,अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे,उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमुर मुलाणी,मुख्य लेखापरीक्षक रूपाली कोळी, मुख्यलेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर,सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, सहाय्यक आयुक्त मनीषा मगर,सहाय्यक आयुक्त कृष्णा पाटील,सार्वजनिक आरोग्य कार्यकारी अभियंता व्यंकटेश चौबे, विद्युत कार्यकारी अभियंता राजेश परदेशी, अंतर्गत लेखापरीक्षक राहुल कुलकर्णी, नगर सचिव प्रवीण दंतकाळे, संगणक विभाग प्रमुख स्नेहल चपळगावकर, आरोग्य अधिकारी राखी माने,अग्निशमन विभाग प्रमुख राकेश साळूंखे, किशोर सातपुते,उपअभियंता नीलकंठ मठपती,प्रकाश दिवाणजी, राम चंद्र पेंटर, तपण डंके, उद्यान अधिकारी किरण जगदाळे, कामगार कल्याण अधिकारी ओमप्रकाश वाघमारे पशुवैधकीय अधिकारी सतीश चौगुले, पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, विधना सल्लागार संध्या भाकरे आणि सर्व विभागीय अधिकारी उपस्थित होते.

यावेळी नूतन आयुक्त डॉ.सचिन ओंबासे यांनी सर्व अधिकारी यांना पाणी पुरवठा,स्वछता,रस्ते, आरोग्य व शिक्षण अश्या विषयास प्राधान्य द्यावे. आपआपल्या विभागाचे चांगल्या पद्धतीने कामकाज करण्याचे आदेश दिले.

# माता जानकीच्या माहेरच्यांचे कुंभस्नान

**माता** जानकीचे जन्मस्थान असलेल्या नेपाळमधील ५० लाखांहून अधिक भाविकांनी प्रयागराजमध्ये सुरू असलेल्या महाकुंभ वेणी संगमातील पवित्र पाण्यात पवित्र डुबकी घेतली. नेपाळमध्ये महाकुंभ सोहळ्याने प्रचंड उत्साह निर्माण केला आहे आणि शेजारील देशातील भाविक 'अक्षत' (तांदूळ) आणि इतर पवित्र सामग्री घेऊन जनकपूर, मा सीतेच्या जन्मस्थानी आणि श्रीरामाच्या सासरवाडीतून बडे हनुमानजींना अर्पण करण्यासाठी आणली आहे. त्याच वेळी ते संगमातील गंगाजल आणि माती परत घेऊन जात आहेत, ज्याला ते अमूल्य आध्यात्मिक वारसा मानतात.

नेपाळी भाविकांची बडे हनुमान मंदिर आणि अक्षयवट यांच्यावरील श्रद्धा त्यांच्या विधींमध्ये आणि आदरातून स्पष्ट दिसून येते. संगमातील पवित्र स्नानात सहभागी होण्याशिवाय नेपाळी भाविक अयोध्येतील श्रीराम आणि काशीतील बाबा विश्वनाथ यांचे दर्शन घेऊनच परतणार आहेत.

### स्नान करणाऱ्या महिलांचे अश्लील व्हिडीओ

प्रयागराज महाकुंभात महिलांच्या गोपनीयतेचे उल्लंघन करण्याच्या घटना समोर येत आहेत. संगमात आंघोळ करताना किंवा कपडे बदलताना महिलांचे फोटो आणि व्हिडीओ गुप्तपणे बनवले जात आहेत. नंतर ते सोशल मीडियावर अपलोड करण्यात येत असून, कुंभमेळा पोलिसांनी या प्रकरणी एका इन्स्टाग्राम अकाऊंटविरुद्ध एफआयआर नोंदवला. सुरुवातीच्या तपासात या अकाऊंटवर महिलांचे आंघोळ करतानाचे अनेक व्हिडीओ अपलोड केलेले आढळले. या अकाऊंटचा डार्क वेबशी काही संबंध आहे का, हे पोलिसांनी शोधून काढले. पोलिसांनी कॅलिफोर्नियातील इन्स्टाग्रामच्या मुख्य कार्यालयाला ई-मेल पाठवून अकाऊंटची माहिती मागितली आहे.

# कुंभाच्या गर्दीतही पोलिसांची चोख कामगिरी

## २५ हून अनेक कुख्यात गुंड जेरबंद

**५२** कोटींहून अधिक भाविकांनी आतापर्यंत भेट दिलेल्या महाकुंभात गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी यंदा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. विशेषतः चेंगराचेंगरीनंतर 'एआय' तसेच फेस रिकग्निशन कॅमेऱ्यांच्या माध्यमातून गर्दीवर जास्त पाळत ठेवण्यात येत आहे. याच 'एफआरएस' कॅमेऱ्यांच्या मदतीने महिन्याभरात प्रयागराज पोलिसांनी कुंभमेळ्यातून २५ हून कुख्यात तसेच वाँटेड गुंडांना ताब्यात घेतले आहे.

कॅमेऱ्यांशी निगडित सॉफ्टवेअरमध्ये पोलिसांनी वाँटेड गुन्हेगारांचे फोटो अगोदरच अपलोड करून ठेवले होते. त्या माध्यमातून आतापर्यंत २५ हून अधिक गुन्हेगारांना पकडण्यात यश आले आहे. पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टीने हे आकडे अधिकृत केलेले नाहीत. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने ही माहिती दिली. याच कॅमेऱ्यांच्या मदतीने हरविलेल्या व्यक्तींचा शोध घेण्याचेदेखील प्रयत्न करण्यात येतात. मात्र, बहुतांश जनता चालत जात असून, अनेकांचे फोटो व माहिती कुठल्याही डेटाबेसला नाही. त्यामुळे या फेस रेकग्निशन कॅमेऱ्यांचा वापर प्रामुख्याने असामाजिक तत्त्वे व कुख्यात गुंडांचा शोध घेण्यासाठीच करण्यात येत आहे.

### भाविक मोजले कसे?

आतापर्यंत प्रयागराजला ५८ कोटींहून अधिक भाविकांनी भेट दिली आहे. एआय कॅमेऱ्यांच्या माध्यमातून ही आकडेवारी दिली जाते. कॅमेऱ्यांचा डेटा सॉफ्टवेअरमध्ये टाकून अल्गोरिदमच्या आधारावर ही आकडेवारी जारी करण्यात येत आहे. यासाठी एका कंपनीची मदत घेण्यात आली आहे.



## अग्रलेख...

# एथ चातुर्य शहाणे व्हावे...

या जगातील प्रत्येक सजीव जगत असतो, पण माणूस म्हणून प्राप्त होणाऱ्या जन्माचे एक वेगळेपण असते. तसे पाहिले, तर पशुपक्षी हजारो वर्षांपासून जगत आले आहेत, पण नैसर्गिक उत्क्रांतीनुसार होणारे भौतिक बदल सोडले, तर त्यांच्या जीवनशैलीमध्ये काळानुरूप बदल झालेला नसतो. काळाबरोबर माणसाच्या जीवनशैलीमध्ये असंख्य बदल होत गेले आणि बदलाचा हा प्रत्येक टप्पा म्हणजे मानवी जीवनशैलीच्या विकासाचा टप्पा ठरला आहे. भाषा अस्तित्वात येणे हा मानवी जीवनातील उत्क्रांतीच्या पर्वातील सर्वात महत्त्वाचा टप्पा ठरला. दर दहा मैलांवर भाषा बदलते असे म्हणतात; पण हे सर्वस्वी खरे नाही. असा जो बदल जाणवतो, तो भाषेतील नसतो, तर संवादाच्या शैलीतील बदल असतो. हा बदल सांस्कृतिक देवाणघेवाणीतून परस्परांनी स्वीकारला, तेव्हा जगातील मानवी जीवनशैली एकमेकांशी जोडलीदेखील गेली. संवादाचे माध्यम म्हणून भाषेचा वापर सुरू झाल्याने संस्कृती आणि परंपरांचे संगोपन सोपे झाले असे म्हणतात. कारण परंपरांची पालखी पुढच्या पिढीकडे सोपविणे हा एक संस्कार असतो. तो सुलभ व्हावा यासाठी संवादाचे माध्यम वापरले जाते. म्हणूनच भाषेचा इतिहास हा एक प्रकारे संवादाच्या माध्यमातून होणारा परंपरांच्या पालखीच्या प्रवासाचा इतिहास म्हणावा लागेल.

या भाषांच्या माध्यमातून माणसे परस्परांशी जोडली जातात. भाषा हा माणसामाणसांना आपुलकीने जोडणारा धागा असतो, म्हणून भाषा जपली गेली पाहिजे, तिचे संवर्धन झाले पाहिजे, ही गरज जेव्हा मानवी समूहांना जाणवू लागली, तेव्हा भाषेच्या जपणुकीचे साधन म्हणून बोली भाषेबरोबरच लिपीचाही शोध लागला असावा. आपल्या मराठीची मुळे अशीच आपल्या समाजजीवनाच्या संस्कृतीसोबत जोडली गेलेली असल्याने, मराठी भाषा हा आपल्या अस्मितेचा मानबिंदू ठरला आहे. तसेही, प्रत्येक भाषक समूहासाठी त्यांची त्यांची भाषा हा अस्मिताबिंदूच असतो. मराठी ही केवळ भाषा नाही, तर या भाषेने ज्ञानाची असंख्य कवाडे सामान्यांसाठी खुली केली. सहसा सर्वसामान्यांस न कळणाऱ्या भाषांतील सारे ज्ञान मराठमोळ्या घराघरांपर्यंत पोहोचविण्यात मोलाची भूमिकाही निभावली. ज्ञानप्रसाराच्या पुण्याईची ही पालखी मराठी भाषेने गेल्या अनेक शतकांपासून खांद्यावर वाहिली आहे. त्यामध्ये लिखित भाषेचा म्हणजे, वाङ्मयाचा वाटा मोठा राहिला आहे. या वाङ्मयाचे लेणे मराठीला लाभले. त्यामुळेच तिच्या अभिजाततेचा अभिमान आज मराठी भाषकांच्या मनामनात रुजून राहिला आहे. या वाटचालीचा मागोवा घेताना इसवी सनाच्या दहाव्या शतकापर्यंत मागे जाता येते. खरे तर त्याआधीच्या काळातही मराठीचे अस्तित्व होते, असे मानले जाते. पण बहुधा ते केवळ संवादाच्या भाषेपुरते मर्यादित असावे. वाङ्मयाच्या स्वरूपात मराठी भाषेने आपले अस्तित्व उमटविण्यास सुरुवात केली, तो काळ सुमारे एक हजार वर्षांपूर्वीचा असावा, असे मराठीचे अभ्यासक सांगतात. त्या काळी आजच्या सारखी ग्रंथलेखनासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री उपलब्ध नसावी, हे बहुधा त्याचे कारण असावे. त्यामुळे लिखित साहित्याच्या इतिहासाच्या अगोदरच्या काळात मौखिक साहित्याने मराठी समाजजीवन घडविण्यात मोलाची भूमिका बजावलीच होती. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक स्थित्यंतरातूनच साहित्य निर्माण होत असते. वाङ्मयाचा आणि साहित्याचा इतिहास हा मानवी संवेदनशीलतेचा इतिहास असतो. तो केवळ कोणा व्यक्तीभोवती केंद्रित नसतो, तर संपूर्ण समाज हा त्या इतिहासाचा केंद्रबिंदू असतो. वाङ्मय ही एक कला आहे आणि तिचा जन्म समाजातच होत असतो. कोणत्याही वाङ्मय निर्मितीची बीजे कोणत्या ना कोणत्या रूपाने जीवनमूल्यांशी जोडली गेलेली असल्याने संस्कृती आणि परंपरांचे पाईक निर्माण करणे किंवा नवी सांस्कृतिक समाजमूल्ये निर्माण करण्याच्या प्रक्रियेस साह्यभूत ठरणे हे लिखित वा मौखिक साहित्याने अंगीकारलेले व्रत राहिले आहे. म्हणूनच भाषा, वाङ्मय किंवा साहित्य निर्मितीच्या क्षेत्रास सामाजिक मूल्यव्यवस्थेत मानाचे पान मिळत गेले आहे. ते तसे मिळणे हा सामाजिक सभ्यतेचे आणि सुसंस्कृत समाजाचे लक्षणच ठरले आहे.

भाषेने किंवा साहित्य क्षेत्राने पिढ्यापिढ्यांपासून आपल्या खांद्यावर व्रतस्थपणे वाहिलेली संस्कृती संवर्धनाची पालखी पुढे नेण्याचा आणि साहित्य क्षेत्राच्या या व'ताचा सन्मान करण्याची परंपरा साहित्य संमेलनांसारख्या उपक्रमातून सुरू झाली असावी. आज देशाच्या राजधानीत सुरू होणारे ९८ वे मराठी साहित्य संमेलन हे केवळ महाराष्ट्राचे भाषक संमेलन नाही, तर हजारो वर्षांच्या परंपरेची वाटचाल करताना मराठीने जेथे जेथे आपल्या पाऊलखुणा उमटविल्या, ज्या ज्या सामाजिक संस्कृतीशी नाते जोडले, त्या त्या सर्वांसोबतचे नाते नव्याने दृढ करण्याचा एक प्रयत्न म्हणून या संमेलनाकडे पाहावे लागेल. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी अशी ओळख असलेल्या पुणे नगरीत मराठी साहित्य संमेलनांची मुहूर्तमेढ रोवली गेली त्याला आणखी चार वर्षांत दीडशे वर्षे पूर्ण होतील. या प्रदीर्घ कालखंडात, सन १८७८ पासून मराठीच्या अस्मिता प्रसाराच्या या पालखीने मराठीचा प्रचार आणि प्रसार करीत देशाच्या विविध भागांत संचार केला. मराठी भाषेचा आणि मराठी भाषेमध्ये निर्माण झालेल्या साहित्यकृतींचा, वाङ्मयाचा सन्मान करण्याची ही महाराष्ट्राची परंपरा त्यामुळेच देशाच्या कुतूहलाचा विषय ठरली आहे. खरे म्हणजे, दोन मराठी माणसे एकत्र आली, ती त्यांच्यात तीन मतप्रवाह असतात, असे गमतीने म्हटले जाते. त्यामुळे जेथे मराठी माणसांचे एकत्र येणे होते, तेथे मतभेद, गैरसमज आणि वादविवादही झडतात. संमेलने त्यास अपवाद असूच शकत नाहीत. पण दोन मराठी माणसे एकत्र आली की साहित्य संस्था निर्माण होतात, असाही एक दुसरा मतप्रवाह आहे. मराठी माणसाचा स्वभाव आणि मराठी मनाच्या संवेदना यांची ही दोन वेगवेगळी रूपे म्हणता येतील. साहित्य संस्थांच्या बाबतीतही बरेचदा ही रूपे परस्परांशी संघर्ष करताना दिसतात. कदाचित त्यामुळेच मराठी साहित्य संमेलनांभोवती अनेकदा वादाची वलये निर्माण झालेली दिसतात. किंबहुना साहित्य संमेलन आणि वाद ही साहित्य परंपरेत हातात हात घालून वाटचाल करणारी प्रक्रिया ठरावी असाच साहित्य संमेलनांचा इतिहास असल्याने, तसे घडले नाही अशी स्थिती अपवादात्मकच असावी, असे म्हणता येईल. अशा इतिहासाची तमा न बाळगता साहित्य संमेलनांचे आयोजन केले जाते, संमेलने पार पाडली जातात आणि दोन-तीन दिवसांच्या या साहित्य सोहळ्याच्या सावलीत मराठी मने हरखून जातात, हेदेखील मराठी समाजमनाचे वेगळेपणच आहे. गेल्या दीडशे वर्षांच्या वाटचालीत ९८ साहित्य संमेलने पार पडली असली, तरी ही परंपरा आता शतकाच्या उंबरठ्यावर पोहोचली आहे, ही बाब मराठी मनास समाधान देणारी आहे. यंदा आजपासून सुरू होणाऱ्या ९८ व्या साहित्य संमेलनाने ७२ वर्षांनी दिल्ली गाठली आहे. ७२ वर्षांपूर्वी साहित्य संमेलन दिल्लीत आयोजित केले गेले, तो काळ आणि आजचा काळ या दरम्यान मराठी भाषेच्या वाटचालीतील एक अभिमानास्पद टप्पा आपण गाठला आहे. मराठी भाषा प्राचीन आहेच; प्राचीन ग्रंथ, साहित्य आणि वाङ्मयाने या भाषेला समृद्ध केले आहे आणि त्या परंपरेचा प्रत्येक मराठी माणसाला अभिमानच असल्याने, मराठीच्या प्राचीनत्वावर मान्यतेची मोहोर उमटावी ही मराठी माणसाची प्रदीर्घ काळापासूनची प्रतीक्षा या संमेलनाआधी फलद्रुप झाली आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देऊन केंद्र सरकारने मराठीचा गौरव केला आहेच; आता अभिजाततेच्या मान्यतेचे लेणे ल्यालेली ही समृद्ध मराठी आपल्या परंपरेचे पोवाडे राजधानीच्या गावी गाणार आहे.

यंदाच्या साहित्य संमेलनाने काहीतरी वेगळेपणाचे दर्शन घडविण्याची मराठी माणसाची अपेक्षा आहे. एखादी पालखी खांद्यावर घेऊन कोणत्या एखाद्या बिंदूभोवती फेरे मारत राहिल्याने प्रवासाचा नेमका टप्पा गाठता येत नसतो. त्यासाठी पालखीचे नेमके गंतव्यस्थान गाठण्यासाठी प्रवासाची आखणी करणे आवश्यक असते. साहित्य संमेलनांच्या पठडीबाज नियोजनातून ते कितपत साधेल, हा प्रश्न याआधी अनेकदा मराठीजनांत चर्चिला गेला आहे. त्यातूनच साहित्य संमेलनांची खरंच गरज तरी आहे का, या चर्चेलाही अधूनमधून वाचा फुटत राहिली आहे.

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (१३)

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

महर्षी व्यासांनी लिहिलेले महाभारत हे महाकाव्य म्हणजे ज्ञान-विज्ञानाचा महासागर आहे. त्याचे 'मंथन' जितके कराल, त्या प्रमाणात त्यातून अनेक मौल्यवान रत्ने आजही खऱ्या जिज्ञासू वृत्तीच्या संशोधकाला प्राप्त होऊ शकतात. त्यासाठी हेतूची शुद्धता पाहिजे. प्रयत्नांची प्रामाणिकता पाहिजे आणि कोणत्याही परदेशी तत्त्वज्ञानाने आवरीत नसलेली म्हणजे श्रीसमर्थ म्हणतात त्या प्रकारची 'सकलांचे सकल ऐकावे परंतु आपला मगज राखावा काही तरी' अशी वस्तुनिष्ठ भूमिका घेणारी बुद्धी, निर्णय शक्ती पाहिजे. ती दुर्दैवाने बुद्धिवादाच्या, आधुनिकतेच्या गोंडस नावाखाली आणि पुरोगामी-प्रतिगामीच्या ठिसूळ अधिष्ठानावर आरूढ होऊन आम्हीच गमावली आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात त्याप्रमाणे- 'जे जे भारताचे आहे ते सर्व वाईट आणि जे कांही पाश्चात्यांचे आहे ते सर्व चांगले'- या प्रकारची परधार्जिणेपणाची परप्रत्ययी बुद्धी निर्माण केली. त्यालाच आपण मानसिक गुलामगिरी असे म्हणतो. पण काळाचे सामर्थ्य विलक्षण आहे. त्याचे माहात्म्य महाभारतात अनेक प्रसंगातून, अनेक संवादातून भीष्म, द्रोण, विदूर, युधिष्ठिर, धौम्य ऋषी यांच्याद्वारे व्यासांनी प्रकट केले आहे. ते पाहिले की वर्तमानकालीन भारताच्या अनेक क्षेत्रात त्याच्या पाऊलखुणा स्पष्ट दिसायला लागतात.

**महाभारतीय युद्ध - ऑटोमिक वॉर :** आजच्या म्हणजे आधुनिक युगाची ओळख स्पेस युग, अणू युग, तंत्र युग, विज्ञान युग इत्यादी विविध नावांनी आपण करतो. आज विज्ञानाने विश्वाच्या 'पाताल-भूतल-व्योम' या तिन्हीही स्तरावर विलक्षण प्रभुत्व मिळविले आहे. आजचे युद्ध विज्ञान, त्याच्याशी संबंधित अस्त्र-शस्त्र यांचे स्वरूप जडाकडून सूक्ष्माकडे असे झाले आहे. त्याचे दृश्यस्वरूप आपण दूरदर्शनवर इस्रायल, इराण, गाझा, हमास यांच्या आणि युक्रेन आणि रशिया यांच्या युद्ध दृश्याचे जे प्रक्षेपण (लाईव्ह-कास्ट) पाहतो त्यावरून आपल्या स्पष्टपणे लक्षात येते. हा सर्व चमत्कार ब्रह्मांडव्यापी आण्विक शक्तीचा म्हणजे न्युक्लिअर एनर्जीचा आहे, हे आता सिद्ध झाले आहे. डॉ. होमी भाभा यांचे शब्दात 'द एक्झिस्टन्स ऑफ न्यु-क्लिअर एनर्जी इन इच अँड एव्हरी पार्टिकल ऑफ द युनिव्हर्स हॅज बिकम द सेटल्ड अँड टेस्टेड ट्रूथ' या वैशिष्ट्यामुळे एका जागेवरून सुदूर असलेल्या लक्ष्यावर (टार्गेट) अचूक मारा सहजपणे करता येऊ शकतो; आज हे सहज शक्य झाले आहे तसेच ते प्रचलित (रूटिन) युद्ध तंत्रही झाले आहे. आधुनिक युद्ध विज्ञान या सूक्ष्मतेपर्यंत आले आहे. भारतीयांना अणुविज्ञान माहीत होते तसेच 'दे वेअर ॲक्वेंडेड वुईथ न्युक्लिअर वेपनरी.' ज्या भारताला हा अज्ञानी, गावंढळ, मूर्ख, अशिक्षित म्हणजे पॅगन लोकांचा देश म्हणून साहेब मजकुरांची अखंडपणे हिणवले आणि त्यांची री ओढत घरच्या म्हातारीचे काळ झालेल्या ज्यांनी, अखंडपणे भारतीय ज्ञान परंपरा त्याच्या भव्य-दिव्य प्रगतीचा इतिहास नाकारला त्यांना कालपुरुषाने आधुनिक परिभाषेत दिलेले हे उत्तर आहे. 'मुझे गधा कहो लेकिन हिंदू मत कहो' असे म्हणणाऱ्यांना आणि 'आय ॲम ऑक्सडेंटली बॉर्न अॅज अ हिंदू'ची मानसिकता असलेल्या महाभागांना कालपुरुषाने मारलेली ही सणसणीत चपराक आहे. त्या चपराकीचे उमटलेले ध्वनी ऐकण्याचा योग विद्याभारतीच्या कुरुक्षेत्राला झालेल्या अखिल भारतीय प्रधानाचार्य संमेलनाच्या निमित्ताने आम्हाला आला. त्याचे असे झाले -

सन १९८० मध्ये कुरुक्षेत्राला विद्याभारती या शैक्षणिक क्षेत्रात भरीव व कौतुकास्पद कार्य करणाऱ्या संस्थेमार्फत कुरुक्षेत्र येथील प्रसिद्ध गीता विद्यालयात हे संमेलन झाले. शेवटच्या दिवशी कुरुक्षेत्राचे मैदान पाहण्याची इच्छा सहभागी सदस्यांनी संस्थेचे प्रधान आचार्य दीनानाथजी बत्रा यांचेकडे केली असता ते म्हणाले, कुरुक्षेत्र समजले जाणारे एक छोटेसे मैदान दाखवितात, पण सध्या सरकारतर्फे तो 'प्रोटेक्टेड अँड स्ट्रिक्टली प्रॉहिबेटेड झोन' म्हणून घोषित झाला आहे. याचे कारण म्हणजे त्या जागेचे संशोधन करण्यासाठी सध्या तेथे रशिया आणि अमेरिकेतील न्युक्लिअर सायंटिस्टची टीम आली असून तेथे अत्याधुनिक विज्ञान उपकरणांच्या साहाय्याने त्यांची विविध परीक्षणे चालू आहेत. त्या संबंधात एका छोट्या पत्रकार परिषदेत त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्या परदेशी अणू संशोधकांचे म्हणणे असे आहे की, महाभारत युद्ध हे विश्वातील पहिले ऑटोमिक वॉर आहे. सकाळी प्रारंभ झालेले युद्ध सूर्यास्ताच्या शंखध्वनीने थांबत असे. त्यामुळे त्या परदेशी अणू संशोधकांचे म्हणणे ही मारक क्षमता अस्त्र म्हणून वापरल्या जाणाऱ्या आण्विक क्षमतेची असली पाहिजे. १८ दिवसात अनेकांनी विविध अस्त्रे वापरली होती. त्यामुळे त्यांचे काहींना काही अवशेष रेडियो ॲक्टिव्हिटीजच्या लहरींच्या रूपाने सापडलेच पाहिजे. त्यांचा अंदाज खरा ठरला. याचा स्पष्ट अर्थ हाच की, रामायण आणि महाभारत काळात भारतीय संस्कृती. कुणी हिंदुत्ववादी, प्रतिगामी, बुरसटलेले लोक नाहीत, तर आधुनिक विज्ञान युगातील दोन महासत्ता असलेल्या अमेरिका आणि रशियाला अण्वस्त्र सज्ज करणारे संशोधक मंडळी आहेत.

काही वर्षांपूर्वी पुणे येथील आपल्या डी.आर.डी.ओ या संस्थेने टी.ओ.जी. म्हणजे संकल्पित लक्ष्याचा अचूक वेध घेणारी मिसाईल संशोधित केली. त्यामुळे पाकिस्तान आणि चीनला धक्का बसला. त्यानंतर एकाच वेळा अनेक स्तरांवर असलेल्या विविध लक्ष्याचा वेध घेणारी 'मल्टिपल टारगेट ओरिएंटेड मिसाईल' ही आपल्या संशोधकांनी सिद्ध केली आणि भारताची सामरिक शक्ती द्विगुणीत झाली. सर्वांना अभिमान वाटला. आनंद झाला. महर्षी व्यासांनाही झाला असेल. कारण भारत हा महाभारत घडवून राहिला आहे. ते असे- महाभारतातील द्रोणपर्वात भीम आणि हिडिंबा पुत्र घटोत्कच याच्या वध कथेनुसार, इंद्राने कर्णाला दिलेली ती वासवी शक्ती घटोत्कच वधाच्या संकल्पाने म्हणजे लक्ष्य निश्चिती कर्णाने सोडली. घटोत्कच मायावी युद्धात प्रवीण होता. वासवी शक्तीने त्याचा पाठलाग करून त्याचा ग्रास घेतलाच. अशी ही महाभारतातील टारगेट ओरिएंटेड मिसाईल. सूर्यास्ताच्या आधी जयद्रथाचा वध होणे. (टाईम फिक्सेशन), तुटलेले मस्तक बाणावर वहन करणे (टू कॅरी आऊट -ऑब्जेक्ट), तेथून खूप दूर अंतरावर असलेल्या तपोवनात ते नेणे (डिस्टन्स टारगेटिंग), तेथे तपश्चर्या करीत असलेले त्याचे पिताश्री बृहद्रथ यांच्या मांडीवर ते टाकणे (स्पॉट फिक्सेशन), त्यांनीच दिलेल्या शापाचा परिणाम म्हणून ते जमिनीवर पडणे आणि त्यांच्या मस्तकात स्फोट होणे (फ्युजन अँड ब्लास्ट) असा हा महाभारताकडे वाटचाल करणारा म्हणजे स्वतंत्र भारताचा समर्थ भारत होऊ लागलेला, व्यास, वाल्मीकि, विश्वामित्र, वशिष्ठांचा, शापादपि-शरादपि चे सामर्थ्य असलेला भारत !

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# राऊतांची लोकशाही!

भारत हा एक संसदीय धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताक देश आहे. लोकशाहीची सरळ व्या'या म्हणजे लोकांचे राज्य! अब'हम लिंकन यांनी लोकांनी, लोकांच्या हिताकरिता, लोकांकरवी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही अशी व्या'या केली आहे. आपण लोकशाही शासन व्यवस्था स्वीकारली आहे. अध्यक्षीय आणि संसदीय हे लोकशाहीचे दोन मु'य प्रकार आहेत. संविधानावर आपला देश चालतो. संविधानाने प्रत्येकाला अधिकार दिले आहेत. यात समता, बंधुता, स्वातंत्र्य हे संविधानिक अधिकार दिले आहेत. मूलभूत अधिकार वंश, धर्म, लिंग, जात, पंथ, जन्मस्थान यांच्यावर आधारित भेदभाव न करता लागू केले जातात. हे अधिकार (कायद्याच्या) न्यायालयाद्वारे अटींच्या अधीन राहून वापरावे लागतात. हे अधिकार भारतीय संविधानाचा आधार म्हणून वापरले जातात. लिहिण्याचे, बोलण्याचे अधिकार आहेत. साधारणतः बोलण्याचा अधिकार सर्वात शेवट कुठे आठवतो तो भांडणाच्या शेवटात! वैदर्भीय भाषेत सांगायचे झाल्यास 'जाय जे कराचे थे करून घे,' लोकशाही आहे, मले वाटते ते बोललो! तुम्ही म्हणाल आता काय झालं बुआ? एवढं सर्व सांगायला! पण, एका वृत्तवाहिनीवर दुपारच्या बातम्या पाहता पाहता मु'यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भाषेत सांगायचे झाल्यास 'सकाळी नऊ वाजताचा भोंगा' म्हणजे संजय राऊत यांचे वाक्य! खरे तर संजय राऊत काय बोलतात याकडे लक्ष देत नाही असे मु'यमंत्री फडणवीस यापूर्वी बरेचदा म्हणाले आहेत. राज्याचा सेनापती म्हटला म्हणजे तुमच्या आमच्या सामान्यांनीही ते मान्य केले पाहिजे. परंतु, शेवटी लोकशाही आहे. प्रत्येकाला लोकशाहीने वाचण्या, बोलण्याचे आणि लिहिण्याचे अधिकार दिले आहेत. दुपारच्या बातम्यांमध्ये राज्यात नेमके उबाठाचे की शरद पवार राकाँचे हे कळत नसलेले संजय राऊत यांनी ताजे ताजे केलेले वक्तव्य! ते दिवस भऱ्यात किती दा कशाकशावर बोलतात. पण, दुपारच्या बातम्यांमध्ये ते जे काही बोललेले दाखवले ते त्यांच्या जीभेचे कौतुक करण्यासारखेच म्हणावे लागेल. ते काय म्हणाले, आमचे शरद पवार यांच्यासोबत भांडण नाही. परंतु, नाराजी व्यक्त करणे ही लोकशाही आहे! म्हणजे काहीही करा, असेही वागा, कितीही बोला, रेटून खोटे बोला आणि खापर लोकशाहीवर फोडा! राज्याचे उपमु'यमंत्री एकनाथ शिंदे यांना 'महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार' देण्यात आल्याने संजय राऊत यांना पोटशूळ झाला असल्याचे त्यांनी वारंवार केलेल्या टीकेवरून स्पष्ट होते. राज्याचे तत्कालीन मु'यमंत्री आणि विद्यमान उपमु'यमंत्री असलेले एकनाथ शिंदे यांनी असे काय काम केले की त्यांना हा महादजी शिंदे यांच्या नावाने पुरस्कार दिला, असा प्रश्न करून राऊत थांबले नाही तर त्या संस्थेचीच चौकशी करण्याची मागणी संजय राऊत यांनी केली. शिंदे यांनी महाराष्ट्राला कुठे पुढे नेले असा सवाल करीत असताना त्यांच्या डोळ्यापुढे त्यांचे मालक उद्धव ठाकरे तरळले नसतील काय? उद्धव ठाकरे यांनी अडीच वर्षात तरी कोणते दिवे लावले? कोरोना काळात तर उद्धव ठाकरे मातोश्रीवरूनच फेसबुक लाईव्ह करीत राज्याला धीर देत होते. अडीच वर्षाच्या कार्यकाळात ते कितीदा मंत्रालयात गेले असतील. त्या तुलनेत आनंद दिघे यांच्या गुरुमंत्राने आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनात चालत आपण राज्यात काम करीत असल्याचे तत्कालीन मु'यमंत्री शिंदे सांगत होते. तत्कालीन उपमु'यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शिंदे यांना भरभक्कम पाठराखण होती. शिंदे यांनी शिवसैनिकांना आपल्या हक्कासाठी एकत्र करून उद्धव ठाकरेंच्या सासूरवासातून बाहेर काढत स्वतंत्र उभे राहण्याची जी ताकद दिली त्यामुळे उद्धव ठाकरे खिळखिळे झाले. संजय राऊत हतबल झाले आणि त्यात ते सावरले नसल्याने ते अजूनही लोकांना फोडणारे शिंदे असे म्हणतात आणि आजही वृत्तवाहिनीवर बोलताना त्यांनी आपला त्रागा व्यक्त केला. हा पुरस्कार शरद पवार यांनी दिल्याने राऊत यांनी उघड नाराजी व्यक्त केली. आता त्यावर सारवासारव करीत आमच्यात भांडणं नाहीत. नाराजी व्यक्त करणे ही लोकशाही असल्याचे सांगून त्यांनी हात झटकून टाकले. व्वा संजय राऊत व्वा! लोकशाही या शब्दांचा आधार घेत कसेही आरोप करायचे हा तुमचा नेहमीचाच रडीचा डाव झाला आहे. मागच्या आठवड्यात नाही का तुम्हाला वर्षा बंगल्यात रेड्याची शिंग पुरवले असल्याचे स्वप्न पडले होते. त्या बंगल्यात गोहाटीत बळी दिलेल्या रेड्याची शिंग पुरवले असल्याने मु'यमंत्री 'वर्षा'वर जात नसल्याचे सांगितले होते. आता हे सांगा, समजा शिंदेंनी शिंग गाडले असतीलही तर ते अर्ध्या रात्री पाहायला राऊत तिथे उभे होते का? बरं, ज्यावेळी शिंदे शिंग गाडत होते तेव्हा महाराष्ट्रात अंधश्रद्धा बळावते आहे हे नऊ वाजता पत्रकार परिषद घेऊन पुराव्यांसह खोकलले का नाही? गावखेड्यात नळावर होणाऱ्या भांडणांप्रमाणे बोलत सुटायचे आणि आम्हाला लोकशाहीने अधिकार दिल्याचे म्हणायचे... महाराष्ट्राने तुम्हाला, तुमच्या पक्षाला आणि तुमच्या नेत्याला जागा दाखवल्यानंतरही तुमच्या भूलथापा बंद झाल्या नाहीत. आता राज्याने तुम्हाला अजून कोणता बार द्या. राज्य तेही तयार आहे तुम्हाला घरचा रस्ता दाखवायला. लोकशाहीच्या नावावर खोटे बोलता...

९८८१९०३७६५

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# कोण हर्षवर्धन सपकाळ?





महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत जबर मार खाल्लेल्या काँग्रेसला नवा प्रदेशाध्यक्ष मिळाला आहे. बुलढाण्याचे माजी आमदार ५७ वर्षांचे हर्षवर्धन सपकाळ यांच्या नियुक्तीची घोषणा झाली तेव्हा असाही कोणी नेता काँग्रेसमध्ये आहे हे काँग्रेसवाल्यांना प्रथमच समजले. त्यांच्यासाठी हा धक्काही आहे. अतिशय नवख्या नेत्याला दिले म्हणून काँग्रेसमध्ये चलबिचल आहे. पचलेले नाही, पण उघड बोलून राहुलबाबाशी कोण पंगा घेणार? माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मात्र आश्चर्य वाटल्याचे बोलून दाखवले. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात जेवढे राजकारण झाले, तेवढे कधीही झाले नाही. मात्र या काळात कुठेही दिसले नाहीत ते हर्षवर्धन सपकाळ राहुल गांधींनी बरोब्बर शोधून काढले. काँग्रेसमध्ये कुठलेही पद ही लॉटरी असते. लॉटरी कुणालाही लागू शकते. चार वर्षांपूर्वी नाना पटोले यांना लागली होती. आता शांत, सौम्य हर्षवर्धन सपकाळ यांना लागली. काँग्रेसमध्ये नियुक्त्या कशा होतात, त्याचे एकाहून एक किस्से आहेत. एक सांगतो, १९८२ मध्ये सिमेंट वाटप घोटाळ्यात इंदिरा गांधींनी तेव्हाचे मुख्यमंत्री अब्दुल रहमान अंतुले यांचा राजीनामा घेतला. त्यांच्या जागी बाबासाहेब भोसले यांना आणण्यात आले तेव्हाही आतासारखाच काँग्रेसवाल्यांना धक्का बसला होता. भोसले वर्षभर टिकले. त्यांना मी एकदा विचारले. ही कशी गडबड झाली? भोसले आपल्या स्टाईलमध्ये म्हणाले, ''अहो, काय सांगू? मला मुख्यमंत्री का बनवले आणि का काढले ते मला अजूनही समजलेले नाही.''

सपकाळांचे तसे झाले नसावे असे आपण मानूया. तरीदेखील प्रश्न उरतोच. ज्यांच्या नावाची चर्चा होती ते सतेज पाटील किंवा विश्वजित कदम यासारखे तगडे चेहरे काँग्रेसने का वगळले? या प्रश्नाचे उत्तर या दोघांनी स्वतःच दिले. सतेज पाटील म्हणाले, ''तब्बल चार वर्षे हे पद सांभाळणे कठीण होते. फार फार तर दोन वर्षे मी सांभाळले असते.'' विश्वजित कदम हे दिवंगत नेते पतंगराव कदम यांचे पुत्र. 'आपण शर्यतीतच नव्हतो' असे सांगून कदम मोकळे झाले. आतली माहिती स्फोटक आहे. पटोले यांच्या जागी बसायला कोणीच तयार नव्हते. प्रस्थापित नेत्यांनी नकार दिल्याने श्रेष्ठींपुढे फारसा पर्याय उरला नव्हता असे म्हणतात. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षपद आजच्या हवेत म्हणजे 'ओसाडगावची पाटीलकी' आहे. एकेकाळी काँग्रेस म्हणजे सोन्याचे अंडे देणारी कोंबडी होती. नेत्यांनी कोंबडीच खाऊन टाकली. आता अंडी कशी मिळणार? याच्या याआधीच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला चंद्रपूरची एकमेव जागा जिंकता आली. यावेळी 'फेक नॅरेटिव्ह' चालला. १३ खासदार निवडून आले. आता विधानसभा कुठे जात नाही असे मानून काँग्रेसवाले निश्चित झाले. त्याचा तडाखा बसला. फक्त १६ आमदार कसेबसे वाचले. यापेक्षा वाईट निकाल असूच शकत नाही. एकेकाळी काँग्रेसच्या तिकिटावर दगडही निवडून यायचा. आंध्रमधले पी. व्ही. नरसिंहराव रामटेकमधून निवडून आले, काश्मीरचे गुलाम नबी आझाद वाशिममधून जिंकले. 'लाठी गोली खायेंगे, इंदिरा को लायेंगे' असा तेव्हा मामला होता. आताशा काँग्रेसकडे दबंग नेतेच नाहीत. राहुल गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेसने तीन निवडणुका गमावल्या. पुढेही गमावत राहतील. राष्ट्रीय पक्ष म्हणून अजूनही धुगधुगी आहे, पण भविष्य नाही. जे कोणी नेते आहेत ते त्या मतदारसंघापुरते आहेत. गळेकापू गटबाजी आहे. प्रत्येक नेत्याची स्वतःची काँग्रेस आहे. मतदारसंघाबाहेर मात्र कोणी मोजत नाही. लोकांनी मोजावे अशी त्या नेत्यांचीही इच्छा नाही. आपापला गल्ला सांभाळण्याच्या नादात आपले किल्ले केव्हा पडले ते त्यांनाही कळले नाही. एकेकाळी भाजपवाल्यांना गावात चहा-नाष्ट्यालाही घर मिळत नसे. आज उलटे चित्र आहे. ही सूज नाही. लोकांना विकास हवा आहे, रिझल्ट हवा आहे. केवळ भाषणबाजीत लोकांना जिंकण्याचे दिवस गेले. काँग्रेसवाले हे लक्षात घ्यायलाच तयार नाहीत. लोक मोदींना कंटाळले म्हणजे आपल्याकडेच येतील, असे त्यांना वाटते. हीच मानसिकता राहिली तर 'एकेकाळी काँग्रेस नावाचा पक्ष होता' असे पुढच्या पिढ्या म्हणतील. शेकाप, डावे पक्ष यांची उदाहरणं डोळ्यांपुढे आहेत. शरद पवार थकले आहेत. उद्धव ठाकरे पंक्चर झाले आहेत. यापुढे प्रादेशिक पक्षांना, त्यांच्या नेत्यांना भविष्य नाही.

या पृष्ठभूमीवर हर्षवर्धन सपकाळ यांची नियुक्ती काय सांगते? सध्या सपकाळांचा 'हनिमून पिरेड' सुरू आहे. त्यामुळे त्यांचे कौतुकच सुरू आहे. काँग्रेसच्या काही नेत्यांनी तर त्यांना 'उत्तम संघटक'ही म्हटले आहे. पण समोरची वाटचाल खडतर आहे. लवकरच महापालिका निवडणुका आहेत. जिल्हा परिषद निवडणुका आहेत. सर्वांना सोबत घेऊन चालायचे आहे. सपकाळ चालतीलही. पण सहकारी टांग मारणार नाहीत याची काय गॅरंटी? शरद पवार, उद्धव ठाकरे या महाविकास आघाडीतल्या नेत्यांना सांभाळायचे म्हणजे अवघड सर्कस आहे. नाना पटोले कसेही असले तरी आक्रमक होते. फिरत होते. खास म्हणजे मीडियाच्या प्रकाशझोतात राहत होते. सपकाळांच्या बाबतीत चेहऱ्याचा प्रश्न येऊ शकतो. राहुल गांधी यांचा जवळचा माणूस एवढाच सध्या सपकाळ यांचा बायोडाटा दिसतो. त्यांच्या बुलढाण्यातही शिंदे सेनेचा आमदार आहे संजय गायकवाड. २०१४ ते २०१९ या काळात सपकाळ आमदार होते. म्हणजे जुनी गोष्ट नाही. तरीही कोण सपकाळ? हे काँग्रेसवाल्यांना आठवावे लागते, ही गोष्ट बरेच सांगून जाते. हल्लीचे राजकारण वेगवान झाले आहे. सारखे चौके-छक्के मारत असाल तरच लोकांच्या लक्षात राहाल. नाहीतर सायडिंगला फेकले जाल. मात्र यावेळी प्रदेशाध्यक्ष नेमताना राहुल गांधींनी नवा प्रयोग केला आहे. महाराष्ट्राचा प्रदेशाध्यक्ष नेहमीच सीएम स्पर्धेतील नेता राहिला आहे. प्रथमच सर्वसामान्य कार्यकर्ता काँग्रेसने दिला आहे. कुठल्याही वादात नसलेला, गटात नसलेला अध्यक्ष सेनापती म्हणून दिला आहे. पटोले ओबीसी होते, सपकाळ मराठा आहेत. आपल्या राज्यात मराठा २८ टक्के आहेत. ओबीसी ५२ टक्के आहेत. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या भागात मराठा व्होट बँक प्रभावी आहे. जातीयवादी शक्तींच्या विरोधात आपण लढणार आहोत, असे सपकाळ यांनी आपल्या पहिल्या दिवशी जाहीर केले. ते आपली जात 'भारतीय' अशी लिहितात हे आणखी एक विशेष. सध्याच्या हिंदुत्वाच्या वादळात राहुल गांधींना जिथे गळ्यातले जानवे दाखवण्याची वेळ आली होती तिथे सपकाळ कसे लढणार याची उत्सुकता राहील. तुम्हाला आश्चर्य वाटेल, सपकाळ यांचे कुठलेही शाळा-कॉलेज नाही. साखर कारखाना नाही. एकदम विनोबा-बाबा आमटे कल्चरची व्यक्ती आहे. मुंबईमध्ये पदग्रहण समारंभाला ते आले तेव्हा सपकाळ गिरगावच्या सर्वोदय आश्रमात मुक्कामाने होते. जमिनीवर झोपले. दुसरा कुणी असता तर ताजमहाल हॉटेलमध्ये उतरला असता. आपल्या अशा वागण्याने सपकाळ इतर नेत्यांची नक्कीच पंचाईत करणार आहेत. आश्रम सोडा, आमदार निवासात किती आमदार उतरतात? हा संशोधनाचा विषय आहे. काँग्रेस बांधायची, वाढवायची म्हटले तर सपकाळांना आधी स्वतःची स्वीकारार्हता सिद्ध करावी लागेल. माझी चिंता वेगळी आहे. प्रस्थापित नेते सपकाळ यांना गंभीरपणे घेतील का? हा त्रास नाना पटोले यांनाही झाला होता. 'आम्ही दिल्लीतल्या नेत्यांशीच बोलतो' असे म्हणणाऱ्या नेत्यांची संख्या कमी नाही.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### डीजेसंबंधी पोलिस अधीक्षकांचे विचार

परवा उमरखेड येथे बोलताना यवतमाळचे जिल्हा पोलिस अधीक्षकांनी डीजेसंबंधी चिंता व्यक्त केली. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावयास पाहिजे. त्यांनी डीजे कॅन्सरसारखा असून तो सर्व सामान्यासाठी हानिकारक असल्याचे म्हटले आहे. (संदर्भ तरुण भारत दि. १७ फेब्रुवारी), आणि ते खरे आहे. डीजेचा आवाज इतका जास्त असतो की, हृदयात धडधड होते. आता तर १०-१५ लाऊडस्पीकर, निरनिराळ्या प्रकारचे फ्लड लाईट्स आणि त्यावर कर्कश संगीत! सगळे असह्य होते. त्या लाईट्समुळे तर पुढचे दिसतही नाही. वाहन चालविणे कठीण होते. एकेका चौकात १५-२० मिनिटे नाच सुरू असतो. लोक कंटाळून जातात. तेव्हा स्वतः उच्च पदावर असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांनी याबद्दल सुतोवाच केले. त्यामुळे आता तरी सरकारने डीजेबद्दल योग्य निर्णय घ्यावा ही विनंती. एका अत्यंत संवेदनशील विषयावर विचार मांडल्याबद्दल पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांचे आभार.

**चंद्रशेखर खापरे**/उमरखेड

### 'हायफाय' म्हणजेच संस्कार की परंपरा?

मध्यंतरी एक पोस्ट वाचण्यात आली. प्रत्येक गोष्टीत जप करून आपण खापर अन्य व्यक्तीवर फोडत राहतो याचा अनुभव वाचायला मिळाला. धकाधकीच्या काळात आपण आपले संस्कार विसरतो आहोतच; पण त्याचे बाळकडूसुद्धा आपण आपल्या नवीन पिढीला देऊ शकत नाही, याचे दुःख वाटते. सत्यनारायणाच्या पूजेची मूलभूत तयारी गुरुजींनीच करायची. कार्यक्रमाची यथासांग मौज होते, पण त्याची तयारी गुरुजींनीच करायची. सोहळ्याचा दिमाख बहुचर्चित गौरवाचा, पण त्यातील सर्व पूजेच्या संस्कारित विधींना काट-छाट गुरुजींनीच द्यायची. कारण ना वेळ असतो हॉलच्या मालकांना, ना वेळ मिळतो यजमान मंडळींना. उपनयनाच्या मातृभोजनात चांदीच्या ताटापासून ऐश्वर्याचे प्रदर्शन घडते. सोन्याचे जानवे बटूला दिले जाते, पण बटूला वेदशास्त्राचे शिक्षण देण्यासाठी गुरुजींना पाचारण केले जात नाही आणि गुरुजींनी संध्याही शिकवली नाही हे दूषणाचे वक्तव्य चारचौघात केले जाते. पाठशाळेत अध्ययन केलेले गुरुजी अनेकांना नकोसे वाटतात.

## वाचक पत्रे



कारण त्यांच्या वेळेत ते कार्य 'उरकत' नाहीत. या सर्वांना संस्कृतीचे जतन म्हणायचे की हायफाय संस्कार? पाठशाळेत न गेलेल्या किंवा थोडेसे शिक्षण प्राप्त झालेल्या गुरुजींनीसुद्धा 'मी शास्त्री झालो' या भ्रमात न राहता उत्तम गुरुजींच्या साहाय्याने यजमानांची धार्मिक कृत्य करून द्यावीत व आपणही शुचिर्भूत अंतःकरणाने समोरच्याला दिलेला शब्द पाळून त्याच्या श्रद्धेची जपणूक करावी. आपल्या अंगीकृत उत्तुंग पेशाचा आदर वाढवला तरच धर्म टिकेल; द्रव्य मिळविणे हेच केवळ जीवनाचे ध्येय असत नाही.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### भारतात रस्ते अपघातात दररोज होतो ४६२ लोकांचा मृत्यू


सदर बातमी ८ फेब्रुवारी २०२५ च्या तरुण भारतात वाचण्यात आली. आकडेवारी निश्चितच धक्कादायक आहे. मृत्युमुखी पडलेल्यांपैकी बहुतेक जण २० ते ३५ वयोगटातील आहे. सन २०२२ मध्ये रस्ते अपघातात सुमारे १.६८ लाख लोकांचा मृत्यू झाला. ही माहिती रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने प्रकाशित केलेल्या अहवालातील आहे. दरवर्षी रस्ते अपघातांमध्ये वाढच होत आहे. समृद्धी मार्गावर व इतर महामार्गांवर वेग नियंत्रित करण्याकरिता स्पीड गन्स्? (वेग मोजण्याचे यंत्र) चा वापर व्हायला हवा. ज्या ठिकाणी रोड सिग्नल्स आहेत त्या प्रत्येक चौकात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावे. जेणेकरून सिग्नलचे उल्लंघन करणाऱ्याला काहीही उजर राहणार नाही. शहरात अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी आपल्याला चौकात सिग्नल, वाहतूक पोलिस व सीसीटीव्ही कॅमेरे या सर्वांची गरज आहे असे जाणवते.

काही तरुण मुलांना रस्त्यावरील चौकातील सिग्नलचे उल्लंघन करण्यात थ्रील वाटते. हे फारच धोकादायक आहे. अशा थ्रीलमुळे या तरुणांना व इतर लोकांनाही जिवाचा धोका असतो. बऱ्याच लोकांना इच्छित स्थळी पोहोचण्यासाठी आपले वाहन जास्त वेगाने चालवणे गरजेचे होते, कारण ते घरून निघताना उशिरा निघतात. हीच मंडळी चौकातील सिग्नल तोडताना आढळतात. रस्त्यावरील अपघातांचे व त्यामुळे होणाऱ्या लोकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य परिवहन अधिकाऱ्यांनी कठोर उपाययोजना जरूर कराव्यात, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## संक्षिप्त वृत्त



### माजी सैनिक नगरातून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि.२० फेब्रुवारी-**

शहरातील विजापूर रोडवरील माजी सैनिक नगरातून चोरट्याने ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत नारायण शंकर भालेराव (वय २१, रा. माजी सैनिक नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नारायण भालेराव यांनी त्यांची केए ३२ एचबी ७११० क्रमांकाची दुचाकी ही १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस हवालदार शिर्के पुढील तपास करीत आहेत.

### वासु व्हटकर लिखित 'काळ रात्री जगता जगता' काव्यसंग्रहाचे उद्या प्रकाशन

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

सोलापुरातील लेखक,कवी, गायक कलाकार वासु व्हटकर लिखित काळ रात्री जगता जगता या काव्यसंग्रहाचे प्रकाशन शनिवार दि. २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता सोलापुरातील समाजकल्याण केंद्र येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती सच्चिदानंद व्हटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. सामाजिक कार्यकर्त्या ममता सपकाळ यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिका प्रा. श्रुती वडगबाळकर , डॉ. नसीम पठाण, कवी माधव पवार,कवी मारुती कटकधोंड , कवयित्री रेणुका बुधाराम आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या कवितासंग्रहात विविध आशयघन कवितांचा समावेश आहे. वाचनीय असे पुस्तक सर्वांसाठी उपलब्ध होत आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन लेखक वासु व्हटकर यांनी केले आहे.



### महामानव डॉ. आंबेडकर ट्रेड युनियनतर्फे नूतन आयुक्त डॉ. ओंबासे यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने महापालिकेचे नूतन आयुक्त डॉ.सचिन ओंबासे यांचा विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित बुद्ध आणि त्यांचा धम्म हा पवित्र ग्रंथ, शाल,पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. आयुक्त शितल तेली - उगले यांनी सोमपा प्रशासन आयुक्त म्हणून अतिशय चांगल्या प्रकारचे काम केल्याबद्दल सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी ट्रेड युनियनचे पदाधिकारी व बदली रोजंदारी व महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनपातील सहअभियंता नाईकवाडी, कनिष्ठ अभियंता खानापूरे यांच्या पोलीस कोठडीत वाढ

## परवानाधारक ४ अभियंत्यांना २ दिवसांची पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी -**

महापालिकेतील बांधकाम परवाना विभागातील सहाय्यक अभियंता झाकीर हुसेन आलाबक्ष नाईकवाडी व कनिष्ठ अभियंता श्रीकांत बसन्ना खानापुरे यांना महापालिकेची फसवणूक केल्याप्रकरणी न्यायालयाने आणखी दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. तर तपासामध्ये पोलिसांनी अटक केलेल्या ४ परवानाधारक अभियंत्यांना दोन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश मुख्य न्यायदंडाधिकारी भंडारी यांनी दिले.

जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२२ या दरम्यान महापालिकेतील बांधकाम परवाना विभागात सहाय्यक अभियंता झाकीर हुसेन आलाबक्ष नाईकवाडी व कनिष्ठ अभियंता श्रीकांत बसन्ना खानापुरे हे महापालिकेच्या बांधकाम विभागात अधिकारी म्हणून काम पाहत होते. त्या काळात त्यांनी महापालिकेची जाणीवपूर्वक फसवणूक केली. त्यांनी एकूण ५६ बांधकाम परवाना मध्ये महापालिकेचे सुमारे दोन कोटी सात लाख ८८ हजार ३५ रुपयांचे नुकसान केल्याचे दिसून आले. याप्रकरणी बांधकाम विभागाचे उपअभियंता बसवराज म ठपती यांनी पोलिसात तक्रार दिली होती.

दरम्यान १८ फेब्रुवारी रोजी सदर बझार पोलिसांनी नाईकवाडी आणि खानापुरे या दोघांना अटक केली होती. या दोघांना न्यायालयाने दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले होते. पोलिस कोठडीमध्ये या दोघांकडे करण्यात आलेल्या तपासावरून सदर बझार पोलिसांनी म हापालिकेचे परवानाधारक अभियंते सादीक शेख, खुद्दूस बागवान, नाजीब शेख, मोहसीन शेख (सर्व रा. सोलापूर) यांना अटक केली. नाईकवाडी, खानापूरे यांच्या पोलिस कोठडीची मुदत संपल्याने या दोघांना व अटक करण्यात आलेल्या चौघांना एकत्रित २० फेब्रुवारी रोजी न्यायालयात हजर केले असता या सर्वांना दोन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायदंडाधिकारी भंडारे यांनी दिले.

यात सरकारतर्फे ॲड. अमर डोके यांनी तर आरोपीतर्फे ॲड . शशी कुलकर्णी, ॲड. गुरुदत्त बोरगावकर, ॲड. रणजित चौधरी यांनी काम पहिले.


मनोरमा परिवार अंतर्गत

**अंकुर सर्व व्यावसायिक नागरी सह. पतसंस्था मर्या., सोलापूर**

विमल कॉम्प्लेक्स, माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर

**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर

६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर

९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

श्री. राचण्णा माळसिध्दप्पा कटारे, व्हा. चेअरमन (मो. ९४२१०७५४९८)

प्राची अनिल गोसावी, व्यवस्थापिका (मो. ७०५८९५५९८०)


# थोबडे वस्तीत श्री संत शिरोमणी रोहिदास जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

येथील लक्ष्मी पेठेतील जुना देगाव नाका येथील थोबडे वस्तीतील श्री संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती विविध उपक्रमाने साजरी झाली.

श्री सदगुरू गेणुबुवा संत सेवा भजनी मंडळ, माता नवरात्र तरुण मंडळ व राणी लक्ष्मीबाई बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जयंती साजरी केली. बुधवारी (ता. १२) दिवसभरात रांगोळी स्पर्धा, रक्तदान शिबीर व भजन संध्या या कार्यक्रमाने घेण्यात आले.

प्रारंभी संत रोहिदास महाराज मूर्तीची प्रतिष्ठापना व पूजा समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांच्या हस्ते झाली. रांगोळी स्पर्धेचे उद्घाटन सोनवणे यांच्या हस्ते झाले. दुपारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.




सायंकाळी महाराष्ट्र व गोवा राज्य बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ विधिज्ञ मिलिंद थोबडे व कैकाडी समाज अध्यक्ष नागेश गवळी यांच्या हस्ते रांगोळी स्पर्धेतील विजेत्या महिलांचा व मुलींचा सत्कार करण्यात आला. प्रथम क्रमांक उषाताई लांबतुरे यांना पैठणी तर श्रद्धा पोतदार व मनिषा पारवे यांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक साडी भेट देण्यात आली.

समाजातील मृदंग भूषण पुरस्कार प्राप्त पखवाज वादक दिलीप वाघमारे, तलाठी परीक्षा उत्तीर्ण लक्ष्मण शिंदे, मुंबई कोर्ट स्टेनो परीक्षा उत्तीर्ण स्वप्निल लांबतुरे, मुंबई पोलीस परीक्षा उत्तीर्ण ऋतुजा शिंदे, मनपा सोलापूर आरोग्य समिती वर सदस्य निवडीनिमित्त अनिता गवळी आणि राज्य स्तरीय तलवारबाजी मेडल प्राप्त गणेश लांबतुरे यांचा सत्कार करण्यात आला.

सायंकाळी ८ ते १० ह. भ. प. श्रीकांत शिंदे यांचा भजन संध्या कार्यक्रम झाला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अध्यक्ष दत्ता बनसोडे , विशाल शिंदे, उपाध्यक्ष आकाश लांबतुरे, सचिव अविनाश वंजारी, समाधान वाघमारे अनिल गाडे, परमेश्वर वाघमारे, कविता लांबतुरे , राणी कवडे , विठ्ठल मेट्रे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन जि.प. शिक्षक ज्ञानेश्वर लांबतुरे यांनी केले.

# शहर व जिल्ह्यात तिघांचा आत्महत्येचा प्रयत्न

## राळेराससह बापूजीनगर व दत्त नगरमधील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी -**

शहर व जिल्ह्यात गळफास घेऊन आत्महत्या करणाचा प्रयत्न करणाऱ्या तीन घटना घडल्या आहेत.

जिल्ह्यातील राळेरास (ता. बार्शी) येथे १८ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. अथर्व विलास भोसले (वय १८, रा. राळेरास, ता. बार्शी) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या युवकाचे नाव आहे. १९ फेब्रुवारी रोजी रात्री सव्वा नऊच्या सुमारास राहत्या घरी अज्ञात कारणाने ओढणीच्या सहाय्याने लाकडी खुटीला गळफास घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यास नातेवाईकांनी खाली उतरवून उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात निखिल भोसले यांनी दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

दुसऱ्या घटनेत शहरातील बापूजी नगरात तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. दत्तप्रसाद काशिनाथ म्हेत्रे (वय ३६, रा. प्रकाश बापूजी हौसींग सोसायटी, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल असलेल्या तरूणाचे नाव आहे. २० फेब्रुवारी रोजी सायंकाळी राहत्या घरी दत्तप्रसाद यांनी राहत्या घरी दारूच्या नशेत अज्ञात कारणावरून साडीच्यास सहाय्याने गळफास घेण्याचा प्रयत्न केला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर नातेवाईकांनी दत्तप्रसाद यास खाली उतरवून अक्षय म्हेत्रे यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

तिसऱ्या घटनेत शहरातील दत्त नगरात राहणाऱ्या एका व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. लक्ष्मीनारायण मुकुंद द्यावनपल्ली (वय ५३, रा. १८२८ दत्त नगर, नार्थ बालाजी मंदीराच्या पाठीमागे, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. १९ फेब्रुवारी रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास राहत्या घरी लक्ष्मीनारायण यांनी राहत्या घरी अज्ञात कारणावरून साडीच्यास सहाय्याने गळफास घेण्याचा प्रयत्न केला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर नातेवाईकांनी दत्तप्रसाद यास खाली उतरवून लोकेश बोल्ली यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# वादातून पत्नीचा पतीवर चाकू हल्ला

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी -**

घरगुती वादातून पत्नीने पतीवर चाकूने हल्ला करून पतीस जखमी केले. राजेंद्र शिवाजी पाटील (वय ५२, रा. औज, आहेरवाडी, ता. दक्षिण सोलापूर) असे जखमी पतीचे नाव आहे. १९ फेब्रुवारी रोजी रात्री आकराच्या सुमारास औज येथील राहत्या घरी असताना घरगुती वादातून पत्नी कुंदन हिने राजेंद्र यांच्या डाव्या हातावर चाकूने मारून जखम केल्याने राजेंद्र यांना भाऊ शंकर पाटील यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.


**GANDHI NATHA RANGJI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE & HOSPITAL, SOLAPUR**

13, Budhawar Peth, Jain Boarding Campus, Balives, Solapur-413002.
Phone College : (0217) 2624900 / 01, Prathisthan : (0217) 2324187
Fax No. (0217) 2624900 Email : gnrhmc09@gmail.com
(Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik)

**WANTED**

| Sr. No. | Dept. / Subject | Vacant Post: Professor | Associate Professor (Reader) | Assistant Professor (Lecturer) |
|---|---|---|---|---|
| 1. | Homoeopathic Materia Medica | -- | 01 (Open) | 01 (SC) |
| 2. | Organon of Medicine Homopathic Philosophy Fundamentals | 01 (Open) | -- | 01 (Open) + 01 (SC) |
| 3. | Homoeopathic Repertory & Case Taking | 01 (Open) | 01 (Open) | 01 (Open) + 01 (SC) |
| 4. | Anatomy | 01 (Open) | -- | 01 (SC) |
| 5. | Physiology including Biochemistry | 01 (Open) | -- | 01 (Open) + 01 (SC) |
| 6. | Community Medicine Research Methodology & Biostatistics | -- | 01 (Open) | -- |
| 7. | Pathology & Microbiology | 01 (Open) | -- | -- |
| 8. | Surgery | -- | 01 (Open) | -- |
| 9. | Obstetrician & Gynecology | -- | 01 (Open) | -- |
| 10. | Practice of Medicine with essentials of Pharmacology | 01 (Open) | -- | 01 (SC) |

Qualification, experience and pay scales are as per CCH New Dehli/MUHS, Nashik Norms. Eligible candidates should send resume and copies of qualifications certificates, experience certificate at College Office within 20 days from the date of publication of Advertisement.

Mr. Sanjay Gandhi
President

Sri Swami Samarth Ads


# पुण्यात उद्यापासून विधिलिखित ज्योतिष त्रिदशकोत्तर सोहळा

## महारभारतातील कलाकारांची उपस्थिती

**पुणे, दि. १८ फेब्रुवारी-**

सुप्रसिद्ध विधिलिखित ज्योतिष कार्यालयाचे संचालक आदिनाथ मच्छिंद्र साळवी आणि ॲडव्होकेट वैशाली आदिनाथ साळवी यांच्या वतीने विधिलिखित ज्योतिष त्रिदशकोत्तर सोहळा आयोजित केला जाणार असून हा सोहळा २२ ते २४ फेब्रुवारी दरम्यान म्हात्रे पूलाजवळ असलेल्या डी. पी. रोड येथील गोल्डन लिफ बँक्वेट्स लॉन्स येथे होईल, अशी माहिती या सोहळ्याचे कार्याध्यक्ष डॉ. दत्तप्रसाद चव्हाण यांनी दिली.

या आगळ्या वेगळ्या सोहळ्याचे उदघाटन महाभारतातील भीष्माचार्यांची भूमिका साकारलेले मुकेश खन्ना यांच्या हस्ते शनिवार २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमासाठी म हाभारतामध्ये अर्जुनाची भूमिका केलेले फिरोज खान यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे तर २४ फेब्रुवारी रोजी समारोपाच्या सोहळ्यास महाभारतातील कृष्णाच्या भूमिकेमुळे घराघरांत पोचलेले नितीश भारद्वाज हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. या शिवाय अनेक म ान्यवर या तीन दिवसीय सोहळ्यामध्ये उपस्थित असणार आहेत. या कार्यक्रमा दरम्यान संपूर्ण भारतभरातील ३३ नामवंत वक्त्यांचे मार्गदर्शन उपस्थितांना लाभणार आहे. या सोहळ्या दरम्यान मरणोत्तर विधिलिखित ज्योतिष महर्षी पुरस्कार आणि विधिलिखित ज्योतिष महर्षी पुरस्कार उपस्थित सन्माननीय मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत. तसेच कै. मच्छिंद्र नामदेव साळवी स्मृती निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण श्रीमती रंगुबाई मच्छिंद्र साळवी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.


**ब्राह्मण समाज सेवा संघ**
डफरीन चौक, सोलापूर

**१०४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा**

ब्राह्मण समाज सेवा संघाच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची सन २०२३-२०२४ ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २३/०२/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता संस्थेच्या कार्यालयात डफरीन चौक, सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे. सर्व सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती. दि. २०/०२/२०२५

सचिव
श्री. महेंद्र देवस्थळी
ब्राह्मण समाज सेवा संघ


# एसव्हीसीएस होटगी प्रशालेत दहावी विद्यार्थ्यांना निरोप

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी प्रशालेतील दहावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक शशिकांत राम पुरे साहेब होते तसेच होटगी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य महांतेश कौलगी सर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

व्यासपीठावर प्राचार्य नंदकुमार धाये, पर्यवेक्षक श्रीशैल व्हनमाने, तंत्र विभाग प्रमुख केदार गंगदे आदी उपस्थित होते. व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दहावीच्या विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचे स्वागत केले. त्यानंतर काही विद्यार्थी वर्ग प्रतिनिधींनी शाळेला भेट वस्तू प्रदान केले.यावेळी नववीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.काही निवडक विद्यार्थ्यांनी मनोगतातून शाळा व शिक्षकांसंबधी कृतज्ञता व्यक्त केले. यावेळी निवृत्त प्राचार्य महांतेश कौलगी, प्राचार्य नंदकुम ार धाये, पर्यवेक्षक श्रीशैल व्हनम ाने, तंत्र विभाग प्रमुख केदार गंगदे, मेरु आदींनी विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी, कष्ट, परिश्रम घेऊन परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन आई-वडिलांचे नाव लौकिक करण्याचे आवाहन केले.

सूत्रसंचालन गीता पुजारी व चैत्राली टोणे यांनी केले तर वर्षा दोडतले हिने आभार मानले. इयत्ता नववी च्या विद्यार्थ्यांकडून अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख भानुदास राठोड यांच्यासह सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका शिक्षक,शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले.


**नीरा उजवा कालवा विभाग, फलटण**

**जाहीर प्रसिध्दी पत्रक**

जावक क्र. नीउका/४२४/२०२५ दिनांक ०७/०२/२०२५

नीरा उजवा कालव्याच्या लाभक्षेत्रातील सर्व लाभधारकांना याव्दारे सूचित करण्यात येते की, सध्याच्या दुष्काळजन्य टंचाई परिस्थितीमुळे नीरा उजवा कालव्यामधील अनधिकृत सायफन्स व पाईप तात्काळ काढून घेण्यात याव्यात. अन्यथा सदरचे अनधिकृत सायफन्स व पाईप तोडण्यात येतील व होणाऱ्या नुकसानीस संबंधित लाभधारक सर्वस्वी जबाबदार राहतील. तसेच तीव्र पाणी टंचाई लक्षात घेता आवर्तन कालावधीत कालव्याचे लगतच्या क्षेत्रातील विज पुरवठा बंद करण्यात येणार आहे याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
(शि.दि. जाधव)
कार्यकारी अभियंता
नीरा उजवा कालवा विभाग, फलटण

विमाका-पुणे-जाहि-३७०-२०२४-२५



**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर**

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

**जाहिर प्रसिध्दीकरण**

नमुना झेड (नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) पहा)

**स्थावर मालमत्ता ताब्यात घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री कृष्णाहरी यल्लप्पा मैसूर c/o श्री महावीर अर्बन को. ऑप बैंक लि., सोलापूर हि संस्था महाराष्ट्र सहकारी कायदा १९६१ अन्वये यादीतील ऋणको (थकबाकीदार) याने रक्कम जमा करण्यास कसूर केले आहे. त्याअर्थी खाली सही करणाऱ्याने खालील नमूद यादीतील ऋणको यांची स्थावर मिळकतबाबत जप्तीची नोटीस देऊन व रजी. गहाणखत अन्वये गहाण ठेवलेली वा पुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे. ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला आणि सर्व नागरिकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार प्रतीकात्मक (सिम्बोलिक) ताबा घेतलेला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, खाली नमूद केलेल्या यादीतील मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को. ऑप बँक लि., सोलापूर या संस्थेच्या खाली नमूद केलेल्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यात होणारे इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील, याची नोंद घ्यावी.

| अं. क्र. | वसुली दाखला व दिनांक | थकबाकी कर्जदाराचे/ जामीनदाराचे नाव | दिनांक अखेर व रक्कम व त्यावरील व्याज + मुद्दल + दंड व्याज + कोर्ट खर्च + इतर खर्च | गावाचे नाव | सि.स.नं./ गट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महावीर बँक / कलम १०१/१५४१/२०२३-२४ दि. ०१/०२/२०२४ व महावीर बँक/कलम १०१/१५४०/२०२३-२४ दि. ०१/०२/२०२४ | दत्तात्रय हरिबा शेळके (मंगलमुर्ती ट्रेडर्स प्रो.प्रा. महानंदा महादेव हदरे यांचे जामीनदार) | रु. २१,९९,४६५/- (अधिक दि. ०१/०२/२०२४ पासून पुढील व्याज, दंड व्याज व इतर खर्च) व रु. २२,१३,४६५/- पासून पुढील व्याज, दंड व्याज व इतर खर्च) असे एकूण येणे रु. ४४,१३,१९५/- अधिक पुढील व्याज व खर्च | डि व सब डि सोलापूर पैकी ता. दक्षिण सोलापूर पैकी सोलापूर जिल्हा परिषद हद्दीमधील मौजे बोरामणी येथील | गट नं. २६४/१/अ | याचे एकूण क्षेत्र ४.००.०० हे. आर. चौ.मी. पैकी क्षेत्र १.१३.०० हे. आर. चौ.मी. व पोट खराब क्षेत्र ०.०६.०० यांसी आकार ५ रु. ४० पैसे |

वरील सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा, ताबापत्रावर सही करून, खाली नमूद वसुली अधिकारी यांच्याकडे या जाहिर प्रसिध्दीकरण दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत घ्यावा अन्यथा, तसे न केल्यास मुदतीनंतर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे अर्ज करून पार पाडले जाईल व तसेच उपरोक्त स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल, तरी त्यापुढील होणाऱ्या सर्व परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

स्थळ : सोलापूर
दिनांक : २०/०२/२०२५

सही/-
विशेष वसुली व विक्री अधिकारी
श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### स्वियातेकला नमवून ॲण्ड्रिव्हा उपांत्य फेरीत



**दुबई** : प्रेरणादायक मिरा ॲण्ड्रिव्हाने आपल्या कारकिर्दीत पहिल्यांदाच जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकाच्या इगा स्वियातेकचा ६-३, ६-३ असा पराभव करून दुबई टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. १७ वर्षीय रशियन खेळाडूने या विजयासह कारकिर्दीतील पहिल्या डब्ल्यूटीए १००० स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. बुधवारी जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाच्या आर्यना सबालेन्का बाहेर पडल्यानंतर पोलंडची इगा स्वियातेक स्पर्धेतून बाहेर पडणारी आणखी एक अव्वल मानांकित खेळाडू बनली. २००१ मध्ये पहिल्यांदाच झालेल्या या स्पर्धेनंतर मिरा ही दुबईतील सर्वात तरुण उपांत्य फेरीत पोहोचणारी खेळाडू ठरली आहे. गत वर्षी पहिल्या फेरीतच ती बाहेर पडली होती, मात्र यावर्षी तिने आपल्या कामगिरीत चांगलीच सुधारणा केली आहे. प्रामाणिकपणे सांगायचे तर, मी सामन्यापूर्वी खूप घाबरली होती. मी गत वर्षी सिनसिनाटीमध्ये खेळली. तिथे इगा स्वियातेकने उपांत्यपूर्व फेरीचा सामना जिंकला होता व तो सामना खूपच कठीण होता, असे मिराने सांगितले. ■

### अंधांसाठी भारत, बांगलादेश टी-२० क्रिकेट मालिका

**बंगळुरू** : क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडियाच्या वतीने २२ ते २७ फेब्रुवारी दरम्यान मणिपाल अकादमी ऑफ हायर एज्युकेशन , बंगळुरू येथे भारत आणि बांगलादेश यांच्यात पुरुषांची द्विपक्षीय टी-२० क्रिकेट मालिकाचे आयोजन करण्यात येणार आहे. निवड समितीने १८ सदस्यीय संघाची घोषणा केली आह. राष्ट्रीय स्पर्धेत त्उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे खेळाडूंची या मालिकेसाठी निवड करण्यात येणार आहे. या मालिकेत पाच टी-२० सामने खेळले जाणार आहे. उल्लेखनीय म्हणजे, आठ खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर पदार्पण करतील. अंधांसाठी पुरुषांची द्विपक्षीय टी-२० क्रिकेट मालिका २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता एमएएचई, बंगळुरू परिसरात उद्घाटन समारंभाने सुरू होईल.

### सिंहगड स्कूलच्या सिद्धराज कुसुमडे याची राष्ट्रीय नेटबॉल स्पर्धेसाठी निवड

**पंढरपूर,दि. २० फेब्रुवारी-**

भिवानी हरियाणा येथे २६ ते २८ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या तिसरी ज्युनियर



राष्ट्रीय नेटबॉल स्पर्धेसाठी सिंहगड पब्लिक स्कूलचा सिद्धराज कुसुमडे याची निवड झाली. त्यापूर्वी भंडारा येथे तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिर होणार आहे. सिद्धराजचे संस्थापक एम. एन. नवले, कॅम्पस डायरेक्टर कैलास करांडे, प्राचार्या स्मिता नवले, मुख्याध्यापिका स्मिता नायर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक बुद्धिबळ स्पर्धा २६ फेब्रुवारीला

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

सुंदर मल्टीपर्पज हॉल येथे बुधवार २६ फेब्रुवारी रोजी ऑल इंडिया ड्रगिष्ट अँड केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त चॅम्पियन चषक मालिका दुसरी मधील स्पर्धा क्रमांक एक सुरू होणार आहे. या स्पर्धेचे आयोजन श्री रमा जगदीश महिला बहुउद्देशीय उत्कर्ष संस्थेच्या वतीने व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने होणार आहे. या स्पर्धेत सुमारे तीस हजार रुपयांची बक्षिसे चषक व रोख रक्कम मिळून देण्यात येणार आहेत. ८, ९, १०, ११, १४, १७, १९ या वयोगटातील विजयी झालेल्या खेळाडूंना तीन हजार रुपयांचे बुद्धिबळाचे घड्याळ मालिके च्या समाप्तीनंतर बक्षीस देण्यात येणार आहे. ही स्पर्धा १५५० पेक्षा कमी अंतरराष्ट्रीय गुणांकन असलेल्या सर्व जिल्ह्यातील खेळाडू साठी आयोजित केली आहे. तरी सर्व खेळाडूंनी संस्थेचे सचिव शरद नाईक यांच्याशी ९४२३३३७३४६ या क्रमांकावर नाव नोंदणीसाठी संपर्क करावा तरी या स्पर्धेत सोलापूर व आसपासच्या जिल्ह्यातील खेळाडूंनी भाग घेऊन ही स्पर्धा संपन्न करावी असे आवाहन श्री रमा जगदीश महिला बहुउद्देशीय उत्कर्ष संस्थेचे अध्यक्ष मधुकर नाईक यांनी केले आहे.

# टीम इंडियाचा विजयी श्री गणेशा!

## बांगलादेशचा ६ गडी राखून पराभव

## आधी शमीचा कहर, नंतर शुभमन गिलने ठोकले शतक



**दुबई, दि. २० फेब्रुवारी-**

मोहम्मद शमीच्या भेदक माऱ्यानंतर सलामीवीर शुबमन गिलनं केलेल्या धमाकेदार इनिंगच्या जोरावर भारतीय संघानं बांगलादेश विरुद्धचा सामना जिंकत चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत विजयी सलामी दिली.

दुबईच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात बांगलादेशच्या संघाने प्रथम फलंदाजी करताना २२८ धावा करत टीम इंडियासमोर २२९ धावांचे आव्हान उभे केले होते. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघ सहज विजय नोंदवेल, असे वाटत होते. पण रोहित शर्मा ४१ (३६) धावा करून तंबूत परतल्यावर मध्यफळीतील फलंदाज स्वस्तात आटोपले. विराट कोहली २२ (३८) आणि श्रेयस अय्यर १५ (१७) पाठोपाठ अक्षर पटेलची ८ (१२) विकेट पडल्यावर सामन्यात ट्विस्ट येतोय असं चित्र निर्माण झाले होते. पण शुबमन गिल आणि लोकेस राहुल जोडी जमली. अन् शेवटी भारतीय संघाने सामना जिंकला.


भारतीय संघाने १४४ धावांवर चौथी विकेट गमावली होती. भारताची बॅटिंग लाइन मोठी असली तरी दुबईच्या स्लो खेळपट्टीवर २२९ धावांचा पाठलाग करणंही मुश्किल वाटत होते. या परिस्थितीत गिलची साथ द्यायला लोकेश राहुल मैदानात उतरला. त्याने ४७ चेंडूत १ चौकार आणि २ षटकार मारत नाबाद ४१ धावांची खेळी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. त्याचा झेल सुटला हा मॅचचा एक टर्निंग पाइंट होताच. याशिवाय शुभमन गिलची संयमी खेळी टीम इंडियासाठी जमेची बाजू ठरली. तो शेवटपर्यंत थांबला अन् लोकेश राहुलनं षटकार मारत मॅच संपवून यंदाचा हंगाम गाजवण्यासाठी टीम इंडिया तयार आहे असा संकेत दिला.

शुबमन गिलनं १२९ चेंडूत ९ चौकार आणि २ षटकाराच्या मतीने नाबाद १०१ धावांची खेळी केली. या जोडीनं ३.३ षटके आणि ६ विकेट्स राखून भारतीय संघाचा स्पर्धेतील पहिला विजय पक्का केला.

# सोलापूर जिल्ह्याचा पुरुष व महिला शुटिंगबॉल संघ जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

सोलापूर शहर व जिल्हा शुटिंगबॉल असोसिएशनच्यावतीने जिल्हा शुटिंग बॉल अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेतून हा संघ असोसिएशनचे सचिव फैज अहमद बेगमपुरे यांनी जाहीर केला. निवड चाचणीचे उद्घाटन झोनचे अधिकारी नलाबंधू यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी असोसिएशनचे अध्यक्ष संजय सावंत, रफी दिवाण, श्रीनिवास कामूर्ती, इक्बाल दलाल आदी उपस्थित होते. या निवड चाचणीमध्ये निवड समिती सदस्य म्हणून संजय सावंत, रफी दिवाण, श्रीनिवास कामूर्ती, इक्बाल दलाल यांनी काम पाहिले. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी हिरोली, मुर्तुज अडोनी, सैदुल्लाह काझी, फिरोज पठाण यांनी परीश्रम घेतले.



**पुरुष संघ** : शोएब बेगमपुरे, आमीर काझी, फैजान इनामदार, गणेश मोरे, भूषण कांबळे, फरहान लालकोट, विनायक नाळे, अमन शेख, अफरोज काझी, शाहिद शेख, कामरान दलाल, प्रज्वल वाघमोडे. रफी दिवाण (संघ व्यवस्थापक), श्रीनिवास कामूर्ती (प्रशिक्षक)

**महिला संघ** : अनम रंगरेज, नौशीन चांदा, फिरदोस शेख, निकिता शिंदे, सानिया सय्यद, तूबा शेख, आदिबा शेख, आयशा पठाण, सानिया करणकोट, जोहा शाबदी, कशमला चांदा, तूबा शेख, संघ समीर शेख (व्यवस्थापक) इकबाल दलाल (प्रशिक्षक).

# ए.जी. पाटील अभियांत्रिकीच्या खेळाडूंची राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत चंद्रपूर येथे दि. १८ ते २२ फेब्रुवारी दरम्यान आयोजित २६ वे महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेकारिता ए. जी पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील खेळाडूंची विविध क्रीडा प्रकारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशात्र विद्यापीठ लोणेरेच्या विद्यापीठ संघात निवड झाली. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक शिवशरण एस. कोरे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव शिवानंद पाटील, कॅम्पस डायरेक्ट डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, सर्व विभाग प्रमुख, स्पोर्ट्स कॉर्डिनेटर यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिले.




**निवडलेले खेळाडू याप्रमाणे** : पुरुष : शशांक खवेकर, महादेव धारेराव (ॲथलेटिक्स), प्रथमेश जाधव (खो-खो). महिला : सरस्वती माळी, पूजा स्वामी (खो-खो), मोहिनी लिगाडे (बुद्धिबळ), पूर्वा लिगाडे (टेबल टेनिस)



# आरोग्य निरीक्षक घनकचरा व्यवस्थापन संघ विजेता

## क्रिकेट स्पर्धेत महापालिका संगणक विभाग संघ उपविजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

आरोग्य निरीक्षक संघटनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेतील कर्मचाऱ्यांसाठी झालेल्या क्रिकेट स्पर्धेत महापालिका आरोग्य निरीक्षक संघटना घनकचरा व्यवस्थापन संघाने विजेतेपद पटकावले. त्यांनी संगणक विभाग संघाचा पराभव केला.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून या स्पर्धेचे उद्घाटन महापालिकेचे सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी केले. यावेळी डी एड कॉलेजचे प्रा. रवी चव्हाण, उपअभियंता तपन डंके, सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रझाक पेंढारी, मुख्य आरोग्य निरीक्षक बाबासाहेब इंगळे, सुधाकर नागटिळक, पर्यावरण अधिकारी स्वप्निल सोलंकर, आरोग्य निरीक्षक रोहित गवळी, विठोबा शिंदेबंदे, सुनील राठोड यांच्या प्रमुख उपस्थीतीत झाले.

**विजेता संघ** : शशिकांत भोसले (कर्णधार) आरोग्य निरीक्षक संघटनेचे अध्यक्ष शेषराव शिरसट, जनार्दन मोरे, कोमलकुमार कांबळे, मनोज सोनवणे, शुभम रणखांबे, केवल लालबेगी, धीरज सोनवणे, नामदेव सर्वगोड, पांडुरंग कंदी, रोडगे , अजय जाधव, केतन सुरवसे, लक्ष्मण.



# विश्वजीत रोलर स्केटिंग क्लबची राज्य स्केटिंग स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. २९ फेब्रुवारी-**

बार्शीच्या ज्योतिर्लिंग स्पोर्ट्स क्लब संचलित विश्वजीत रोलर स्केटिंग क्लबने राज्य स्पर्धेत उत्कृष्ट यश संपादन करुन गोवा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले आहे.

ऑल इंडिया रोलर रिले स्केटिंग फेडरेशन व छत्रपती संभाजीनगर क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने, श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त ही स्पर्धा आयोजित केली होती. या खेळाडूंना प्रशिक्षक गणेश रोडे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंना संस्थेचे अध्यक्ष भगवान जाधव, सचिव सविता जाधव, स्नेहल रोडे, संचिती जाधव, आदित्य माळी, यश नान्नजकर यांनी अभिनंदन केले

**राज्य स्पर्धेतील यशस्वी खेळाडू या प्रमाणे- सुवर्ण** : यथार्थ सारुक, शिवतेज पोफळे, अर्णव हसरे, युवराज राऊत **रौप्य** : अथर्व सांगळे, शौर्य गुगळे, राजाराम मुंढे.

# आयएमएस मॉडर्न संघास विजेतेपद

## इंडियन मॉडेल पेरेंट्स क्रिकेट लीग सीजन १५ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

इंडियन मॉडेल पेरेंट्स क्रिकेट लीग स्पर्धेचा १५ वा सीझन स्पर्धेत आय.एम.एस. मॉडर्न संघाने विजेतेपद पटकाविले. त्यांनी आयएमएस समर्थ संघावर ८ गडी राखून विजय मिळविला.

इंडियन मॉडेल स्कूल, आय. एम. एस. परिवार आणि. अमोल जोशी यांच्या संयुक्त विद्यमाने पालकांकरिता (लेदर बॉल) घेण्यात आलेली ही स्पर्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियम, रेल्वे मैदान येथे दिवस रात्र स्वरुपात पार पडला. यामध्ये १५ संघातून १९५ पालकांनी आपला सहभाग नोंदवला होता. अंतिम सामना आय. एम. एस. मॉडर्न आणि आय. एम. एस. समर्थ ११ यांच्या दरम्यान झाला. अंतिम सामन्यातील नाणेफेक सोलापूर शहर गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त राजन माने यांच्या हस्ते झाले. यामध्ये प्रथम फलंदाजी करताना आय. एम. एस. समर्थ ११ संघाने १५ षटकांमध्ये १० बाद ८९ धावा केल्या. विजयी लक्ष्य आय.एम.एस. मॉडर्न संघाने १४.२ षटकात २ बाद ९३ धावा करत गाठले. सामनावीर म्हणून प्रेम राठोड यास पारितोषिक देण्यात आले. या स्पर्धेत पंच म्हणून स्वप्निल इंगळे आणि सागर गड्डम यांनी काम पाहिले तर गुणलेखक म्हणून सौरभ पवार आणि समलोचक म्हणून शंकर पवार यांनी काम पाहिले.

या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ अविनाश बिडवे, डॉ. राहुल कुलकर्णी, संगमनाथ नागोजी, . सिद्धलिंग कांबळे, विशाल गायकवाड, सैफन शेख, ॲड. एच. एच. बडेखान या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

स्पर्धा यशस्वीतेसाठी इंडियन मॉडेल पॅरेंट्स् क्रिकेट लीगची कोर कमिटी, स्पॉन्सर्स, सर्व संघाचे कर्णधार तसेच शाळेतील सर्व कर्मचारी, क्रीडाशिक्षक सचिन ढवाण, अक्षय माने, रविकिरण आवटे, राजकुमार माने, अजय चाबुकस्वार सहकार्य लाभले.



**स्पर्धेतील सर्वोत्कृष्ठ खेळाडू**

फलंदाज- रवी माने, गोलंदाज- आझम मुजावर, मालिकावीर- मुस्तफा खैराटकर, यष्टिरक्षक- चेतन बत्तीन, झेल- सुधांशु भालेराव, अभिजित कुलकर्णी, नितीन वडनाल, क्षेत्ररक्षक- प्रेम राठोड, इमर्जिंग प्लेयर- चेतन व्हनगुंटी, केशव राठोड, अनिल पटेल, फेयर प्ले प्लेअर- अमित काबणे, फेअर प्ले टीम- आय. एम. एस. रायझिंग स्टार.

# महाराष्ट्र आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात सोलापूर विद्यापीठाचे संघ सहभागी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

महामहिम राज्यपाल कार्यालय आयोजित २६ वा महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ, क्रीडा महोत्सव २०२४ स्पर्धा दि.१७ ते २२ फेब्रुवारी या कालावधीत गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली यांनी त्यांच्या परिक्षेत्रातत असलेले चंद्रपुर व बल्लारपूर येथे आयोजित केलेल्या आहेत. सदर स्पर्धेत पुरुष व महिलांच्या ॲथलेटिक्स,बास्केटबॉल, व्हॉलीबॉल,कबड्डी, खो-खो,बॅडमिंटन, टेबल-टेनिस, चेस (बुध्दिबळ) खेळाचा समावेश आहे.

क्रीडा महोत्सव स्पर्धेत सहभागी होणाऱ्या क्रीडा प्रकारांचे स्पर्धापुर्व प्रशिक्षण शिबीराचे आयोजन विद्यापीठ परिसरात दि.०८ ते १५ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत करण्यात आले होते. यामध्ये बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, टेबल-टेनिस, चेस (बुध्दिबळ) पुरुष व महिला आणि त्यांचे प्रशिक्षक व व्यवस्थापक यांच्या राहण्याची व चहा, नाष्टा व जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. तर ॲथलेटिक्स मुले व मुली यांचे सदर स्पर्धापुर्व शिबीराचे आयोजन डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स व बॅडमिंटन मुले व मुली यांचे स्पर्धापुर्व प्रशिक्षण शिबीराचे आयोजन डी.ए.व्ही.वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स सोलापूर येथे करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबीराचे उदघाटन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू मा.प्रा.डॉ.लक्ष्मीकांत ब.दामा यांच्या हस्ते करण्यात आले. क्रीडा महोत्सव स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सोलापूर ते गडचिरोली व परतीच्या प्रवासाकरिता विवेकानंद प्रतिष्ठानचे प्रा.डॉ.बी.पी.रोंगे यांनी दोन बस उपलब्ध करून दिलेल्या आहेत. स्पर्धापुर्व प्रशिक्षण शिबीराचा सांगता समारंभ कार्यक्रमाचे आयोजन सभागृहामध्ये करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर हे होते. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यापीठाच्या विविध खेळाच्या संघ, प्रशिक्षक व व्यवस्थापक यांना मा.कुलगुरू मा.प्रा.प्रकाश महानवर, कुलसचिवा योगिनी घारे, मा.व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा.सचिन गायकवाड व विवेकानंद प्रतिष्ठानचे प्रा.डॉ.बी.पी.रोंगे यांनी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच या स्पर्धेतसहभागी होवून सोलापूर विद्यापीठाच्या खेळाडूंनी चांगली कामगीरी करून यश मिळवावे व जास्तीत जास्त पदके मिळवून विद्यापीठाचे नाव उज्वल करावे असे आव्हान मा.कुलगुरू महोदयांनी खेळाडूंना केले. यावेळी उपस्थित असलेले संघ प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक यांचा मा.कुलगुरू महोदयांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा विभागाचे संचालक डॉ.अतुल लकडे यांनी केले, सुत्रसंचालक प्रा. मल्लिकार्जुन पाटील यांनी केले, प्रा.बाळासाहेब वाघचवरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### अमोल कॉलेजच्या विद्यार्थ्यांची विठ्ठल कारखाना औद्योगिक विभागास भेट

**करकंब, दि. १९ फेब्रुवारी-**

अमोल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय करकंब येथील विद्यार्थ्यांनी कृषीविज्ञान व तंत्रज्ञान या विषयाअंतर्गत विद्यमान आमदार अभिजीत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या विठ्ठल सहकारी साखर कारखाना वेणूनगर येथे अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने भेट देऊन कारखान्यामध्ये साखर कशाप्रकारे तयार करण्यात येते? याबद्दल संबंधित प्रक्रियेची पाहणी केली. या अभ्यास दौऱ्याप्रसंगी विद्यार्थ्यांनी को-जनरेशन युनिट,डिस्टिलरी प्रकल्प, बायो सीएनजी प्रकल्प या विभागांनाही भेटी देऊन त्याबद्दलची माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी त्यांना फक्त पुस्तकी ज्ञान न देता त्या विषयाची वास्तविक, नवीन माहिती व ज्ञान मिळावे या उद्देशाने महाविद्यालयाने हा अभ्यास दौरा आयोजित केला होता. यावेळी प्राचार्य अजित पवार, प्रा.लक्ष्मी माने, प्रा.शितल देवकते, प्रा. अनिता मोरे, प्रा. पुनम गायकवाड, प्रा. सागर शेटे, प्रा. विपुल गोसावी, प्रा. प्रमोद रेडे-पाटील उपस्थित होते.




### शिवजयंती निमित्त ४५ जणांचे रक्तदान

**पिलीव, दि.२० फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिवप्रतिष्ठान व सार्वजनिक शिवजन्मोत्सव उस्तव समीतीच्या वतीने आयोजित करणयात आलेल्या रक्तदान केले. सोलापूर येथील महात्मा बसवेश्वर ब्लड बँकेच्या वतीने रक्त संकलन करणयात आले. यावेळी सुरूवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मेजर जयशिव गलांडे, मेजर दिलीप धायगुडे, मेजर मयुर नष्टे यांच्या हस्ते करण्यात आले.

### मराठी साहित्य संमेलनात दिसणार अण्णाभाऊ साठेंच्या जीवनाचा प्रवास



**बार्शी, दि. २० फेब्रुवारी-**

येथील संजय श्रीधर कांबळे यांना दिल्ली येथील ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सहभागासाठी विशेष निमंत्रण दिले आहे. २१ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत दिल्लीत हे संमेलन होत आहे. तालकटोरा स्टेडियममध्ये अण्णाभाऊ साठे व्यासपीठ उभारण्यात आले आहे. या साहित्यनगरीला छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरी असे नामकरण केले आहे. या संमेलनामध्ये कांबळे यांनी निर्माण केलेल्या तंत्रज्ञानाने निर्मित साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनाचा चित्र प्रवास घडवणारी छायाचित्रे प्रदर्शनात मांडली जातील.



### चिखलठाण येथे धार्मिक कार्यक्रम

**करमाळा दि. १९ फेब्रुवारी-**

चिखलठाण (ता.करमाळा) येथे स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या वर्धापनदिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास मार्ग दिंडोरी प्रणित चिखलठाण येथील स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरामध्ये गुरूमाऊली व चंद्रकांत दादासाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजित केले होते. यामध्ये सुरवातीला महाअभिषेक भूपाळी आरती व स्वामी महाराजांच्या पालखीची मिरवणूक गावातून काढण्यात आली यानंतर बाबा शास्त्री तळोले सर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सायंकाळी साडेसहा वाजता महाआरतीने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्रकुमार बारकुंड, अमोल मसे, प्रमोद गव्हाणे, सुशांत नलवडे, मिरा कांबळे, प्राची गव्हाणे उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### रामचंद्र बाबर



**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

वडवळ (ता. मोहोळ) येथील रहिवाशी रामचंद्र निवृत्ती बाबर (वय ८५) यांचे अल्पशा आजाराने दि. १८ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, नातंवडे असा परिवार आहे.

### रेवणसिध्द नसली



**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

होटगी रोड, भारतमाता नगर येथील रेवणसिध्द गुरुपादप्पा नसली (वय ६९) यांचे हृदयविकाराने गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. सोलापूर शिवशिंपी समाजाचे विद्यमान अध्यक्ष शिवानंद नसली यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.

### मीनाताई बुरगुटे



**बार्शी, दि. २० फेब्रुवारी-**

शिवशक्ती बँकेचे चेअरमन डॉ. प्रकाश बुरगुटे यांच्या मातोश्री मीनाताई गोविंद बुरगुटे (वय ८६) यांचे गुरुवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. माजी आमदार कै. गोविंदराव बुरगुटे यांच्या त्या पत्नी होत.

# पूर्व परवानगी न घेता शेतजमिनीवर मारला खड्डा

## जीआरएल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचा मनमानी कारभार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.२० फेब्रुवारी-**

सुरत-चेन्नई मार्गासाठी जी.आर.एल.इन्फ्रास्ट्रक्चरच्या कंपनीने पूर्वपरवानगी न घेता दंडेलशाही मार्गाने बागेहळ्ळी येथील महादेव मडोळप्पा साखरे या शेतकऱ्याच्या शेतामध्ये पंधरा फूट खोल खड्डा खोदून गौण खनिज मरूम मोठ्या प्रमाणात दडपशाही मार्गाने उकरून नेला आहे. या गरीब शेतकऱ्याला धमकी दिली जात असल्याने बीडप्रमाणे आकाटोळी स्वामी समर्थांच्या नगरीत निर्माण होत आहेत काय? असा सवाल उपस्थित होत आहे.

महादेव साखरे यांनी तहसीलदारांच्याकडे तक्रार अर्ज केला आहे. साखरे यांची काही जमीन बागेहल्ली येथील दोन नंबर तलावामध्ये गेले असल्याने आता फक्त ३६ गुंठे जमीन त्यांच्या नावाने शिल्लक राहिली आहे.या ३६ गुंठे जमीन वर त्याची उपजीविका अवलंबून असताना मध्यरात्रीच्या सुमारास गट नंबर १५७ मध्ये गुंडागर्दी करून दंडेलशाही मार्गाने घुसून १५ फूट खोल खड्डा जेसीबी आणि इतर अवजाराद्वारे खोदला आहे. गौण खनिज मुरूम वगैरे जबरदस्तीने घेऊन जात असल्याने लहान गरीब शेतकऱ्यांमध्ये घबराट निर्माण झाल्या आहेत.यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांच्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्या असून मनमानी पद्धतीने मुरूम मोठ्या प्रमाणात उकरला जात आहे. बीडच्या धरतीवर सुरज चेन्नई महामार्गासाठी गरिबांच्या शेतातील मुरूम लुटण्यासाठी आकाटोळी निर्माण होत आहेत काय ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. रात्री अप रात्री असे प्रकार घडत आहेत.



यापूर्वी बागेहल्ली येथील दोन नंबर तलावामध्ये माझे शेत जमीन गेल्याने माझ्या नावाने फक्त ३६ गुंठे जमीन शिल्लक राहिली आहे. आत्ता मी अत्त्यअल्पभूधारक शेतकरी बनले असताना शेतातील गौण खनिज मुरूम जबरदस्तीने घेऊन जात आहे.यामुळे माझ्या नावाने आत्ता शेतच शिल्लक राहिले नाही. आत्ता माझी शेत जमीन पूर्ववत करून नुकसान भरपाई मिळवून द्यावी.
**- महादेव साखरे** अन्याग्रस्त शेतकरी बागेहल्ली



### सांगोला विद्यामंदिर प्रशालेस महाराष्ट्र विद्यालयाची अभ्यास भेट

**सांगोला, दि.२० फेब्रुवारी-**

महाराष्ट्र विद्यालय आणि ज्यु. कॉलेज, बार्शी येथील शिक्षकांनी सांगोला विद्यामंदिर प्रशाला येथे अभ्यास भेट देत येथील शालेय तसेच इतर बाह्यपरीक्षा यांची माहिती घेतली. यावेळी प्राचार्य अमोल गायकवाड, महाराष्ट्र विद्यालय, बार्शीचे उपमुख्याध्यापक आर.बी.सपताळे, विद्यामंदिर प्रशालेच्या उपमुख्याध्यापिका शाहिदा सय्यद, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, प्रदीप धुकटे, मच्छिंद्र इंगोले उपस्थित होते. यावेळी बाह्यपरीक्षा विभाग प्रमुख नामदेव खंडागळे व वैभव कोठावळे, एनएमएमएस विभागप्रमुख निलेश जंगम, आठवी शिष्यवृत्ती विभाग प्रमुख रमेश बिले, पाचवी शिष्यवृत्ती विभाग प्रमुख नागेश पाटील, शिवाजी चौगुले, आशितोष नष्टे यांनी आपल्या विभागांच्या कार्यवाही विषयी माहिती देत उपलब्ध मार्गदर्शक पुस्तके, सरावसंच यांची चर्चा करत शंकांचे समाधान केले तसेच महाराष्ट्र विद्यालयात राबवल्या जाणाऱ्या विशेष बाबींची नोंद घेतली.अभ्यास भेटीमध्ये महाराष्ट्र विद्यालय, बार्शीच्या एम.जी.माने, एस.एम.डिसले, एस. एल. देशमुख, एस.डी.देशमुख, एस.एस.पाटील, एस.ए.लोखंडे, ए.आर. जाधव या शिक्षकांचा समावेश होता.



### घुगरदरे प्रशालेत शिक्षक समृद्धी प्रशिक्षण

**नातेपुते, दि. २० फेब्रुवारी-**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वेळापूर अंतर्गत शिक्षण विभाग माळशिरस यांच्यातर्फे नातेपुते येथील चंद्रकांत घुगरदरे प्रशालेत शिक्षक समृद्धी प्रशिक्षण आयोजित केले आहे.

प्रारंभी विद्येची देवता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रशिक्षणास सुरुवात करण्यात आली. यावेळी तालुका समन्वय संदिपान कर्चे म्हणाले, सर्व शिक्षकांनी प्रशिक्षण शिक्षकांनी प्रभावीपणे करणे गरजेचे असून, विद्यार्थ्यांत बदल होऊन शिक्षक, मुले अध्ययनशील बनतील, यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्रशिक्षणास १५० शिक्षकांसह पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी प्रदिप करडे, विस्तार अधिकारी सुषमा महामूनी, डायटचे प्राचार्य जितेंद्र साळेखे, अधिव्याख्याते सुभाष बूवा याच्या मार्गदर्शनाखाली अरूण राठोड, सचिन निगडे, हनूमंत बनसोडे, अंकुश कर्चे, सदिपान कर्चे उपस्थित होते.

### सावळेश्वर ग्रामपंचायतच्या सरपंचपदी सखाराम साठे

**तभा वृत्तसेवा,**
**सावळेश्वर, दि. २० फेब्रुवारी-**



मोहोळ तालुक्यातील सर्वाधिक लक्ष लागून राहिलेल्या मौजे सावळेश्वर येथील ग्राम पंचायतच्या नूतन सरपंचपदी लोकनेते परिवाराचे सखाराम जालिंदर साठे यांची निवड झाली. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती मोहोळचे सभापती धनाजी गावडे व मा.पंचायत समिती सदस्य कालिदास गावडे यांनी सावळेश्वरमध्ये आजपर्यंत मराठा समाजाचा सरपंच झाला नाही त्यामुळे मराठा समाजाला न्याय देवून आदर्श निर्माण केला आहे . यावेळी सरपंच पार्वती गावडे, ग्रामपंचायत सदस्य अनिकेत गुंड, अर्जुन साबळे, कल्पना टेकाळे,सोनाली पैकेकरी, अनिता गावडे, कल्पना गावडे, तुकाराम शिंदे, लक्ष्मण वाघमोडे, दीपक गावडे, संतोष साठे, श्रीकांत टेकाळे उपस्थित होते. यावेळी सरपंच साठे यांनी गावाने मला सरपंच पद देऊन खरया अर्थाने सर्व धर्म समभाव अहिल्या राणीसाहेबांचा समतेचा आदर्श ठेवला आहे गावानी टाकलेला माझावरचा विश्वास नक्कीच सार्थ ठरवुन दाखवेन व सर्वांना सोबत घूऊन गावच्या विकासासाठी प्रयत्न करेने खरू तर एका उच्च शिक्षीत तरुणाला ही संधी दिली. लोकनेते परिवारानेही विश्वास टाकला. या सर्वांचे ऋण व्यक्त करण्यासाठी नक्कीच चांगले काम करेन, असा विश्वास सत्काराप्रसंगी व्यक्त केला.



### जय शिवराय प्रतिष्ठानतर्फे शिवरायांना मुजरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० फेब्रुवारी -**

छत्रपती शिवरायांच्या जयंती उत्सवानिमित्त मध्यवर्ती शिवसृष्टी शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त बार्शी येथे उभारण्यात आलेल्या शिवसृष्टी येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये छत्रपती शिवरायांच्या शिवसृष्टी येथे फुलांची आरास, विद्युत रोषणाई व छत्रपती शिवरायांच्या जन्मोत्सवाचा फुलातील देखावा करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या निमित्ताने विशेष बाब म्हणजे छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ मूर्तीचे पूजन प्रथम महिला त्यानंतर पोलीस बांधव, पत्रकार बांधव, बार्शी शहर व तालुक्यातील शिवप्रेमी शिवप्रेमी संघटनेचे पदाधिकारी व शिवसृष्टी उभारणीसाठी मोलाचा वाटा उचलणारे राज-विजय क्रीडा सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष श्री. विजय राऊत, माजी नगराध्यक्ष आसिफ तांबोळी, बार्शीचे पोलीस निरीक्षक श्री.बालाजी कुकडे, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील युवा उद्योजक श्री रणजीतदादा राऊत व शिवसृष्टी उभारणीसाठीची मागणी करणाऱ्या तमाम नगरसेवक शिवप्रेमी यांच्या उपस्थितीमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या

### अक्कलकोटमध्ये आजपासून मूलभूत लेखा प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२० फेब्रुवारी-**

सी.बी. खेडगीज महाविद्यालयातील वाणिज्य विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, पीएम उषा प्रायोजित यांच्या सहकार्याने शुक्रवारी दि.२१ ते २८ फेब्रुवारी दरम्यान एक सप्ताह मूलभूत लेखा प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. शिवराय अडवीतोट यांनी दिली.

या प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन मंडळाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी शिंदे व संस्थेचे पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेत शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी शिंदे हे व्यावहारिक लेखांकन आणि त्या संबंधित नाविन्यपूर्ण संकल्पना या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. शनिवारी दि.२२ रोजी सकाळी साडेदहा वाजता अक्कलकोटचे चार्टर्ड अकाउंटंट ओमकारेश्वर उटगे यांचे आर्थिक स्टेटमेंट आणि आयकर रिटर्न या विषयावर आणि दुपार सत्रात दोन वाजता कार्यालयास भेट देऊन प्रशिक्षण मार्गदर्शन करणार आहेत. रविवारी २३ रोजी सकाळी साडेअकरा वाजता सोलापूर जनता बँकेचे लेखाधिकारी संतोष वगाले यांचे बँक अंतिम खाते तयार करणे आणि दुपारच्या सत्रात दोन वाजता ऑनलाईन बँकिंग आणि वित्तीय व्यवहार या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. दि. २४ रोजी सकाळी साडेअकरा वाजता माजी प्रा चंद्रकांत पाटील यांचे व्यवहार लेखनाच्या नोंदी आणि दुपारी सत्रात दोन वाजता ताळेबंद पत्रक आणि इतर पत्रके तयार करण्याचे प्रात्यक्षिक पद्धती या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. मंगळवारी २५ रोजी सकाळी साडेअकरा वाजता चार्टर्ड अकाउंटट शुभम चव्हाण यांचे वस्तू व सेवा कर आणि जीएसटी रिटर्न भरणे आणि कार्यालयीन प्रशिक्षण बाबत मार्गदर्शन करणार आहेत. दि. २७ रोजी सकाळी साडेअकरा वाजता नरसिंगप्पा मैत्री यांचे या विषयावर मार्गदर्शन आणि दुपारच्या सत्रात सोलापूर जनता बँकेत भेटीचे आयोजन केले आहे.

### राज्यस्तरीय रांगोळी स्पर्धेचे बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २० फेब्रुवारी-**

जागर संविधानाचा राज्यस्तरीय रांगोळी स्पर्धेचा पारितोषीक वितरण समारंभ माळशिरस येथे प्रा. नीलम पंडीत व मा. न्यायाधिश दिपक राजे-पांढरे यांचे हस्ते पार पाडला.

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त माळशिरस तालुका वकील बांधवांनी आयोजित केलेल्या जागर संविधानाचा अभियान अंतर्गत राज्यस्तरीय रांगोळी स्पर्धा, २०२५ ही स्पर्धा माळशिरस येथील गोपाळराव देव प्रशाला येथे पार पडली. सदर स्पर्धेत मोठ्या संख्येने स्पर्धकांनी भाग घेतला होता व त्यामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषीक हे. निकिता प्रविण पोळ यांनी पटकिवले असून, त्यांना आयोजकांच्या वतीने आटा चक्की, स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. द्वितीय क्रमांक कोमल सावंत यांना मिळाले असल्याने मिक्सर, स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. तृतीय क्रमांकाचे पारितोषीक




कार्तिकी इंगवले यांना डीनरसेट, स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून माळशिरस वकील संघटनेच्या अध्यक्षा. मोहिनी देव, प्रमोद शिंदे, माळशिरस वकील संघटनेचे माजी अध्यक्ष तथा व्हाईस चेअरमन शंकर सहकारी साखर कारखाना, लि. सदाशिवनगरचे ॲड.मिलिंद कुलकर्णी, स्माईल एफ.एम. अकलूजचे हेड शंकर बागडे, डॉ.कुमार लोंढे उपस्थित होते. प्रस्ताविक ॲड. धनंजय बाबर, सूत्रसंचालन ॲड. भारत गोरवे यांनी केले. तसेच पारितोषीक जाहीर करण्याचे काम ॲड. सुमित सावंत यांनी केले. तर आभार ॲड. रजनी गाडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजक समितीचे ॲड. सुनिता सातेपुते, ॲड. रजनी गाडे-सोनवळ, ॲड. धनंजय बाबर, ॲड. सुमित सावंत, ॲड. भारत गोरवे, ॲड. नितीन भोसले, ॲड. वैभव धाईजे, ॲड. अजिंक्य नवगिरे, ॲड. सुयश सावंत, ॲड. वैशाली कांबळे, ॲड. अभिषेक चंदनशिवे, ॲड. मनोज धाईंजे, ॲड. निलेश जाधव, ॲड. दत्तात्रय सावंत यांनी परिश्रम घेतले.

# चिवरीची महालक्ष्मी यात्रा भक्तीभावाने उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २० फेब्रुवारी-**

तुळजापूर तालुक्यातील चिवरी येथील महालक्ष्मी यात्रा महोत्सवास प्रारंभ झाला. महालक्ष्मीच्या दर्शनासाठी तेलंगणा, कर्नाटक व महाराष्ट्र राज्यातील हजारो भाविकानी आई राजा उदो उदो च्या जयघोषात महालक्ष्मी मातेचे दर्शन घेऊन आपले नवस फेडले.

महालक्ष्मीची यात्रा प्रथेप्रमाणे दरवर्षीच्या माघ पौर्णिमेनंतर येणाऱ्या पहिल्या मंगळवारी साजरी केली जाते. यात्रेनिमित्त देवस्थानच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. देवीजींना सोमवारच्या मध्यरात्री महाअभिषेक, अलंकार पूजा करून महाआरती करून नंतर आंबट-गोड भातासह पुरणपोळीचा नैवद्य दाखवण्यात आला. पहाटे गाव ते मंदिर या एक किलोमीटर अंतरावर दंडवत व लिंबाच्या पाल्याने रस्ता झाडण्याचा कार्यक्रम झाला यामध्ये गावातील शेकडो भाविकांनी सहभाग नोंदविला होता. मंगळवार हा यात्रेच्या मुख्य दिवशी नवीन पोतराजांना दीक्षा देणे, दंडवत घेणे, पट बांधणे, लहान मुलांचे जावळ काढणे आदी नवस्फूर्तीचे कार्यक्रम झाले. मंगळवारी रात्री गावातून देवींची शोभेच्या दारूकामासह पालखी छबिना मिरवणूक काढण्यात काढुन पालखी मानाच्या पुजाऱ्याच्या घरी प्रस्थान होऊन रात्री बारा वाजता मंदिराकडे पालखी प्रस्थान झाली. तसेच होमावहनामध्ये धार्मिक विधी पार पडल्यानंतर भाविकांना महाप्रसाद दिला. दि.१९ फेब्रुवारी रोजी यात्रेची सांगता झाली. यात्रेमध्ये अनुचित प्रकार घडू नये यासाठी नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त करण्यात आला होता.

## आई राजा उदो उदो...चा जयघोष



### खराब रस्त्याचा यात्रेकरुंना फटका

मंदिराला जाणाऱ्या दोन्ही रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून, खड्डे पडले आहेत. प्रशासन यावर कोणतेच काम करण्यास तयार नाही. चिवरी महालक्ष्मी मंदिरास जाण्यासाठी मुख्य दोन रस्ते आहेत त्यातील एक रस्ता अणदूर चिवरी पाटी पासून जातो हा रस्ता प्रशासनाने निम्म्याच्या वर चांगला डांबरी केला असून, उर्वरित मंदिरा पर्यंतचे काम अर्धवट का सोडले ते कळत नाही, तसेच दुसरा मुख्य रस्ता म्हणजे तुळजापूर रोड ते चिवरी मंदिर हा रस्ता अनेक दिवस झाले डांबरी होत नाहीय गतवर्षीच्या यात्रे आगोदर हा रोड नवीन होणार, तो मंजूर आहे असे सार्वजनिक बांधकाम विभागाने सांगितले होते. परंतु अद्याप या रस्त्याला मुहूर्त लागत नाही गुडघ्या एवढ्या खड्ड्यातून हजारो यात्रेकरू दंडवत घालत होते. त्यांना याचा जबर फटका बसला असून हा रोड ताबडतोब करावा, अशी मागणी ट्रस्टने केली आहे

# बाजार समिती निवडणुकीच्या सुनावणीला २५ फेब्रुवारीचा मुहूर्त

**▸ उच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे लागले सर्वांचे लक्ष**
**▸ उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बाजार समिती करणार पुढील कार्यवाही**

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.२० फेब्रुवारी**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकी संदर्भातील उच्च न्यायालयात होणारी सुनावणी मंगळवार (दि.२५) फेब्रुवारी रोजी घेतली जाणार आहे. यापूर्वी ही सुनावणी मंगळवार (दि.३) फेब्रुवारी रोजी होणार होती.

मात्र उच्च न्यायालयाच्या विषय पाटलावर सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकीच्या मतदार यादीचा विषयच आला नसल्याने सदरची सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. आता मात्र सदरची सुनावणी होऊन उच्च न्यायालय अंतिम निर्णय घेऊन आदेश पारित करतील असा विश्वास व्यक्त केला जात आहे. दरम्यान, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या




संचालक मंडळास एकदा नव्हे तर दोनदा म्हणजेच दोन वर्ष मुदतवाढ देण्यात आली होती. तिसऱ्यांदा मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता. परंतु पणन कायद्याच्या नियमानुसार तिसऱ्यांदा मुदतवाढ देण्याचा अधिकार शासनाला नव्हता. त्यामुळे सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करून निवडणुकीची अंमलबजावणी देखील सुरू करण्यात आली होती. मात्र विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया रद्द करण्यात आली. ज्या टप्प्यात सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. त्याच टप्प्यातून निवडणुकीची पुढील प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश देण्यात आले होते. (दि.३१) डिसेंबर २०२४ ही स्थगितीची अंतिम तारीख होती. त्यानंतर निवडणुकीची प्रक्रिया सुरू होईल असा अंदाज वर्तवण्यात येत होता. मात्र नवीन प्रारूप मतदार यादीचा विषय समोर आल्याने पुन्हा एकदा बाजार समितीच्या निवडणुकीला स्थगिती देण्यात आली. सहा महिन्यांच्या कालावधीनंतरची प्रारूप मतदार यादी मतदानासाठी ग्राह्य धरता येत नाही. असा नियम असल्याने नव्याने प्रारूप मतदार यादी तयार करण्यासंदर्भात पणन संचालकांनी आदेश दिल्यानंतर सदरची निवडणूक स्थगित करण्यात आली होती. त्यावर उच्च न्यायालयात सुनावणी होणार होती. परंतु उच्च न्यायालयाच्या विषय पटलावर सोलापूर बाजार समितीचा विषय येण्या अगोदरच न्यायालयाचे कामकाज संपुष्टात आल्याने, सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकी संदर्भातील सुनावणी होऊ शकली नाही. त्यानंतर दुसऱ्यांदा देखील सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने सुनावणी होईल असे वाटत होते. मात्र तेव्हा सुद्धा सदरची सुनावणी झाली नाही.

**⏩ उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बाजार समितीचे कामकाज**
पणन कायद्यातील तरतुदीनुसार प्रारूप मतदार यादीचे नूतनीकरण करणे आवश्यक होते. दरम्यानच्या काळात सदरची मतदार यादीचे नूतनीकरण संपुष्टात येऊन निवडणुकीची पुढील प्रक्रिया सुरू झाली असती. परंतु हे प्रकरण आता उच्च न्यायालयाच्या बोर्डावर गेल्याने बाजार समिती उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कामकाज करेल. तक्ररदार व उच्च न्यायालय यांच्यातील सुनावणीनंतर उच्च न्यायालयाचे ज्या पद्धतीने आदेश प्राप्त होतील त्याच अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे आता बाजार समिती मधील सर्व घटकांचे व तमाम सोलापूरकरांचे लक्ष उच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे लागलेले दिसत आहे.

**⏩ लवकरात लवकर सुनावणी व्हावी.**
सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीचे घोंगडे कित्येक दिवसांपासून भिजत पडले आहे. यावर उच्च न्यायालयाने अंतिम निर्णय द्यावा. जेणेकरून बाजार समितीच्या हितासाठी तो निर्णय राहील. निवडणुकीचे प्रक्रिया तात्काळ सुरू व्हावी अशी अपेक्षा आता बाजार समिती मधील विविध घटकांमधून व्यक्त केली जात आहे.

# कृषी पर्यटनानंतर आता जिल्हा प्रशासनाचे ध्येय तालुकानिहाय 'कृषी मॉल' निर्मितीचे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी -**

जिल्ह्यातील विविध तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी वर्षाकाठी तब्बल ३ कोटीपर्यंत भाविकांची वर्दळ असते; यामुळे जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी शेतीला जोड व्यवसाय म्हणून कृषी पर्यटनाकडे वळावे आणि येणाऱ्या धार्मिक पर्यटनप्रेमींना धार्मिक पर्यटनाबरोबर कृषी पर्यटनाचाही आनंद घेता यावा, या उद्देशाने शासन स्तरावरूनच जिल्ह्यात कृषी पर्यटन निर्मितीचे पाऊल पडले आणि यास जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी प्रतिसादही दिला.

दरम्यान, आता जिल्ह्यातील ११ तालुक्यात कृषी मॉल निर्मिती करण्यात येणार असल्याची माहिती महसूल उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा पर्यटन अधिकारी अमृत नाटेकर यांनी दिली. कृषी पर्यटनातून स्थानिक शेतकऱ्यांकडून युवकांनाही रोजगार निर्मिती होवू लागली आहे. दरम्यान, कृषी पर्यटन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठीशी प्रशासन कायम राहणार आहे. याच धर्तीवर आता ११ तालुक्यात कृषी माल ही शासन स्तरावरून आलेली संकल्पना राबविण्यात येणार आहे.

या मॉलसाठी रस्त्याच्या कडेची काही शेतकऱ्यांची ५ ते १० गुंठे जमिन ३० वर्षाच्या करारावर घेतली जाणार आहे. या जागेत गाळ्यांची निर्मिती करून ते गाळे स्थानिक महिला बचत गटांना भाडेतत्वावर दिले जाणार आहेत. तर ज्या-त्या तालुक्यात उत्पादित झालेला माल या गाळ्यांतून विकला जाणार आहे. यातून मिळालेल्या नफ्याचा बचत गट, शासनाला फायदा होणार आहे. ही संकल्पना राबविण्यासाठी जिल्ह्यातील संबंधित प्रशासकीय यंत्रणा कामला लागल्याचेही उपजिल्हाधिकारी नाटेकर यांनी सांगितले.

# सोलापूर जिल्हा पोलीस कर्मचारी सोसायटीत परिवर्तन; समृध्दी पॅनेलचा सुपडा साफ

**सर्वाधिक मते घेऊन जिंकणारे दादा सरवदे व्हाईस चेअरमन**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी -**

सोलापूर जिल्हा पोलीस सोसायटी निवडणूकीमध्ये सत्तारूढ समृध्दी पॅनेलच्या उमेदवारांचा सुपडा साफ करीत परिवर्तन पॅनेलने सत्ता काबीज केली. परिवर्तन पॅनेलमधून सर्वाधिक मते घेऊन निवडूण आलेले दादासाहेब सरवदे यांची सोसायटीच्या व्हाईस चेअरमनपदी तर वामन यलमार यांची सोसायटीच्या चेअरमनपदी निवड करण्यात आली आहे.

सोलापूर जिल्हा पोलीस सोसायटी निवडणुकीत सत्तारूढ असलेली समृध्दी विकास आघाडी आणि परिवर्तन विकास आघाडी आमने सामने होते. सोलापूर शहर व जिल्हा पोलीस दलातील कर्मचारी या निवडणुकीत उभे होते. या सोसायटीचे एकूण २३४९ सदस्य आहेत. या दोन्ही पॅनलमध्ये एकूणच २८ उमेदवार एकमेकांविरुद्ध निवडणूक रिंगणात उतरले होते. या निवडणुकीसाठी १६ फेब्रुवारी रोजी मतदान होऊन मतमोजणी पार पडली.



यामध्ये समृद्धी विकास आघाडीमधील केवळ विठ्ठल उर्फ नाना गायकवाड हे एकमेव उमेदवार विजयी झाले तर परिवर्तन पॅनेलमधून सचिन वाकडे, विश्वजीत हंचे, अविनाश चव्हाण, वामन यलमार, सचिन बारंगुळे, जयशंकर पवार, बिरप्पा व्हनमारे, दादासाहेब सरवदे, राहुल फुटाणे, रामचंद्र जाधव, किरणकुमार माने, वंदन आयरे, ज्योती वजमाने हे उमेदवार विजयी झाले. विजय उमेदवारांमध्ये सर्वाधिक ८६८ मते घेऊन दादासाहेब सरवदे हे विजयी झाले. सत्तारूढ समृध्दी आघाडीमधील संचालकांनी गेल्या काही वर्षामध्ये सोसायटीमध्ये केलेले बेहिशोबी कर्ज वाटप, अनेक सदस्यांनी दिलेले राजीनामे ही महत्वाचे विषय त्यांच्या पराभवास कारणीभूत ठरल्याचे परिवर्तन पॅनेलच्या संचालकांनी सांगितले.

# राज्यातील ६२३ अधिकारी नियुक्तीपासून वंचितच!

**पात्रतासिद्ध करून सुद्धा मिळेना नियुक्तीपत्र**

## ● सोलापूर जिल्हातील १६ भावी अधिकारी नियुक्तीसाठी उतरणार मैदानावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० फेब्रुवारी-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) २०२२ च्या परीक्षेमधील ६२३ उमेदवारांची मार्च २०२४ मध्ये अंतरिम निवड यादी जाहीर झाली. त्यानंतर झालेल्या न्यायालयीन याचिकाही निकाली निघाल्या. मात्र, अनेक वर्षांच्या कष्टातून उपजिल्हाधिकारी, तहसीलदार अशी महत्त्वाची पदे मिळवलेले उमेदवार एक वर्षापासून नियुक्तीच्या प्रतीक्षेत आहेत. असंख्य उमेदवार प्रचंड नैराश्यात गेले असून 'सरकार आमचा अजून किती अंत पाहणार' असा प्रश्न विचारला जात आहे. यासाठी मुंबई येथे आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान, एमपीएससी'कडून राजपत्रित आणि अराजपत्रित अधिकाऱ्यांच्या विविध पदांसाठी परीक्षा घेतली जाते. परंतु, पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत, असा मोठा टप्पा सर करून उपजिल्हाधिकारी, तहसीलदार आणि अन्य महत्त्वाच्या पदांवर निवड झालेल्या अधिकाऱ्यांना अनेक वर्षे नियुक्तीची प्रतीक्षा करावी लागते, असे विदारक चित्र आहे. 'एमपीएससी'ने २०२२ मध्ये २३ संवर्गातील ६२३ पदांच्या



राज्यसेवा परीक्षेसाठी जाहिरात दिली. मुख्य परीक्षा जानेवारी २०२३ मध्ये तर डिसेंबर २०२३ ते जानेवारी २०२४ या कालावधीत मुलाखती झाल्या. १८ जानेवारी २०२४ रोजी गुणवत्ता यादी जाहीर झाली, तर २० मार्च २०२४ रोजी पदनिहाय अंतरिम यादी जाहीर झाली. यात अनेक उमेदवारांना उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, शिक्षणाधिकारी आदी महत्त्वाच्या पदांवर निवड झाली आहे. मात्र, सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर होताच काही उमेदवार न्यायालयात गेले. त्यामुळे नियुक्त्या रखडल्या होत्या. आता सर्व याचिका निकाली निघाल्या असून त्यानंतर आयोगाने अंतिम फेरनिवड यादीही जाहीर केली. मात्र, सामान्य प्रशासन विभागाने अद्याप या उमेदवारांना नियुक्त्या दिल्या नाहीत. त्यामुळे या उमेदवारांनी आता आझाद मैदान मुंबई येथे आंदोलनाचा इशारा दिला आहे. विशेष म्हणजे नियुक्ती मिळेपर्यंत आंदोलन केले जाईल अशी माहिती उमेदवारांनी त्यांच्या पत्रकात दिली आहे. प्रशासनातील लालफितशाहीमुळे ६२३ उमेदवारांना नियुक्तीसाठी प्रतीक्षा करावी लागणे दुर्देवी आहे. निवड झालेले बहुतांश अधिकारी हे बेरोजगार असून त्यांना आर्थिक तसेच सामाजिक विवंचनेला सामोरे जात आहेत. विद्यार्थी प्रचंड नैराश्यात आहेत. त्यामुळे सरकारने याकडे जातीने लक्ष देणे आवश्यक आहे. एकूण ६२३ उमेदवारांना नियुक्ती पासून वंचित आहेत या आमदारांना महाराष्ट्र शासनाच्या वित्तीय सामान्य प्रशासन विभागाने हिरवा कंदील दाखवला तर नक्कीच त्यांना नियुक्ती दिली जाईल. त्यामुळे या दोन्ही विभागाने त्यांचं पुढील सेवेचे आणि आर्थिक परिस्थितीचा विचार करून त्यांना नियुक्ती द्यावी अशी ही मागणी जोर करत आहे.

**घटनाक्रम**
- ⏩ सन २०२२-२३ ६२३ पदांच्या राज्यसेवा परीक्षेसाठी जाहिरात दिली.
- ⏩ मुख्य परीक्षा जानेवारी २०२३ रोजी संपन्न झाली.
- ⏩ डिसेंबर २०२३ ते जानेवारी २०२४ या कालावधीत मुलाखती झाल्या.
- ⏩ १८ जानेवारी २०२४ रोजी गुणवत्ता यादी जाहीर झाली.
- ⏩ २० मार्च २०२४ रोजी पदनिहाय अंतरिम यादी जाहीर झाली.

**▸ वेळेत परीक्षा झाल्यास विद्यार्थ्यांचा रोजगाराचा प्रश्न मिटेल**
''राज्यात परीक्षा हे वेळेनुसार होत नसल्यामुळे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे वय वाढत आहे. त्याचप्रमाणे परीक्षा देऊन सुद्धा नियुक्ती व निवड रखडल्यामुळे एक परीक्षा व त्याची निवड यामध्ये दोन-तीन वर्षाच्या अंतर पडत आहे. शासनाने या कालावधीचा विचार करून उमेदवारांचा वाढता वय आणि या दरम्यान त्यांना येणाऱ्या आर्थिक अडचणीचा व मानसिक त्रास चा विचार करून त्यांना रोजगार उपलब्ध करून दिल्यास भविष्यात चांगले अधिकारी उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे त्यांच्या आर्थिक व मानसिक कोंडी सोडवू शकेल व वेळेत परीक्षा झाल्यास विद्यार्थ्यांचा रोजगाराचाही प्रश्न मिटू शकेल.

**▸ शासनाने वयाचा व आर्थिक परिस्थितीचा विचार करावा**
राज्यसेवा मुख्य परीक्षेचा निकाल मार्च २०२४ मध्ये लागला आहे. त्यामध्ये उत्तीर्ण झालेल्या अधिकाऱ्यांना अद्यापही नियुक्ती आदेश देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सहायक गटविकास अधिकारी, पीएसआयसह तहसिलदार, उपजिल्हाधिकारी इतर अनेक भावी अधिकारी पोटासाठी रिक्षा, टेम्पो चालवतात, तसेच सुरक्षा रक्षकाची कामे करत आहेत. पात्रता धारक अधिकाऱ्यांचा वयाचा व आर्थिक परिस्थितीचा विचार करून लवकरात लवकर शासनाने त्यांना नियुक्ती द्यावी त्यामुळे प्रशासनात चांगले व प्रामाणिक अधिकारी उपलब्ध होऊ शकतील त्यामुळे त्या अधिकाऱ्यांच्या आर्थिक व मानसिक कोंडी सुटेल. शासनाने त्यांना नियुक्ती आदेश द्यावेत.

**- प्रशांत शिरगुर, राज्य उपाध्यक्ष स्पर्धा परीक्षा विद्यार्थी असो. महाराष्ट्र राज्य**

**▸ साताऱ्यातील अजय सुरक्षा रक्षक**
कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे साताऱ्याचे अजय ढाणे यांनी रात्रपाळीची नोकरी करत यश मिळविले; पण दोन वर्षात नियुक्ती न मिळाल्याने ते सुरक्षा रक्षक म्हणून सातारा औद्योगिक वसाहतीत कार्यरत आहेत. नियुक्ती मिळावी, अशी मागणी ते सातत्याने करत आहेत.

**▸ सांगलीचे युवराज टेम्पो चालक**
लहानपणी आईचे आणि कोरोनात वडिलांचे छत्र हरपलेले सांगलीचे युवराज मिरजकर यांनी टेम्पो चालवतच स्पर्धा परीक्षांची तयारी करून सहायक गटविकास अधिकारी म्हणून यश मिळविले आहे. मात्र, पद नियुक्ती न मिळाल्याने पोटासाठी ते आजही टेम्पो चालवित आहेत.

# पाऊस चांगला झाल्याने यंदा जिल्ह्यातून एकही पाणी टँकरची मागणी नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० फेब्रुवारी-**

यंदा जिल्हाभरात सरासरीच्या दीडपट पाऊस झाल्याने जिल्ह्यातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा अन् जनावरांच्या चाऱ्याचा वर्षभराचा तसा तर प्रश्न मिटला आहे. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत परतीच्या पावसाचा जोर झाल्याने अद्याप सर्वत्र पाणीसाठा मुबलक असून, यामुळेच आजतागायत जिल्ह्यातून एकही पाण्याच्या टँकरची मागणी आली नाही.

दरम्यान, ज्या ठिकाणी पाणी टंचाई जाणवेल; अशा ठिकाणी पाणी टँकर देण्यात येणार येणार असल्याची माहिती महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी आज (दि. २०) दिली. दरम्यान, याबाबतचा गावनिहाय टंचाई आराखडाही जिल्हा




परिषद सीईओ कुलदीप जंगम हे तयार करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

गतवर्षी सोलापूर जिल्ह्यातील ५ तालुक्यात दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने कोट्यवधीचा खर्च करावा लागला होता. यामध्ये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे, जिल्ह्यातील टंचाईवर मात करण्यासाठी २५० च्याहीवर पाण्याचे टँकर लागले आणि चारा टंचाईवर पर्याय म्हणून गवत बियाणे वाटपासाठी २५० कोटीच्या पुढे खर्च करण्यात आला होता. यंदा मात्र शासनाचा हा सर्व खर्च वाचणार आहे. एप्रिल ते जून २०२५ अखेरपर्यंत ज्या भागात टँकर द्यावी लागतील, तितकाच खर्च जिल्हा प्रशासनाला यंदा करावा लागणार आहे.

यंदा जिल्हाभरात सरासरीच्या दीटपट पाऊस झाल्याने चोहीकडे मुबलक पाणीसाठा झाला आहे. जिल्ह्यातील सर्व धरणे, साठवण तलाव, विहिरी, नाले-ओढे, नद्या भरभरून वाहिले आहेत. यामुळे अजूनही सर्वत्र पाणी दिसत आहे. पाण्याची पातळीही वर आलेली आहे. यामुळे सध्यातरी कोठेही पाण्याचे टँकर सुरू केले नसल्याचे नाटेकर यांनी स्पष्ट केले.

सोलापूर जिल्ह्यात दरवर्षी परतीचाच दमदार पाऊस पडत असल्याने जिल्ह्याला रब्बी हंगामाचा जिल्हा असे संबोधले जायचे. यंदा मात्र पावसाने जूनपासूनच दमदार सुरूवात केल्याने सरासरीच्या दीडपट पाऊस झाला आहे. यामुळे जिल्ह्याची वरदायिनी असलेले उजनी धरण यंदा ओव्हरफ्लो झाल्याने प्रचंड पाणी खाली सोडावे लागले.

यंदा मध्यम प्रकल्पांपैकीही एकरूख, हिंगणी, जवळगाव, मांगी, आष्टी, बोरी, पिंपळगावढाळे आदी प्रकल्पांतही १०० टक्के इतका पाणीसाठा झाल्याने जिल्ह्याची तहान भागणार आहे. जनावरांचा चारा-पाण्याचा प्रश्न सुटला असून, इतकेच कायतर उजनीतून दोन आवर्तनेही आजतागायत सोडली आहेत. यामुळे शक्यतो काही गावातच टँकरच्या पाण्याची गरज भासेल, असा अंदाजही उपजिल्हाधिकारी नाटेकर यांनी यावेळी बांधला.

## ⏩ संक्षिप्त वृत्त



### जिजामाता प्रशालेत शिवजयंती साजरी

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे संचालित जिजामाता प्रशाला कोंडी उत्तर सोलापूर येथे संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ व सचिवा शिल्पाताई ठोकळ यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्राचे कुलदैवत स्वराज्य निर्माते जाणते राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात प्रमुख अतिथी विजयराव जाधव आणि मुख्याध्यापक उदय जाधव यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून शिवाजीराजांना मानाचा मुजराम करत साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनीची भाषणे झाली त्यानंतर प्रमुख अतिथी श्री विजयराव जाधव यांनी सर्व विद्यार्थ्यांना शिव जयंती उत्साहाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.त्यानंतर विद्यार्थ्यांनी पोवाडे पाळणा गीते गाऊन जयंती उत्सवाचा आनंद घेतला. शेवटी मुख्याध्यापक जाधव यांनी अध्यक्ष भाषण केले. या कार्यक्रमास कोंडी गावचे ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केला. सूत्रसंचालन सारंग पाटील यांनी तर आभार विजयकुमार लांडगे यांनी मानले.



### महावितरण कार्यालयामध्ये शिवजयंती साजरी

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

महावितरण औद्योगिक वसाहत कार्यालय शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तसेच महापुरुषांना अभिवादन करून महावितरण कार्यालयामध्ये शिवजयंती जयंती साजरा करण्यात आली. याप्रसंगी विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन सोलापूर मंडळ अध्यक्ष सुनील काळे, धुळाप्पा टेळे, निलकंठ कांबळे, गुंडप्पा बनसोडे, प्रदीप मुलादे, अजीम सय्यद, मल्लिनाथ मुन्नोळी, नितीन कोळी, अयाज बेपारी, अपेक्षा बहादुरे, चंद्रकला शिंदे, हिना बागवान उपस्थित होते.

### पंचाचार्य प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**अक्कलकोट, दि. २० फेब्रुवारी-**

दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ प्रसंगी उषा हंचाटे बोलत होत्या. दरमामान गौडगांव बु. येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित जगद्गुरु पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत १० वी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या उषा हंचाटे यांची उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्रशालेचे प्राचार्य कल्याणी देशेट्टी हे होते. प्रथमतः श्री गुरु सिद्धमल्लेश्वर गुरुगादी व विद्यामाता सरस्वती प्रतिमेचे पूजन जेऊरवाडी चे माजी सरपंच शिवलाल राठोड व पर्यवेक्षक लाडाप्पा शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पूजा कलशेट्टी, पल्लवी तळवार, अंबिका पाटील, अंजली पुजारी, वैष्णवी कुंभार या विद्यार्थिनींनी शाळा व गुरुजनांविषयी कृतज्ञता व्यक्त केले. यावेळी शिवलाल राठोड, उषा हंचाटे, कल्याणी देशेट्टी, शरणया हिरेमठ, गंगाधर नागशेट्टी, भारती पोतदार, सोनाली साठे उपस्थित होते.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सोलापुरात रविवारी गुरुस्मरण सोहळा

### ज्येष्ठ गायिका पं. सुलभा पिशवीकर यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

सोलापूरचे सुप्रसिद्ध तबलावादक पं. भीमराव कनकधर यांचे पंचवीसाव्या पुण्यस्मरण तसेच त्यांचे शिष्य पं. विठ्ठलदादा क्षीरसागर यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त गुरुस्मरण सोहळा आयोजित केल्याची माहिती डॉ. अनिल सर्जे पत्रकार परिषदेत दिली.

जयपुर घराण्याच्या ज्येष्ठ गायिका पं. सुलभा पिशवीकर या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम रविवार दि. २३ फेब्रुवारी रोजी हिराचंद नेमचंद वाचनालयातील लोकमान्य टिळक सभागृह (एम्फी थीएटर) सोलापूर येथे संध्याकाळी ६ वाजता संपन्न होणार आहे. भीमरावदादा हे कासी सिंदगीकर यांचे शिष्य तसेच उस्ताद शेख दाऊद यांचे गुरुबंधू होते. सोलापुरात त्यांनी अनेक विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. त्यांपैकी त्यांचे गंडाबंध शिष्य विठ्ठलराव क्षीरसागर होते. त्यांनी अनेक चित्रपटांसाठी तबला व ढोलकीची साथ केली आहे. या सोहळ्यात या दोघांचेही शिष्य ह. भ. प. प्रभाकर वाघचौरे आणि त्यांचे दोन शिष्य पुरुषोत्तम कुलकर्णी, यश जगताप या तिघांचे शास्त्रीय मृदंग संकीर्तन होणार आहे. यामध्ये रुद्रताल ते सादर करणार आहेत. दुसऱ्या सत्रात सुप्रसिद्ध तबलावादक पं. विभव नागेशकर स्वतंत्र तबलावादन सादर करणार आहेत. या कलाकारांना नगमा संगत अथर्व कुलकर्णी, पुणे हे करणार आहेत. निवेदन सतीश वैदय करणार असून ध्वनी संयोजन प्रकाश कासेगावकर करणार आहेत. या पत्रकार परिषदेला शोभा कनकधर-व्हटकर, रवींद्र क्षीरसागर, प्रभाकर वाघचौरे उपस्थित होते.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


# नागरिकांना जास्तीत जास्त सुविधा देण्याचा प्रयत्न करणार

## ▶▶महापालिकेचे नूतन आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांची ग्वाही
## ▶▶मावळते आयुक्त शीतल तेली-उगले यांच्याकडून घेतला पदभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० फेब्रुवारी-**

सोलापूर शहरवासीयांना जास्तीत जास्त मूलभूत सुविधा देण्याबरोबरच विद्यमान चांगले प्रकल्प पुढे सुरू ठेवू तसेच उत्पन्नवाढीसाठीही प्रयत्न करणार आहे, अशी ग्वाही सोलापूर महापालिकेचे नूतन आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

विद्यमान आयुक्त शीतल तेली - उगले यांची शासनाने मंगळवारी बदली केली. त्यांच्या जागी धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांची शासनाने नियुक्ती केली. दरम्यान, गुरुवारी डॉ. ओंबासे यांनी मावळते आयुक्त शीतल तेली-उगले यांच्याकडून महापालिका आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला.

यानंतर नूतन आयुक्तांनी पत्रकारांशी संवाद साधला. डॉ. सचिन ओंबासे पुढे म्हणाले की, आयुक्त म्हणून माझी नियुक्ती झाल्याबद्दल नागरिक तसेच पत्रकारांकडून मला शुभेच्छा मिळाल्या. या सर्वांकडून मला या पुढील काळात सहकार्य अपेक्षित आहे. शहराच्या नागरी समस्या जाणून घेऊन त्याची सोडवणूक करण्याचा माझा प्रयत्न राहील. नागरिकांना जास्तीत जास्त मूलभूत सुविधा देण्यात येणार आहेत. विद्यमान चांगले प्रकल्प यापुढेदेखील सुरू ठेवू. पाणी, कचरा या संदर्भातील प्रश्न मार्गी लावण्याबरोबरच मूलभूत सुविधांमध्ये वाढ करणार आहोत. महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यावरही आपला भर राहील. लवकरच आपण शहरासंदर्भात आढावा घेणार आहोत, असेही डॉ. ओंबासे यांनी स्पष्ट केले.

मावळते आयुक्त शीतल तेली-उगले यांच्याकडून नूतन आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी पदभार घेतला. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार, संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, तैमूर मुलाणी,सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, गिरीश पंडित, मनीषा मगर, कृष्णा पाटील, मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर, मुख्य लेखा परीक्षक रूपाली कोळी, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे आदींसह अधिकाऱ्यांची उपस्थित होते.

दरम्यान, याप्रसंगी नूतन आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांचा महापालिका पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष किरण बनसोडे यांच्या हस्ते ''सोलापुरातील मार्शल लॉ '' हे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक सल्लागार प्रशांत जोशी यांनी केले. यावेळी पत्रकार, कॅमेरामन मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### महिला कर्मचाऱ्यांनी केले औक्षण

डॉ. ओंबासे यांचे गुरुवारी दुपारी एक वाजता महापालिकेत आगमन झाले. तत्पूर्वी त्यांनी ग्रामदैवत सिद्धरामेश्वर मंदिरात जाऊन दर्शन घेतले. इंद्रभुवन आवारात आल्यानंतर महापालिकेतील महिला कर्मचाऱ्यांनी डॉ. ओंबासे यांचे औक्षण करून स्वागत केले.

### आठवड्यातून दोन दिवस नागरिकांना भेटणार

सोलापूर शहरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आठवड्यातून दोन दिवस आयुक्त कार्यालयात नागरिकांसाठी वेळ देणार आहे. नागरिक आपल्या समस्या यावेळी थेट मांडू शकतात, असेही यावेळी नूतन आयुक्त डॉक्टर सचिन ओंबासे यांनी सांगितले.

# आजपासून दहावीची परीक्षा

## ▶▶शहर, जिल्ह्यातील ६५ हजार ५८५ विद्यार्थी देणार परीक्षा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० फेब्रुवारी-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाकडून घेण्यात येणा-या दहावीच्या परिक्षांना सोलापूर शहर व जिल्ह्यात शुक्रवार २१ फेब्रुवारी पासून सुरूवात होणार आहे. १७ मार्चपर्यंत ही परीक्षा होईल. ही परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही, ड्रोन कॅमेरा, व्हिडिओ शूटिंग बरोबरच प्रत्येक पर्यवेक्षकाच्या खिशातील मोबाईलवर झूम मीटिंगच्या कॅमेराद्वारे करडी नजर ठेवण्यात येणार असल्याची माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली.

या परीक्षेसाठी शहर व जिल्ह्यातून ६५ हजार ५८५ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. ही परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात होण्यासाठी शिक्षण, महसूल व पोलीस प्रशासन संयुक्तपणे प्रयत्न करीत आहेत. दहावीच्या इंग्रजी, गणित, भूमिती, विज्ञान एक व दोन असे एकूण पाच विषयांच्या परीक्षेचे पूर्ण तीन तासांचे व्हीडीओग्राफी करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्राबाहेरून कॉफीचा पुरवठा होऊ नये यासाठी पोलीस तैनात करण्यात आले आहेत. ७६ परीक्षा केंद्रावरील स्थितीचे व्हिडिओ चित्रीकरण होणार आहे. शिवाय प्रत्येक हॉलवरील पर्यवेक्षकांच्या मोबाईलवर झूम मीटिंगची लिंक दिली जाणार असुन त्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून वॉररूम स्थापन करण्यात आला आहे. यातून झूम मीटिंगचा कॅमेरा सुरू करून संपूर्ण हॉलवर नियंत्रण ठेवले जाणार आहे.

दहावी परीक्षेसाठी १८४ परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आली आहेत. त्यापैकी २२ परीक्षा केंद्र संवेदनशील आहेत. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, माध्यमिक व प्राथमिक शिक्षण अधिकारी, योजना, तहसीलदार, नायब तहसीलदार, जिल्हा परिषदेचे सर्व विभाग प्रमुख यांचे परीक्षा कालावधीत भरारी पथक तयार करण्यात आले आहे. संवेदनशील परीक्षा केंद्रांवर विशेष पोलीस बंदोबस्त, तहसीलदार यांचे फिरते व बैठे पथक नेमण्यात आले आहे. जिल्ह्यात कॉपीमुक्त परीक्षा अभियान यशस्वी करण्यासाठी यंत्रणा कार्यरत असल्याचे शिक्षणाधिकारी जगताप यांनी सांगितले.

- संवेदनशील २२ परीक्षा केंद्र
- १८४ परीक्षा केंद्र झूम लाईव्हद्वारे परीक्षेची पाहणी
- पाच विषयांच्या परीक्षेसाठी ७६ केंद्रांवरील परीक्षांचे व्हिडिओग्राफी
- झूम मिटिंग ॲपद्वारे १८४ केंद्रांवर ड्रोनची नजर
- इंग्रजी, गणित, भूमिती, विज्ञान दोन असे पाच विषयांचे तीन तास परीक्षांचे व्हीडीओग्राफी
- विद्यार्थ्यांची दुसऱ्या केंद्रावर सरमिसळ बैठक व्यवस्था
- संबधित केंद्राच्या पर्यवेक्षकांची दुसऱ्या केंद्रावर नियुक्ती

### ▶▶३६ परीक्षा केंद्रावर २७३ पोलिसांचा असणार बंदोबस्त

शहरातील विविध शाळांमधील ३६ केंद्रावर ही परिक्षा होणार आहे. यासाठी पोलीस प्रशासनाकडून योंग्य ती खबरदारी घेण्यात आली असून प्रत्येक परिक्षा केंद्रावर चोख बंदोबस्त असणार आहे. त्यासाठी २७३ पोलीस अधिकारी, कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आली आहे. फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत आठ परिक्षा केंद्र आहेत. या केद्रावर दोन पोलीस अधिकारी, १६ पोलीस अंमलदार, १६ होमगार्ड, ८ महिला पोलीस अंमलदार व १६ महिला होमगार्ड तैनात असणार आहेत. जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चार शाळांमध्ये दहावीची परिक्षा घेण्यात येणार आहे. एका पोलीस अधिका-यासह २९ जणांचा बंदोबस्त लावण्यात आला आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्यांतर्गत ७, जोडभावी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ४, सदर बझार पोलीस ठाण्याच्या हद्दीत ५, विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत ६ व सलगरवस्ती पोलीस ठाण्याच्या हद्दीत २ परीक्षा केंद्र असणार आहेत.यासर्व केंद्रावर पोलीस अधिकारी, तसेच पोलीस अंमलदार व पुरूष आणि महिला होम गार्ड यांना बंदोबस्तासाठी तैनात ठेवण्यात येणार आहे. परीक्षा कालावधी पहिल्या सत्रात सकाळी ११ ते दुपारी २ व दुस-या सत्रात म्हणजेच दुपरी तीन ते सायंकाळी सहा असणार आहे. तसेच २१ फेब्रुवारी ते १७ मार्च यादरम्यान या परीक्षा पार पडणार आहेत.

### ▶▶परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात प्रवेश बंद

परीक्ष केंद्राच्या १०० मीटर अंतरात नेमणूक वगळता अन्य व्यक्तींना प्रवेश नाकारण्यात आला आहे. तसेच विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणे, साहित्य व इतर साधने वापरास या आदेशाने बंदी घालण्यात आली आहे. त्याचबरोबर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधक आदेश जारी करण्यात आला आहे.

## ▶▶संक्षिप्त वृत्त...

### अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळा अनावरणाचे नियोजन

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे भव्य स्मारक आणि पुतळा उभारण्यात येत आहे. याचे अनावरण ३१ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्याचे नियोजन सुरू आहे. यासाठी कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये कुलसचिव योगीनी घारे, प्रा. शिवाजी बंडगर, अमोल कारंडे यांचा समावेश आहे. अहिल्यादेवींच्या जयंतीचे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण करण्याचे नियोजन विद्यापीठाच्या वतीने सुरु आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने या समितीच्या सदस्यांना पंतप्रधान कार्यालयासमवेत चर्चा करुन त्यांच्याकडून वेळ प्राप्त करुन घेण्यासाठी विधानसभेचे अध्यक्ष प्रा. राम शिंदे यांच्याशी समन्वय साधून या कार्यक्रमाची रुपरेषा अंतिम करण्याची जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. तसेच स्मारक समितीचे सदस्य व इतर अभ्यासक यांच्याशी समन्वय साधून या कार्यक्रमाचे योग्य नियोजन करून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचनाही कुलगुरु डॉ. महानवर यांनी दिले आहेत.



### बुर्ला महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उद्या

**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

सोलापूर पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयाचा ३५वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शनिवार २२ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालयात होत आहे. संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.श्रीनिवास कोंडी यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या समारंभाचे प्रमुख पाहुणे पुणे येथील यशदाचे उपमहासंचालक मल्लिनाथ कलशेट्टी हे आहेत. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष ॲड. श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप, सहसचिव श्री. मल्लिकार्जून सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम यांची प्रमुख उपस्थिती आहे. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्य डॉ.अशोक एक्कलदेवी व प्रशासकीय अधिकारी डॉ.राजेंद्र शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापक वर्ग व कार्यालयीन कर्मचारी परिश्रम घेत आहेत. या कार्यक्रमास विद्यार्थीनींनी व पालकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ.अशोक एक्कलदेवी यांनी केले आहे.

# गजानन महाराजांचा प्रकट दिन उत्साहात

## ● गण गण गणात बोतेचा जयघोष; १५ हजार भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

सद्गुरू श्री गजानन महाराज की जय जय गजानन श्री गजानन गण गण गणात बोते चा जयघोषात श्री संत गजानन महाराजांच्या १४७ व्या प्रकट दिन सोरेगाव येथील श्री गजानन मंदिरात उत्साहात झाला.

मंदिरात दर्शनासाठी सोलापूरसह दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट, आणि मोहोळ येथून हजारो भाविकांची गर्दी केली. श्री च्या दर्शनासाठी रांगाची सोय करण्यात आली होती. खासगी वाहनासह सोरेगाव मार्गे ये-जा करणा-या महापालिका परिवहन बसेस मंदिरा मार्गे वळविण्यात आले होते. प्रकट दिनाच्या निमित्ताने श्री गजानन महाराज शेगाव सांस्कृतिक मंडळाच्या वतीने गेल्या तीन दिवसापासून विविध धार्मिक कार्य केले होते दररोज सकाळी ६ ते ७ मंगलवाद्य, काकड आरती भूपाळी ९ ते १० श्री च्या पादुकस दुग्धाअभिषेक व रुद्र पूजा दहा ते बारा वाजेपर्यंत सामूहिक गजानन विजय ग्रंथाचे पारायण झाले तसेच दुपारी १ते ५ या वेळत सोलापूरातील मुक्ताई, गुरुमाई,मार्कंडेय, दुर्गामाता,, द्वारकाधिश,स्वरा,रेणुका, दुर्गा महिला भजनी मंडळांचा कार्यक्रम झाला. मंगळवार रोजी सायंकाळी डॉ. संध्या जोशी.व त्यांच्या शिष्य गणासमवेत तर बुधवारी दीपक कलढोणे यांच्या भक्ती गीते शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम ास रसिकांनी भरभरून दाद दिली.

प्रकट दिनाच्या निमित्ताने सौ.व श्री विजयकुमार सिंगघ आणि सौ.श्री. विश्वनाथ कुलकर्णी यांच्या शुभ हस्ते श्रींच्या मूर्तीसद दुग्धाअभिषेक करण्यात आला. संस्कार भारती मार्फत सुंदर रांगोळी रेखाटले होते. सर्व भाविकांचे लक्ष रांगोळी कडे आकर्षीले गेले. श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण झाले दुपारी बारा वाजता गुलाल कार्यक्रम झाले त्यानंतर त्यानंतर मंडळाचे अध्यक्ष जयप्रकाश पाखरे उपाध्यक्ष विजयकुमार कार्यवाह गुरुलिंग कन्नूरकर सहकोषाध्यक्ष नारायण जोशी सह सर्व संचालक व भक्तगणांच्या समवेत महाआरती करण्यात आली.

सायंकाळी पाच वाजता श्रींच्या पालखीचे मिरवणूक काढण्यात आली. मंडळामार्फत भक्तांसाठी २० हजार मोतीचूर लाडू व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभरात १५ हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. मंडळाचे अध्यक्ष जयप्रकाश पाखरे यांच्या हस्ते रक्तदान शिबीराचे उद्घाटन झाले. प्रकटदिनाच्या सोहळ्यासाठी मंडळाचे तरुण विश्वस्त नितीश पाखरे, प्रफुल्ल सिंगी,यश पाटोल,संदिप कन्नूरकर, राजीव घाटे,,महेश अक्कलकोटे, वेदांत कन्नूरकर, संस्कार कन्नूरकर, शेखर फुलसरे (कोल्हापूर) मंडळाचे व्यवस्थापक सिध्देश्वर कुर्ले रमेश भंडारे, विशाल बागल (पूणे), तन्नू शेख त्याच बरोबर चंडक तंत्रनिकेतनचे राष्ट्रीय स्वयंसेवक योजनेचे ५० आणि श्री गजानन उपासना केंद्राचे ५० स्वंयसेवकांनी परिश्रम घेतले.







# ८० लाखांची फसवणूक; पैलवान पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी -**

शेअर बाजारातून ज्यादा परतव्याचे आमिष दाखवून ८० लाखाची फसवणूक करणारा पैलवान हा गुरुवारी स्वत:हून विजापूर नाका पोलिसांत हजर झाला. मात्र हा गुन्हा, अर्थिक गुन्हे विभागाकडे वर्ग झाल्याने विजापूर नाका पोलिसांनी आरोपीस आर्थिक गुन्हे शाखेच्या ताब्यात दिले आहे. शुक्रवारी त्यास न्यायलयात हजार केले जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांत तोंडी दिलेल्या माहितीनुसार आरोपीने आजपर्यंत एकुण १२४ जणांचे १५ कोटी ४० लाख देण्याचे बाकी असल्याचे सांगितले. प्रत्यक्षात ही रक्कम वाढवण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोलिस सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार त्यावर किती विश्वास ठेवायचा हा शोधाचा भाग आहे.

फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात पैलवान बेपत्ता झाल्याची फिर्याद पत्नी रेखा पैलवान यांनी दिली होती. दरम्यान, ८० लाख रुपयांची फसवणूक झाल्याची फिर्याद आशिष अशोक पाटील (वय २५, रा. न्यू संतोषनगर) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात दिली. यावरून निवृत्ती मारूती पैलवान व त्यांची पत्नी रेखा निवृत्ती पैलवान (दोघे रा. १०५ आर्शं रेसिडेन्सी,एसआरपी कॅम्प जवळ, विजापूर रोड, सोलापूर) यांच्याविरुध्द विजापूर नाका पोलिसांत मंगळवारी गुन्हा दाखल झाला. फसवणुकीची घटना १ ऑगस्ट २०२१ ते २० जानेवारी २०२५ दरम्यान घडली आहे. या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे आहे.

# महापालिकेतील वरिष्ठ मुख्य लेखनिक चंद्रकात दोंतूल याच्यावर निलंबनाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

जागेच्या कर आकारणीस नावांची नोंद करण्यासाठी लाच घेतल्याप्रकरणातील महापालिका मालमत्ता कर विभागातील वरिष्ठ मुख्य लेखनिक चंद्रकात लक्ष्मण दोंतूल यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी तसे आदेश काढले आहेत.

दोंतूल हे महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडे कार्यरत असून, त्यांच्याकडे नेमून दिलेल्या पेठेतील कर निरिक्षक या पदाची जबाबदारी सोपविण्यात आलेली होती. संबंधित तक्रारदार यांनी ३ हजार गुंठे जागा नोटरी पध्दतीने खरेदी केलेल्या जागेची कर आकारणीस नावांची नोंद करण्यासाठी दि.४ जुलै २०२४ रोजी सादर केलेल्या अर्जावर, खरेदी केलेल्या जागेचा सन १९९२ पासून ते मार्च-२०२५ पावेतोचा कायदेशीर कर एकूण १ लाख ७७ हजार रुपये भरण्यास सांगितले. तेवढा कर भरायचा नसेल तर ५० हजार रुपये पैकी सन १९९२ ते मार्च-२०२५ पावेतोचा कर भरण्याची पावती देतो असे सांगून तक्रारदार यांच्या कडून ५० हजार रुपयाचा स्विकार करुन त्यापैकी २१ हजार २५५ रुपयांची ऑनलाईन पावती तक्रारदार यांना दिली.






उर्वरित २८ हजार ७४५ रुपये लाच रक्कम स्वरुपात स्वीकारली असल्याने चंद्रकांत दोंतूल यांना मनपाचे हुतात्मा स्मृती मंदीर नाटय गृहाच्या आवारात असलेल्या कर आकारणी येथे रंगेहाथ पकडण्यात येवून त्यांच्यावर सदर बझार पोलीस ठाणे सोलापूर शहर गु.र.नं. ६१/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच

गुन्हा नोंदवून अटक करण्यात आली होती. त्यांना विशेष न्यायालय सोलापूर येथे समक्ष हजर केले असता २ दिवस पोलीस कस्टडी मंजूर केली असल्याचे एसीबी सोलापूर यांच्या पत्रावरुन दिसून येते.ही बाब कार्यालयीन शिस्तीचा भंग करणारी असून त्यांच्या गैरवर्तनामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) १९७९ नियम ३ (१) एक ते तीन) या तरतुदीचा भंग झालेला आहे. त्यांच्या गैरवर्तणूकीमुळे सोमपाची प्रतिमा जनमाणसात मलिन झाली. व.मु.ले. चंद्रकांत दोंतूल यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे प्रस्तावित असून, शिस्तभंगाची कारवाईस बाधा येऊ नये म्हणून, त्यांना निलंबनाधिन ठेवणे आवश्यक आहे. यामुळे व.मु.ले. चंद्रकांत दोंतूल यांना दि.२३ जानेवारी २०२५ च्या कार्यालयीन वेळेनंतर पासून पूर्वलक्षी प्रभावाने सेवेतून निलंबित करण्यात येत आहे, असे महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे.




## ज्ञानामृत आनंदलहरी - १०३५

**यावरी जे भक्त । आपणपें मज देत ।**
**तेचि मी योगयुक्त । परम मानी ॥**

विश्वरुपामध्ये आणि श्रीकृष्णाच्या सगुण रुपामध्ये अर्जुनाने फरक केल्यानंतर भगवंत अर्जुनाला दोन्ही रुपातील साम्य कसे आहे हे सांगत आहेत. श्रीकृष्णाचे रुप किंवा श्रीकृष्णाचा देह हा विश्वरुपापासून भिन्न नसून तो त्याचाच एक भाग असल्याचे ते सांगतात. मी आणि जीवमात्र अजिबात भिन्न नाहीत. प्रत्येक जीवमात्रात आपण व आपल्यात जीवमात्र असल्याचे भगवंत म्हणतात. अर्जुनाने हा लहान-मोठा, गरीब-श्रीमंत असा कुठलाही भेद न पाहता सर्व चराचरात ईश्वराला पाहावे अशी भगवंतांची ईच्छा आहे. प्राणीमात्रांवर केल्या जाणा-या प्रेमाला मर्यादा नसावी. अस्ताचलाच्या जवळ म्हणजे पश्चिम दिशेकडे गेलेल्या सूर्यबिंबाच्या मागोमाग ज्या प्रमाणे सूर्याचे किरण जातात, त्याप्रमाणे सर्व इंद्रियासह, माझ्या म्हणजे विश्वरुपाच्या ठिकाणी आपले चित्त लावून, जे भक्त रात्र अथवा दिवस असा विचारही मनात आणत नाहीत व माझी सतत उपासना चालू ठेवतात ते मला आवडतात असे भगवंत म्हणाले. विश्वरुप म्हणजे दुसरे तिसरे काही नसून सर्व जीवमात्रांची, चांगल्यावाईटांची



गोळा-बेरीज होय, एकत्रिकरण होय. या विश्वातील सर्व जीवांना एकत्रित करुन अर्जुनाला विश्वरुप दाखवून प्रत्येक जीव म्हणजेच भगवंत असल्याची प्रचिती भगवंतांनी यापूर्वीच अर्जुनाला दिली आहे. या सर्व जीवांची सेवा करतांना, त्यांच्यावर प्रेम करतांना भरपूर केले, आता पुरे झाले म्हणण्याची गरज नाही. हे प्रेम सतत चालू राहिले पाहिजे, वरचेवर त्यात वाढ होत गेली पाहिजे. गंगानदी किंवा इतर कोणतीही नदी समुद्रास मिळाली म्हणून तिचा मागून येणारा ओघ थांबत नाही. समुद्रांची भेट झाल्यानंतरही तिचा मागून ओघ चालूच राहतो, त्याप्रमाणे माणसाने प्रेमाबाबत आता इच्छित मिळाले म्हणून किंवा पुरेसे झाले, उद्दिष्ट साध्य झाले म्हणून प्रेमाला, आवडीला बांध घालू नये, ते सतत चालू ठेवावे. आपली इंद्रिये आपल्या बंधनात ठेवून माणसाने आपले प्रेम, वर्तन करावे. इंद्रियांना स्वैर सोडून जर आपण वागत गेलो तर प्रेमाचा सुगंध दरवळण्याऐवजी, दुर्गंध दरवळू लागेल. प्राणीमात्रांवरील प्रेमात नि:स्वार्थ भावनेने जे भक्त सर्वस्व अर्पण करतात, ते मला खूप आवडतात. हेच भक्त खऱ्या अर्थाने श्रेष्ठ व योगसंपन्न असतात, हे सांगतांना भगवंत म्हणतात, यावरी जे भक्त । आपणपे मज देत । तेचि मी योगयुक्त । परम मानी ।।. भगवंताच्या या उपदेशावरुन लक्षात येत असेल की, प्राणीमात्रांची सेवा ही नि:स्वार्थ भावनेने करणाऱ्याला ईश्वरप्राप्तीसाठी वेगळे काही करावे लागत नाही. माऊलींचे किंवा इतर संतमहात्म्यांचे जीवनचरित्र पाहिले तर त्यांनी प्राणीमात्रांचीच नि:स्वार्थ भावनेने सेवा करुन त्यातच समाधान मानल्याचे दिसून येते. आपणाला त्यांच्या पावलावर पाउल ठेवून चालायचे आहे, हे विसरता कामा नये. संतांच्या पाऊलावर पाऊल टाकून चालण्याचा प्रयत्न करणे म्हणजे आनंदाच्या मार्गावर चालणे होय.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २१ फेब्रुवारी २०२५ | जागतिक मातृभाषा दिन, |
| विक्रम संवत् २०८०-८१ | श्री ब्रजभूषण महा. पु.ति. |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. अष्टमी (११.५७) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - अनुराधा (१५.५२) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - व्याघात (११.५८) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (२४.४३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**वृषभ :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**कन्या :** लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निमर्ाण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा.

**मकर :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल.

# एकच जागा दोघांना विक्री करणाऱ्या चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी -**

शेतातील पाच आर जागा दोघांना विक्री करून ८ लाख ७५ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी चौघांविरूध्द सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार २५ ते २६ ऑगस्ट २020 यादरम्यान घडला.




याबाबत मनोज उध्दव घोडके (वय ३०, रा. भैरव कॉलनी,दमाणी नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अनिल वालचंद रजपूत, स्वप्निल अनिल रजपूत, कमल अनिल रजपूत व कुमार चव्हाण (रा. शिवाजी नगर लमाण तांडा, सोलापूर) विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील सर्व आरोपी यांनी संगनमत करून २५ ते २६ ऑगस्ट २020 या कालावधीत आरोपी अनिल रजपूत याची शिवाजी नगर ग्रामपंचायत हद्दीत २७/१ अ पैकी वायव्य दिशेची 0.0५ आर क्षेत्राची विहीरीची जागा सचिन शंकरराव ठोकळ व सत्वजय सचिन ठोकळ यांना सह दुय्यम निबंधक वर्ग २ सोलापूर उत्तर १ यांच्या कार्यालयातील दस्त क्र. ४0८५/२0१९ दि. १९ जानेवारी २0१९ अन्वये खरेदी दिली. हा व्यवहार २६ ऑगस्ट २020 रोजी झाला. दरम्यान हीच जागा सर्व आरोपींनी बेकायदेशीर रित्या सह दुय्यम निबंधक कार्यालयातील दस्त क्र. २२२१/२020 दि. २५ ऑगस्अ २0२0 अन्यवये मनोज घोडके यांस नोंदवून दिली. त्याबदल्यात आरोपींनी घोडके याच्याकडून ८ लाख ७५ हजार इतकी रक्कम घेऊन फसवणूक केली. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक शिंदे करत आहेत.



# कार्यालयीन अधिक्षकांना मोटार वाहन निरीक्षकाकडून शिवीगाळ

## आरटीओ कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे काळ्या फिती लावून निदर्शने

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी -**

सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयातील कार्यालयीन अधिक्षकांना मोटार वाहन निरीक्षकांनी केलेल्या शिवीगाळ, दमदाटीच्या निषेधार्थ आरटीओ कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी गुरुवारी काळ्या फिती लावून निदर्शने केली.

सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालय येथील कार्यालयीन अधीक्षक गणेश जगताप यांना मोटार वाहन निरीक्षक शिरीष पवार यांनी शिवीगाळ, दमदाटी करून धमकी दिल्याची घटना घडली आहे. या घटनेच्या निषेधार्थ गुरुवारी कार्यालयाच्या आवारात कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी काळ्याफिती लावून निदर्शने करण्यात आली. यावेळीसंबंधित घटनेची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी कर्मचाऱ्यांच्यावतीने निवेदनाद्वारे करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ गुरुवारी दिवसभर काळ्याफिती लावून कामकाज करण्यात आले असल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले.

# शुद्ध पाणी ही उत्तम आरोग्याची गरज : उपशिक्षणाधिकारी हवेली

## सरस्वती मंदिर संस्थेत आर.ओ.वॉटर प्लांन्टचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० फेब्रुवारी-**

पोषक अन्नघटक, वैयक्तिक व सामाजिक आरोग्य याबरोबरच शुध्द पाणी हा घटक अतिशय म हत्त्वपूर्ण आहे. उत्तम आरोग्यासाठी शुद्ध पाण्याची गरज आहे. शुद्ध पाण्याच्या आवश्यकतेबरोबरच काटकसरीने पाण्याचा वापर करणे नितांत गरजेचे आहे, असे ओजस्वी विचार माध्यमिक शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी स्वाती हवेली यांनी व्यक्त केले.



श्री सरस्वती मंदिर संस्थेत खासदार निधीतून मंजूर झालेल्या आर.ओ.वॉटर प्लान्टच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. उद्घाटनानंतर दिलेल्या शाळा भेटीत त्यांनी शाळेतील विज्ञान, संगणक, संगीत, ग्रंथालय व क्रीडा विभागास भेट दिली. विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. प्रशालेच्या कार्यालयास भेट देऊन कार्यालयीन दफ्तराची पाहणी केली. शासनाच्या आदेशानुसार शाळास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या विविध समित्या व त्यांच्या काम काजाची पाहणी करून, विद्यार्थी उपस्थिती, विद्यार्थी सुरक्षितता, शालेय स्वच्छता व एकंदर कार्यपद्धतीबाबत समाधान व्यक्त केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष अॅड. रघुनाथ दामले, सचिव प्रीति चिलजवार, मुख्याध्यापिका नीता येरमाळकर, माध्य. शिक्षण विभाग शिक्षण विस्तार अधिकारी मल्लिनाथ स्वामी, सहशिक्षिका सुचेता पोकळे आदी उपस्थित होते. पर्यवेक्षक मुकुंद गिरी यांनी आभार मानले.

# युवा सेनेच्या विजयी दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्याची तयारी जोमाने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ फेब्रुवारी-**

युवा सेना आयोजित युवा विजय दौरा अंतर्गत सोलापूर येथे पहिल्या टप्प्यातील युवा सेनेची आढावा बैठक शिवस्मारक भवन सोलापूर येथे नुकतीच संपन्न झाली. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, हिंदुह्दयसम्राट बाळासाहेब ठाकरे धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून बैठकीस सुरुवात झाली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव ऋतुराज क्षीरसागर होते. तर यावेळी विचार मंचावर युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र निरीक्षक वीरेंद्र मंडलिक, कार्यकारणी सदस्य शिवाजी जाधव, कार्यकारणी सदस्य सुजीत खुर्द, कार्यकारणी सदस्य प्रिया परंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक युवा सेना जिल्हाप्रमुख सागर शितोळे यांनी केले. यावेळी युवा सेना पश्चिम महाराष्ट्र सचिव ऋतुराज क्षीरसागर यांनी युवा विजय दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्याबाबतची माहिती दिली व जोमाने कामाला लागण्यास सांगितले. या बैठकीच्या दरम्यान युवा सेनेच्या उपजिल्हाप्रमुख पदी नामदेव पाटील, मुबिन भेलमे, सागर शिंदे, अनिकेत सूळ यांची निवड करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये युवा सेनेचा वाटा हा सिंहाचा असेल, असे मत युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र निरीक्षक वीरेंद्र मंडलिक यांनी व्यक्त केले. या बैठकीस सागर पाटील, सरपंच ऋतुराज सावंत, सागर शितोळे, बालाजी बागल, प्रियदर्शन साठे, समर्थ मोटे उपस्थित होते.

# महिनाखेर हयातीचे दाखले द्या, अन्यथा अनुदान मिळणार नाही

## उत्तरचे तहसीलदार पाटील यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

राज्य शासनाच्या आदेशानुसार संजय गांधी निराधार व श्रावण बाळ निराधार योजनेतील लाभार्थ्यांचे हयातीचे दाखले जमा करणे आवश्यक आहेत. या लाभार्थ्यांनी तातडीने उत्तर सोलापूर तहसील कार्यालयात २८ फेब्रुवारीपूर्वी सर्व कागदपत्रे दाखल करावीत, कागदपत्रे सादर न केल्यास लाभार्थ्यांना अनुदान मिळणार नसल्याची सुचना वजा इशारा उत्तर सोलापूरचे तहसीलदार निलेश पाटील यांनी दिला.

राज्य शासनाच्या १९ डिसेंबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार संजय गांधी व श्रावण बाळ योजनेचे लाभार्थी यांना शासनाकडून निराधार योजनेचे अनुदान डी. बी. टी. पोर्टलव्दारे वितरण प्रणालीद्वारे करण्यात येत आहे. यासाठी सातत्याने लाभार्थ्यांना आधार कार्ड, बँक पासबुक, आधारकार्डशी निगडीत मोबाईल क्रमांक, हयातीचा दाखला सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तरीही याकडे लाभार्थ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे पाटील यांनी सांगितले.

निराधार लाभार्थ्यांनी संजय गांधी योजनेतील हयात प्रमाणपत्र, आधार कार्ड छायांकित प्रत, बँक पासबुक छायांकित प्रत, रेशन कार्ड छायांकित प्रत व मोबाईल नंबर आदी आवश्यक कागदपत्रे तातडीने जमा करावीत, असे आवाहन तहसीलदार पाटील यांनी केले आहे. दरम्यान, ज्या लाभार्थीकडून कागदपत्रे जमा करण्यात येणार नाहीत, असे लाभार्थी लाभापासून वंचित राहिल्यास यास सर्वस्वी जबाबदारी लाभार्थी यांची राहिल. यामुळे सर्व लाभार्थ्यांनी आपली कागदपत्रे तहसील कार्यालय उत्तर सोलापूर येथे संजय गांधी शाखेत जमा करावेत.

# शिवजयंती निमित्त शिवकालीन नाण्यांचे प्रदर्शन

## सिध्देश्वर इंग्लिश मिडियम प्रायमरी स्कूल, वारसा फाऊंडेशनचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २० फेब्रुवारी-**

श्री सिद्धेश्वर देवस्थान संचलित श्री सिध्देश्वर इंग्लिश मिडीयम प्रायमरी स्कूल, सोलापूर आणि वारसा फाउंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती निमित्त शालेय परिसरात मध्ययुगीन आणि शिवकालीन नाण्यांचे प्रदर्शन भरवण्यात आले.



यावेळी शिवजन्मोत्सव सोहळ्याचे ही आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून आणि नाण्यांची इत्यंभूत माहिती देण्यासाठी वारसा फाउंडेशनचे संस्थापक नितीन अन्वेकर यांची प्रमुख उपस्थिती दर्शविली. शिवकालीन शिवराई आणि मौर्यकालीन जगातील सर्वात लहान नाणी हे प्रदर्शनातील मुख्य आकर्षण होते. या बरोबरच इंदोरच्या होळकर घराण्यातील मोडी लिपीतील मराठी भाषिक व्यवहारिक पत्रे ही विद्यार्थ्यांना पहायला मिळाली.

या नाविण्यपूर्ण उपक्रमाचे उत्साही आयोजन करणाऱ्या मुख्याध्यापिका नीता सोमवंशी, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे श्री सिध्देश्वर शिक्षण संकुलाचे संचालक धर्मराज कडादी व शालेय गुणवत्ता वाढ समितीचे अध्यक्ष डॉ. राजशेखर येळीकर यांनी कौतुक केले.

# शासकीय रेखाकला परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० फेब्रुवारी-**

महाराष्ट्रासह पाच राज्यात शासकीय रेखा कला परीक्षा घेतली जाते. याचे नियोजन कला संचालनालय, मुंबई.मार्फत घेण्यात येत असलेल्या शासकीय रेखाकला (एलिमेंट्री इंटरमिजिएट चित्रकला ग्रेड) परीक्षा २०२४ मध्ये एकूण ७ लाख ५० हजार ९३५ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट होते. सोलापूर जिल्ह्यातून २३ हजार ४१० विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते.

पहिल्यांदाच १०० विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीत सोलापूरचे २८ विद्यार्थ्यांनी आपले यश संपादन केले. या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोलापूर जिल्हा शैक्षणिक कला शिक्षक संघटनेतर्फे करण्यात आले. १९ फेब्रुवारी शिवजयंतीचे औचित्य साधून शासकीय रेखाकला परीक्षा (एलिमेंटरी इंटरमिजिएट ग्रेड) मध्ये



सोलापूर शहरातील विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा संपन्न झाला. सर्वप्रथम छत्रपतींच्या प्रतीमेस पुष्प अर्पण करण्यात आले. यावेळी राज्याध्यक्ष शेरशाह डोंगरी यांनी म्हणाले चित्रकलेत पारंगत असलेले विद्यार्थीच अभ्यासात हुशार असतात.

विद्यार्थ्यांचा गौरव स्मृतिचिन्ह, दोनशे रुपयाचे बंद पाकीट व पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. अखिल महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संघटनेचे राज्य अध्यक्ष माननीय शेरशहा डोंगरी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम घेण्यात आला तर राज्य उपाध्यक्ष माननीय शशिकांत मोटगी व राज्य सहसचिव माननीय शांतप्पा काळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. जिल्हाध्यक्ष शशिकांत सदाफुले, सचिव संतोष धारेराव, ज्ञानेश्वर कांबळे, सचिन कोरे, शैलेश कुलकर्णी, सिद्धाराम काळे, चेतन महाजन, नागराज रमणशेट्टी, मोहन कांबळे, सोमेश्वर म्हेत्रे, अविनाश पवार, सुभाष सुतार उपस्थित होते. सूत्रसंचालन संतोष धारेराव यांनी केले तर आभार शैलेश कुलकर्णी यांनी मानले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख
राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (५८) नवाकाळ

१९३३ साली डिसेंबर मध्ये नागपूरला अखिल महाराष्ट्र साहित्य संमेलन झाले. तीच वेळ साधून डॉक्टरजींनी नागपूरलाच सैनिकी पद्धतीने संघ स्वयंसेवकांची छावणी उभारली. त्यात शेकडो तरुण सहभागी झालेत. त्या तरुणांचा सैनिकी गणवेश, त्यांचे शिस्तबद्ध संचलन व त्या तरुणांनी स्वतःच्या श्रमाने उभारलेली पांढऱ्या तंबूंची छावणी, हे सर्व 'जिवंत साहित्य' पाहण्यासाठी डॉक्टरांनी संमेलनातील सर्व साहित्यिकांना आमंत्रित केले होते. सर्वजण ही एकत्रित अनुशासन पद्धती पाहून आश्चर्यचकित झाले. सर्वांनी डॉक्टरांच्या संघटन कौशल्याचा गौरव केला. तेव्हा नवाकाळ वृत्तपत्राचे संपादक श्री. काकासाहेब खाडिलकर कौतुकानी म्हणाले आम्ही साहित्यिक वाचीवीर आहोत. हजारो व्याख्याने देऊन व लेख लिहून जे आम्हाला साधणार नाही; ते डॉक्टरांनी

कृतीशीलतेतून दाखवले. आम्ही सर्वांनी इथे शक्तीचे दृश्य स्वरूप पाहिले. डॉक्टरजी त्यांना उत्तर देते झाले- हिंदुस्थानात हिंदूंचा नवाकाळ निर्माण करण्यासाठी स्फुरण देणारी कृतीशीलता अखंड हिंदुस्तान साठी आज हवी आहे. अन्यथा पूर्वीचा गांधार आज जसा अफगाणिस्तान झाला आहे; तशी ही माझी भारतमाता इस्लामीस्थान बनेल, असे होऊ नये म्हणून संघाची स्थापना केली. हिंदू राष्ट्रवादाची संकल्पना मनामनात रुजवणे हे संघाचे ध्येय ठरवले. व हिंदू धर्मातील स्पृश्य अस्पृश्य हा भेद विसरून सर्व जातींची एकता आणि एकजूटता यावर जोर देऊन संघ शाखेत संस्कार केले जातात. त्याचेच हे दृश्य स्वरुप आहे.

**- क्रमशः**

## शिवजयंतीचा उत्साह



### कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर

येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन समारंभ समिती, राष्ट्रीय सेवा योजना आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे आणि उपप्राचार्य डॉ. राजेश कवडे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली. प्रतिमा पूजनानंतर, छत्रपती शिवाजी महाराज- एक व्यवस्थापन गुरु या विषयावर प्राध्यापक डॉ. उमेश साळुंखे यांचे व्याख्यान झाले. प्रास्ताविक व वक्त्यांचा परिचय समारंभ समितीचे प्रमुख प्रा. डॉ. दत्ता डांगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. भारती सुडके यांनी केले. शेवटी, उपस्थितांचे आभार प्रा.डॉ. रविराज कांबळे यांनी मानले. कार्यक्रमास डॉ. सुशील शिंदे, डॉ. रमेश शिंदे उपस्थित होते.



### मातोश्री ईश्वराम्मा विद्यालय, पंढरपूर

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक सर्वसामान्य रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती श्री. रुक्मिणी विद्यापीठ संचलित मातोश्री ईश्वराम्मा विद्यालय व ज्युनिअर कॉलेज पंढरपूर येथे संस्थापक सचिवा सनेत्रा पवार यांचे हस्ते छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून नतमस्तक होऊन मानाचा मुजरा करुन अभिवादन करण्यात आले. शिक्षिका विभावरी डुबल यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. यावेळी सुरज चव्हाण, उमाक्का पाटील या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.तर कल्याणी जगताप, साईराज देशमुख यांनी लाठीकाठी व पोवाडा गायनातून सर्वांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून सर्वत्र वातावरण शिवमय करून टाकले. कार्यक्रमासाठी प्राचार्या नंदिनी गायकवाड उपस्थित होते. सूत्रसंचलन सविता लोखंडे यांनी केले. तर आभार माधुरी बोडके यांनी मानले. विद्यार्थ्यांना मिठाई देऊन कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अभिजीत कोष्टी, विजय भंडारे, पुंजाजी ढोले यांनी परिश्रम घेतले.



### इरा पब्लिक स्कूल, करमाळा

न्यू इरा पब्लिक स्कूल जेऊर येथे शिवजयंतीचे औचित्य साधून वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिवरायांच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. आरुष लक्ष्मण शिरसकर या विद्यार्थ्याने शिवरायांची वेषभूषा परिधान केली होती. केतकी सारंग कुलकर्णी हिने जिजाऊंची वेशभूषा परिधान केली होती व पूर्वा राहुल चव्हाण हिने सईबाईंची वेशभूषा परिधान केली होती. विद्यार्थ्यांनी शिवरायांचा इतिहास आपल्या वक्तृत्वाने सादर केला. विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या गाण्यावर लेझीम नृत्य सादर केले. घाडगे यांनी शिवरायांचा इतिहास आपल्या वक्तृत्वाने सादर केला. अपेक्षा अवसरे मॅडम यांनी सूत्रसंचालन केले.




### जयप्रकाश बिले पब्लिक स्कूल, करमाळा

झरे (ता. करमाळा) येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमासाठी संस्थेच्या संचालिका स्वाती बिले कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या. तसेच संस्थेचे मुख्याध्यापक अमृता परदेशी व सतीश कोंडलकर, क्रीडाशिक्षक तानाजी हरणावळ उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आली. काही विद्यार्थांनी शिवरायांच्या कार्याबद्दल आपले अनमोल विचार मांडले. शंभूराजे साडेकर व ध्रुव क्षीरसागर यांनी छत्रपती शिवरायांची वेशभूषा केली. सूत्रसंचालन नफिसा घोडके यांनी केले.



### छत्रपती ग्रुप, बार्शी

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बार्शीतील छत्रपती ग्रुपच्यावतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यंदा प्रथमच तृतीयपंथीयांचा सन्मान करुन त्यांना आरतीचा मान देण्यात आला. या अनोख्या उपक्रमांतर्गत तृतीयपंथीयांना सन्मानपूर्वक निमंत्रित करुन माजी नगरसेवक विजय राऊत यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांची आरती करण्याचा मान तृतीयपंथीयांना देण्यात आला. यावेळी माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमात तृतीयपंथी समाजाचे प्रतिनिधी किरण मस्तानी यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच छत्रपती ग्रुपचे अध्यक्ष अजय पाटील यांनी या उपक्रमाच्या उद्देशाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमानंतर लाडू वाटप करण्यात आले. यावेळी तृतीयपंथी समाजाचे मार्गदर्शक सचिन वायकुळे, जय शिवराय प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय राऊत, माजी नगरसेवक संदेश काकडे, पाचू उघडे, रंजेश मुसळे, किरण कोकाटे, सुहास गुंड, सचिन राऊत, अमोल वाणी उपस्थित होते.

# अक्कलकोटमध्ये शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची प्राणप्रतिष्ठापना

## दीड हजार महिलांची उपस्थिती



**आज मिरवणूक : शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत शहरातील प्रमुख मार्गावरून छत्रपती शिवाजी महाराजांची मिरवणूक निघणार असल्याचे अध्यक्ष प्रसाद मोरे यांनी सांगितले.**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० फेब्रुवारी-**

जय भवानी...जय शिवराय...!! च्या जयघोषात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आणि महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळ यांच्या वतीने जुना राजवाडा समोरील मंडपात छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहारुढ पुतळ्याची प्राणप्रतिष्ठापना व शिवरायांचा पाळणा दीड हजार महिलांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आणि महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आधारस्तंभ जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाचे अध्यक्ष महेश इंगळे व मंडळाचे मार्गदर्शक सुरेशचंद्र सूर्यवंशी, शामराव मोरे, बाबासाहेब निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली संयोजक अमोलराजे भोसले मित्र मंडळ यांच्यावतीने शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला.

दरम्यान प्रतिष्ठापना व पाळणा कार्यक्रम जुना राजवाडा समोरील शामियाना मंडपात छत्रपती शिवरायांच्या सिंहारुढ पुतळ्याची प्रतिष्ठापना बुधवारी सायंकाळी ६ वा. हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थाच्या संस्थापिका अध्यक्षा व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या विश्वस्ता अलका जन्मेजयराजे भोसले, सचिवा अर्पिताराजे अमोलराजे भोसले, अनिता खोबरे, अनुया फुगे, सोनाली शिंदे, रत्नमाला मचाले, स्मिता कदम, पल्लवी कदम, संगिता भोसले, स्वाती निकम, उज्वला भोसले, पल्लवी नवले, कविता वाकडे, कविता भोसले, रूपा पवार, क्रांती वाकडे, छाया पवार, जयश्री माने, प्रांजली घाटगे, पुष्पा घाडगे, स्वप्ना माने, तृप्ती बाबर, आशा कदम, ज्योती कदम, कल्पना मोरे, सरोजनी मोरे, धनश्री पाटील, ऋति मोरे, अनिता साळुंखे, दिपाली हत्ते, सुवर्णा धोत्री, सिमा फुटाणे, सुवर्णा घाटगे, लता मोरे, प्रमिला देशमुख, उषा छत्रे, वर्षा चव्हाण, कोमल क्षीरसागर, मल्लम्मा पसारे, सोनाल जाजू, मनिषा माळशेट्टी, सुवर्णा साखरे, सुजाता भीमपूरे, स्नेहलता जाधव, सूनयना मोरे, लक्ष्मी अचलेर, प्रिया देवकर, कामिनी भोसले, वैशाली हावनुर, संगीता राठोड, स्वाती माने-पाटील, शोभा शिंदे, राणी बुधले, दिपिका शिर्के, सुनंदा तेली, लक्ष्मी माने, रंजना मोरे, रेखा पाटील, प्रांजली घाडगे, सुवर्णा कदम, स्नेहल माळशेट्टी, पवित्रा मलगोंडा, सिनिता हडलगी, अलका थोरात यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्राणप्रतिष्ठा महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळाचे संस्थापक जेष्ठ नेते सुरेशचंद्र सूर्यवंशी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे जन्मेजयराजे भोसले, प्रथमेश इंगळे, उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, लक्ष्मण पाटील, संतोष भोसले, सिद्धेश्वर मोरे, ओंकारेश्वर उटगे, विश्वनाथ देवरमनी, दत्ता पाटील, राजू इंगळे, मोहनराव चव्हाण, सुनील बंडगर, मल्लिनाथ करपे, प्रविण देशमुख, प्रा. भीमराव साठे, सुभाष गडसिंग, सुधाकर गोंडाळ, अरविंद शिंदे, मेजर जाधव, बाळासाहेब घाटगे, रवी कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. दरम्यान न्यासाचे पुरोहित अप्पू पुजारी व सोमनाथ कुलकर्णी यांनी मंत्रांच्या जयघोषात विधीवत्त छत्रपतींच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित महिलांना राष्ट्रमाता जिजाऊंची प्रतिमा भेट देण्यात आली. याप्रसंगी शिवतेज सावंत, शिवतेज शिंदे, सदिच्छा ग्राम, सिद्धी पाटील, श्लोक फडतरे, सोनाली पाटील, तेजस डिसले, यांचे छत्रपती शिवरायांवर भाषणे संपन्न झाली. याप्रसंगी शिवजन्मोत्सव अध्यक्ष प्रसाद मोरे, उपाध्यक्ष अमित घाडगे, सचिव आकाश सूर्यवंशी, श्रीधर गुरव, खजिनदार शितलबापू फुटाणे-जाधव, कार्याध्यक्ष विशाल कलबुर्गी, राजू पवार, फहीम पिरजादे, संतोष भोसले, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, निखील पाटील, गोटू माने, सनी सोनटक्के, वैभव मोरे, योगेश पवार, प्रथमेश पवार, मंगेश सूर्यवंशी, राहुल मोरे, वैभव कामनुरकर, समर्थ घाडगे, मनोज निकम, चंद्रकांत सोनटक्के, राजाभाऊ नवले, नितीन शिंदे, सौरभ मोरे, रोहित खोबरे, अतिश पवार, आकाश शिंदे, प्रशांत कडबगावकर, प्रवीण देशमुख, प्रा. प्रकाश सुरवसे, प्रा. मनोज जगताप अतिश पवार उपस्थित होते. यावेळी कांत झिपरे, रणजीत गोंडाळ, सनी सोनटक्के, गणेश भोसले, शिवा मंगरुळे, पिंटू मचाले, लक्ष्मण विभूते, सागर गोंडाळ, अतिश पवार, चंद्रकांत कुंभार, संजय गोंडाळ, पिंटू साठे, ज्ञानेश्वर भोसले, संतोष माने, समर्थ घाडगे, सुराज्य घाडगे, युवराज सोनटक्के, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, शुभम चव्हाण, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते. दरम्यान अन्नछत्र मंडळाच्या परिसरात असलेल्या शिवस्मारक, शिवसृष्टी, श्री स्वामी समर्थ वाटिका, आश्रयदाते कक्षातील छत्रपतींच्या पुतळ्यांचे पूजन करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा.प्रकाश सुरवसे व प्रा. मनोज जगताप यांनी केले. कमलाराजे चौकातील शिवजन्मोत्सव मंडळाच्या वतीने शिवाजी महाराजांच्या प्राणप्रतिष्ठापना आधारस्तंभ अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

## विविध कार्यक्रमांनी कुर्डुवाडीत शिवजन्मोत्सव



**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. २० फेब्रुवारी-**

येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवस्मारक मंडळाच्यावतीने शिवजन्मोत्सवानिमित्त रात्री १२ वा पाळणा सोहळा आयोजित करण्यात आला होता. या पाळणा सोहळ्यासाठी महिला, पुरुष, मोठ्या संख्येने उपस्थित होते. येथील छत्रपती शिवरायांचा जुना सुबक पण लहान पुतळा असल्याने त्याठिकाणी १३ फुटी उंच पुतळा उभारणीचे नियोजन सुरू आहे. सकाळी १० वा. करमाळा माढाचे माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या हस्ते पूतळा परिसर सुशोभीकरणाच्या कामाचे शीला पूजन तर श्री सत्संग आश्रम महादेव टेकडी चिंचगाव येथील श्री शिवचरणानंद सरस्वती महाराज यांच्या हस्ते भूमीपूजन तसेच शहरातील सर्व जातीधर्मातील अकरा जोडप्यांच्या हस्ते भूमीपूजन करण्यात आले. त्यानंतर सर्व गडकिल्ल्यावरुन तसेच प्रयागराज येथून आणलेल्या निर्मल जलाने श्री.छत्रपतींच्या पुतळ्यास जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर चारी वेदांच्या वेद शास्त्रींनी अग्नीप्रज्वलीत करुन होमहवन पूजा करण्यात आली. यावेळी शिवसेना उबाठा गटाचे धनंजय डिकोळे, बाबासाहेब गवळी, गोविंदराव कुलकर्णी, डॉ. विलास मेहता, मधुकर भोसले, प्रा. डॉ. राजेंद्र दास, डॉ.दिनेश कदम, राजेंद्र पारखे, महादेव बागल, फुलचंद धोका, प्रकाश धोका, दत्ता गवळी, सुहास शहा,चेतन शहा,अनिल गवळी, अजित पवार, महादेव फासे, शरदचंद्र भोसले, डॉ.संतोष सुर्वे, अमोल कुलकर्णी, संतोष शेंडे,सुनील कदम, महेंद्र मेहता उपस्थित होते. तसेच बाबाराजे बागल यांनी शिवजयंतीनिमित्त टिळक चौक येथे शिवभोजनाचे आयोजन केले होते. श्रीकांत पाटील यांच्या मावळा गृपच्यावतीने गावदेवी मंदिरापासून महिलांच्या उपस्थितीत पालखी सोहळा काढण्यात आला.



## शिवजयंतीनिमित्त विठ्ठल प्रतिष्ठानतर्फे व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० फेब्रुवारी -**

आ. अभिजीत पाटील यांच्या संकल्पनेतून पंढरपूर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विठ्ठल प्रतिष्ठान आयोजित तीन दिवसीय शिवव्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले होते.

या व्याख्यानमालेमध्ये पहिल्या दिवशीचे व्याख्यान प्रा. गणेश शिंदे, दुसऱ्या दिवशी युवा व्याख्याते राहुल गिरी आणि तिसऱ्या दिवशी छत्रपती शिवरायांचा ज्वलंत इतिहास मांडणारे शाहीर डॉ. देवानंद माळी यांनी शाहीरीतून महाराजांचा जीवनपट मांडला. कार्यक्रमासाठी आ. अभिजीत पाटील, उद्योगपती सी.पी. बागल, भैरवनाथ शुगरचे अनिल सावंत,पंढरपूर गटशिक्षणाधिकारी मारुती लिंगाडे, मध्यवर्ती शिवजन्मोत्सव अध्यक्ष नागेश जाधव, नगराध्यक्ष सुभाष भोसले, संभाजी ब्रिगेडचे काशीद रावसाहेब, दिनकर चव्हाण, धाराशिव साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर पाटील, राष्ट्रवादीचे शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा संघटक सुधीर भोसले, नगरसेवक प्रशांत शिंदे, नगरसेवक धनंजय कोताळकर, नगरसेवक श्रीनिवास बोरगांवकर, नगरसेवक किरण घाडगे, अदित्य फत्तेपुरकर, नगरसेवक सतिश शिंदे, तालुकाध्यक्ष संदीप मांडवे, अमर सुर्यवंशी, समाजसेवक अरुण कोळी, अमित पवार, संतोष सर्वगोड उपस्थित होते.

## शेळके वस्ती जि.प.शाळेत शिवजयंती




**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२० फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराजांचा स्वराज्याचा जीवन प्रवास संघर्षमय होता. विद्यार्थ्यांनी शिवतंत्र आत्मसात करून आपले ध्येय साध्य करण्यासाठी यशाचे गड काबीज करावेत, असे विचार प्रा. बाळकृष्ण लावंड यांनी व्यक्त केले. दहिगाव शेळके वस्ती जि.प. शाळेत शिवजयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी सरपंच संजय गलांडे, वि. का. सोसा. चेअरमन हरिशचंद्र शेळके, शा.व्य. समिती अध्यक्ष ज्योतिराम पाडुळे, उपसरपंच नितीन नरुटे , बापू कोंडलकर, शा.व्य. समिती उपाध्यक्ष महादेव शेंडगे, रवी पाडुळे, पक्षीमित्र कल्याणराव साळुंके, गोपाळ तकीक-पाटील, मुख्याध्यापक दस्तगीर शेख उपक्रमशील शिक्षक विजयकुमार राऊत उपस्थित होते.

याप्रसंगी प्रा. लावंड यांना राजमुद्रा असलेली शिवप्रतिमा भेट देण्यात आली. विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने मिष्टान्न जेवण देण्यात आले.




## दिंडूर येथे शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २० फेब्रुवारी-**

दिंडुर तालुका दक्षिण सोलापूर येथे लाल बहादूर शास्त्री प्रशालेत शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे शालेय व्यवस्थापण समिती अध्यक्ष विठ्ठल हुच्चे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले प्रशालेचे मुख्याध्यापक बंडगर यांनीही आपले विचार व्यक्त केले तसेच काही विद्यार्थीकडून मनोगत सांगण्यात आले व गावातून जय भवानी, जय शिवाजी, भारत माता की जय या जयघोषात फेरी काढण्यात आली हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय शिक्षक घोडके, स्वामी, नारायणकर, शिवयोगी, बिराजदार, श्रीमती बिराजदार, मिरजे, पाकणीकर, हुल्ले, घोडके आदींनी परिश्रम घेतले.



## महामानव संस्थेकडून शिवाजी महाराजांची जयंती साजरी

**बार्शी, दि. २० फेब्रुवारी-**

तालुक्यातील गुळपोळी येथील महामानव बहुउद्देशीय सामाजिक संस्थेकडून छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रणजीत चौधरी तर कार्यक्रमाचे अध्यक्ष गुलाब शेख होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार रणजीत चौधरी, गुलाब शेख यांच्या हस्ते अरपण करण्यात आले. यावेळी विविध मान्यवरांचे सत्कार संस्थेच्यावतीने करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष भैरवनाथ चौधरी किरण खुरंगळे, गुलाब शेख, अमित काळे, विश्वनाथ बारवकर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे अध्यक्ष विविध मान्यवारांनी मनोगत व्यक्त केली. सूत्रसंचालन किरण खुरंगळे, आभार भैरवनाथ चौधरी यांनी मानले.



## करमाळ्यात शिवजयंतीनिमित्त अन्नदान

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि. १९ फेब्रुवारी-**

शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त राजश्री शाहू महाराज प्रतिष्ठान चालक मालक संघटना यांच्या वतीने विविध कार्यक्रम सादर करून शिवाजी महाराज पूर्णाकृती पुतळा सजावट करण्यात आली.

रांगोळी काढून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. सर्व जाती धर्माच्या उपस्थित मान्यवर राजकीय अराजकीय सर्व समावेशक मानून शिव व्याख्याते भीमराव लोंढे यांच्या छत्रपती शिवाजी महाराज शिव धर्मानुसार शिवाजी वंदना जिजाऊंची वंदना घेण्यात आली.

यानंतर ५०० लोकांना पोटभर शिव अन्नदान करून शिवाजी महाराजांना अभिवादन केले. यावेळी सर्व अध्यक्ष, पदाधिकारी, करमाळा तालुक्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेमी, शिवप्रेमी, करमाळा पोलीस अधिकारी राजश्री शाहू महाराज प्रतिष्ठान चालक मालक संघटनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री रामदेव, मारुती देवस्थानचा मंगळवारी लोकार्पण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २० फेब्रुवारी-**

माळशिरस येथील ग्रामदैवत श्री रामदेव व श्री मारुती देव देवस्थानच्या जिर्णोधाराचा लोकार्पण सोहळा मंगळवार दिनांक २५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता पद्मश्री गिरीशजी प्रभुणे अध्यक्ष भटक्या व विमुक्त जमाती परिषद यांच्या हस्ते व आ. रणजीतसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती रामदेव व मारुती देव देवस्थानच्या वतीने देण्यात आली. माळशिरस येथे श्री रामदेव व श्री मारुती देव देवस्थान हे पुरातन मंदिर असून ते शहराचे ग्रामदैवत आहे या मंदिराचा माळशिरसचे प्रसिद्ध बांधकाम व्यावसायीक अनिल फरांदे व परिवाराच्या वतीने नुकताच जिर्णोद्धार करण्यात आला आहे. अत्यंत सुबक व भव्य असे देखणे मंदिर उभारण्यात आले असून या मंदिराचा लोकार्पण सोहळा मंगळवारी होणार असून या कार्यक्रमास माळशिरस शहर व परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन रामदेव व श्री मारुती देव देवस्थानचे अध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी व सचिव रामभाऊ दोशी यासह विश्वस्त मंडळांनी केले आहे.

## छत्रपती शिवरायांचा वारसा जगासाठी प्रेरणादायी : मठपती

**अक्कलकोट, दि. २० फेब्रुवारी-**

छत्रपती शिवरायांचा वारसा जगासाठी प्रेरणादायी आहे. तो तरुण पिढीसमोर आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे. छत्रपतींचे कार्य, कर्तृत्व समजून घेण्यासाठी त्यांचे जीवनचरित्र अभ्यासले पाहिजे, असे मत सेवानिवृत्त शिक्षक शिवानंद मठपती यांनी व्यक्त केले. लोकमंगल विहार परिसरात श्री वटवृक्ष तरुण मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भगवा कट्टा ध्वजस्तंभासह श्री वटवृक्ष सार्वजनिक वाचनालयाच्या शुभारंभ प्रसंगी श्री. मठपती बोलत होते. अध्यक्षस्थानी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रमेश शिंदे होते. व्यासपीठावर वेदमूर्ती रुद्रय्या स्वामीजी, पौरोहित्य गुड्डय्या स्वामी, मनोज निकम, माजी क्रिडा शिक्षिका उषा हंचाटे विवेकानंद पतसंस्थेचे व्यवस्थापक चंद्रकांत दसले, बासलेगांवचे माजी सरपंच जगदीश बिराजदार, मंडळाचे अध्यक्ष बसवराज आगरखेड, कार्याध्यक्ष नागराज कुंभार उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्सवनिमित्त भगवा कट्टा या ध्वजस्तंभाचे पूजन, दिपप्रज्वलन व पुतळा पूजन श्री वेदमूर्ती रुद्रय्या स्वामीजी व लोखंडे मंगल कार्यालयाचे संचालक शिवाजीराव लोखंडे यांच्या हस्ते व पुरोहित गुड्डय्या स्वामी शास्त्री यांच्या विविध मंत्रोपचाराने करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावर गुड्डय्या स्वामी, उषा हंचाटे व प्रसाद फडतरे यांचेही व्याख्यान झाले. प्रास्ताविक कार्याध्यक्ष चंद्रकांत दसले यांनी केले. विरुपाक्ष कुंभार यांनी आभार मानले.

आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# माजी सैनिकाकडून शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० फेब्रुवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील माजी सैनिकाकडून मेजर श्रीकांत मोरे यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली.

मेजर श्रीकांत मोरे, मेजर रामचंद्र शिंदे, मेजर बापू सुरवसे, मेजर विजयकुमार काकडे, बसूराज पाटील, मेजर विठ्ठल फडतरे, ललीता पवार, जया शिंदे, कल्पना मोरे, श्रध्दा यादव आदींच्या हस्ते प्रतिमा पूजन श्रींची आरती करण्यात आली. मराठा स्फूर्ती गीत गर्जा महाराष्ट्र माझा गर्जा महाराष्ट्र माझा महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले. याप्रसंगी जया शिंदे, श्रद्धा यादव, कल्पना मोरे, ललिता पवार, गणेश सुरवसे, जेष्ठ पत्रकार स्वामीराव गायकवाड, पत्रकार राजेश जगताप, मोहन बंदिछोडे, दयानंद रोडगे, श्रीशैल जडगे, दत्ता कटारे, श्रीकांत मोरे उपस्थित होते. आभार श्रीकांत झिपरे यांनी मानले.



## संक्षिप्त वृत्त...



### महर्षी वाल्मिकी संघाकडून शिवजयंती दिनी राहुल सोलापूरकरचा निषेध

**पंढरपूर, दि. २० फेब्रुवारी-**

अभिनेता राहुल सोलापूरकर याने छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी आक्षेपार्ह विधान केल्याचे तीव्र पडसाद सबंध महाराष्ट्रात उमटलेले असतानाच आज पंढरपुरात महर्षी वाल्मिकी संघाच्या कार्यकर्त्यांनी शिवजयंतीचे औचित्य साधून छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे पुजन केले आणि छत्रपती शिवरायांच्या समोरंच राहुल सोलापुरकरचा प्रतिकात्मक पुतळा उलटा टांगून त्याला जोडे मारत घोषणाबाजी केली. राहुल सोलापूरकर असो वा अन्य कुणी जर आमचे दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी अवमानकारक, आक्षेपार्ह विधान केले तर त्याचा निषेध अशाच पध्दतीने केला जाईल. यापुढे जर राहुल सोलापूरकर याने आपल्या जीभेवर नियंत्रण ठेवले नाही तर त्याला प्रत्यक्षातच असे उलटे लटकावून जोडे मारू. अशी प्रतिक्रिया यावेळी गणेश अंकुशराव यांनी व्यक्त केली आहे. यावेळी महर्षी वाल्मिकी संघाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

### राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या तालुका उपाध्यक्षपदी अमित सरवदे

**करकंब, दि. २० फेब्रुवारी-**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात व राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष समाधान काळे, जिल्हा नेते कल्याणराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस पक्षाच्या पंढरपूर तालुका कार्यकारणीच्या बैठकीमध्ये बाभूळगाव (ता. पंढरपूर) येथील युवा सहकारी अमित सरवदे यांची पंढरपूर तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांना राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस महेश बोचरे, तालुकाध्यक्ष साहिल शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्तीपत्र देण्यात आले.





### माळीनगर येथे ॲग्रीस्टॅक शिबीर

**माळीनगर, दि. २० फेब्रुवारी-**

अकलूज प्रांताधिकारी श्रीमती विजया पांगारकर, माळशिरस तहसिलदार सुरेश शेजूळ यांच्या सूचनेनुसार ग्राम महसूल अधिकारी कार्यालय येथे शिवजयंती निमित्त ॲग्रीस्टॅक शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात पंचक्रोशीतील १०० हून अधिक शेतकऱ्यांनी आपली नोंदणी पूर्ण केली. ॲग्रीस्टॅक योजनेद्वारे शेतकऱ्यांच्या सातबाराला त्यांचे आधार कार्ड व मोबाईल क्रमांक जोडला जाणार आहे.शेतकऱ्यांना कृषि विषयक सर्व प्रकारचे शासकीय अनुदान व शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी ग्रीस्टॅक योजनेअंतर्गत फॉर्मर आयडी काढणे आवश्यक असल्याने अद्याप ज्या शेतकऱ्यांनी आपली नोंदणी केली नसेल त्यांनी नजीकच्या आपले सरकार केंद्रामध्ये जाऊन नोंदणी करण्याचे आवाहन ग्राम महसूल अधिकारी नेहाल जाधव यांनी केले. यावेळी शेतकरी वसंतराव खराडे, विराज निंबाळकर, राहुल कुदळे, देविदास बोरावके, सचिन शिंदे, हनुमंत मोरे, घुळदेव चोरमले, अतिष खराडे, महेश खराडे, बालिश शेख, महसूल सेवक बाळू हंकारे, अविनाश चक्रे उपस्थित होते.



### सुळेवाडी पाझर तलाव दुरुस्तीसाठी निधी मंजूर

**पिलीव, दि.२० फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील पाझर तलाव नंबर एकच्या जकवेल दुरुस्ती साठी आमदार उत्तमराव जानकर यांच्या फंडातुन दहा लाख रुपये मंजूर तर गुंडखोरी तलावाचे काम ताबडतोब पुर्ण करणयाचे आदेश व सुळेवाडी येथे पिण्याच्या पाण्यासाठी ताबडतोब टँकर सुरू करावेत असे आदेश आ. उत्तमराव जानकर यांनी तहसीलदार यांना दिले आहेत. सध्या सुळेवाडी गावात ग्रामपंचायतीची मूदत संपली असुन याठिकाणी प्रशासक आहे. आ. जानकर यांची या कामानिमीत्त बाबुराव सुळे, भानुदास सुळे,बाजीराव सुळे यांनी आमदार उत्तमराव जानकर यांच्याकडे याबाबत मागणी केली आहे.

# टेंभू, म्हैसाळ योजनेतून तालुक्यातील सर्व बंधारे भरणार



## चेतनसिंह केदार सावंत यांची माहिती

## शेतकऱ्यांना दिलासा

> रब्बी हंगामासाठी टेंभू, म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू करावे, अशी मागणी मी ना.राधाकृष्ण विखे पाटील, ना.जयकुमार गोरे आणि माजी खा.रणजीतसिंह निंबाळकर यांच्याकडे केली होती. या मागणीला यश आले असून येत्या आठवड्यात टेंभू, म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू होणार असून बुद्धेहाळ तलावासह माण व कोरडा नदीवरील सर्व बंधारे भरून देण्यात येणार आहेत.
>
> **- चेतनसिंह केदार सावंत, जिल्हाध्यक्ष, भाजपा**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २० फेब्रुवारी-**

सध्या सांगोला तालुक्यात विहिरी व कूपनलिकांची पाणी पातळी खालावली आहे. नदी, तलाव, बंधारे ओढे, नाले कोरडे पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शेतकरी चांगलेच धास्तावले आहेत. पाणी प्रश्न मार्गी लावण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली जात आहे. काही ठिकाणी पाण्याअभावी पिके वाळून जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेच्या शुभारंभाच्या उद्घाटनासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माजी खा. रणजीतसिंह निंबाळकर हे चिकमहूद येथे आले होते. त्यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी तालुक्यातील पिकांना जीवदान देण्यासाठी टेंभू, म्हैसाळ योजनेचे आवर्तन सुरू करून माण व कोरडा नदीवरील सर्व बंधारे भरून देण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी तत्काळ पाणी सोडण्याच्या सूचना जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना तसेच टेंभू योजनेचे कार्यकारी अभियंता राजन रेडियार व टेंभू योजनेचे कार्यकारी अभियंता सचिन पवार यांना दिल्या. त्यानुसार दि.२५ फेब्रुवारीपासून टेंभूचे योजनेचे आवर्तन सुरू होणार असल्याची माहिती चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.



# आकाश ढवळे, प्रियंका पाटील यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि.२० फेब्रुवारी-**

श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ संचलित, लक्ष्मी आनंद विद्या मंदिर व जु. कॉलेज टेंभुर्णी येथे 'अधिकारी आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी आणि त्यांचेही अधिकारी होण्याचे स्वप्न अधिकाधिक सोपस्कर व्हावे या हेतूने संस्थेने हा नवीन कृतीशील उपक्रम आयोजित केला आहे. हा सन्मान सोहळा संपन्न झाला. यावेळी प्रतिमा पूजनाने सदर कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध क्षेत्रातील स्पर्धा परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमधून शिक्षण घेत या दोन्ही गुणवंतांनी यश मिळविले. यातूनच अन्नसुरक्षा अधिकारी वर्ग दोन या पदासाठी प्रियंका प्रताप पाटील यांची नियुक्ती झाली आहे. तसेच सोलापूर जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागामध्ये आकाश मदन ढवळे यांची नियुक्ती झाली. त्याबद्दल हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे, सचिवा सुरजा बोबडे, प्रशालेचे प्राचार्य विकास करळे, आकाश ढवळे, प्रियंका पाटील, अमृत पाटील, संजय काका पाटील, अमित पाटील, बालाजी ढवळे, अरुण ढवळे उपस्थित होते.

# संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० फेब्रुवारी-**

श्री संत सेवालाल महाराज की जय चा जयघोष करत तांड्यासह दुधनी शहरांच्या प्रमुख मार्गावरून रॅली काढण्यात आला.तांड्यातील प्रत्येक घरातील व्यक्तीनी फुलांची हार व नारळ वाढवून श्री संत सेवालाल महाराज यांची २८६ वा जयंती उत्सव मोठ्या भक्तीमय वातावरणात जल्लोषात साजरा केला.

> गांधीनगर तांडा (सोळसे) सकाळी दहा वा.पुजारी हिरु पवार यांनी मूर्तीस पुष्पहार अर्पण करून भोग लावले व भजन कार्यक्रम पार पाडले. संध्याकाळी सेवालाल मंदीर ते हनुमान मंदीरापर्यंत श्री ची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

प्रथम सकाळी संत श्री सेवालाल महाराज यांच्या मूर्तीस अभिषेक करून व भोग लाऊन पुजा जेष्ठ शंकर राठोड , नायक हरीचंद्र राठोड , कारभारी लालू पवार, पुजारी भिल्लु चव्हाण , मोरया कंस्ट्रक्शनचे अशोक राठोड, अध्यक्ष सुनिल चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम साजरा करण्यात आला. संध्याकाळी पाच च्या सुमारास सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत मोरया कंस्ट्रक्शनचे अध्यक्ष अशोक राठोड यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या मुर्तीस आरती करून श्री सेवालाल महाराज की जय चा जयघोष करत मिरवणूकीस प्रारंभ करण्यात आले. सदर मिरवणूक तांड्यातील प्रत्येक मार्गावरून काढण्यात आली. तांड्यातील प्रत्येक घरातील व्यक्तीनी फुलांची हार व नारळ वाढवून दर्शन घेतले. यावेळी अध्यक्ष्य सिताराम राठोड, उपाध्यक्ष सुनिल चव्हाण, सचिव दत्तू राठोड, खजिनदार सुरेश राठोड, कार्याध्यक्ष विकास जाधव, नायक धेनू राठोड, कारभारी धेनू जाधव, मन्नू राठोड, लक्षमण राठोड, जगन्नाथ जाधव, बाबु राठोड, शेऊ राठोड, बाबु जाधव, नारायण पवार, संजय राठोड, विनोद चव्हाण, महादेव जाधव आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष डॉ. सुनिल चव्हाण, उपाध्यक्ष आकाश पवार, सचिव आकाश राठोड, खजिनदार अप्पाराव राठोड, कार्याध्यक्ष प्रदिप राठोड, मिरवणूक प्रमुख गुरुनाथ शंकर राठोड, लक्ष्मण राठोड, सोमनाथ पवार, तिप्पू जाधव, गुरुनाथ राठोड, सुरेश राठोड सोनू चव्हाण, महादेव राठोड, राजू पवार, पोलीस सुनिल राठोड, दिलीप राठोड, सागर पवार, शिक्षक पोमू राठोड, अंबादास राठोड आदींनी परीश्रम घेतले.



# बागलवस्ती शाळेस वॉटर डिस्पेन्सर, स्पिकर भेट

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.२० फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती माढा तालुक्यातील बागलवस्ती-बारलोणी जिल्हा परिषद शाळेत साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित ग्रामस्थांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ मॉंसाहेब व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी यावेळी सामुहिक जिजाऊ वंदना गायली.

बागलवस्तीवरील ग्रामस्थांच्या वतीने शाळेला वॉटर डिस्पेन्सर व वायरलेस ब्लुटुथ स्पिकर असे २० हजारांचे साहित्य शिवजयंतीनिमित्त भेट देण्यात आली. वॉटर डिस्पेन्सरमुळे विद्यार्थ्यांना स्वच्छ थंड, गरम पाणी पिण्यास मिळणार आहे. यावेळी अनिल बागल, प्रभाकर बागल,लक्ष्मण बागल, सर्जेराव भोसले, आदेश बागल, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रभाकर बागल, संतोष बागल, शशिकांत गोरे, शिवराज बागल, प्रशांत बागल, नितीन बागल, ओंकार बागल, प्रतीक बागल, अजय बागल, अविनाश बागल, आनंद बागल, माऊली लोंढे, मुख्याध्यापक निलेश देशमुख, सुनीता बागल, उमा बागल उपस्थित होते.



## बानगुडे-पाटील यांचे आज व्याख्यान

**मोडनिंब, दि. २० फेब्रुवारी-**

मोडनिंब (ता.माढा) येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आमदार अभिजित पाटील यांच्या संकल्पनेतून इतिहास अभ्यासक नितीन बानगुडे पाटील यांच्या शिव व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शुक्रवार (दि.२१) रोजी सायंकाळी ६ वाजता ग्रामपंचायत कार्यालय मोडनिंब समोर सदर कार्यक्रम पार पडणार आहे. आ. अभिजित पाटील मित्र परिवारच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

# पिलीव येथे ४२४ विद्यार्थी देणार दहावीची परीक्षा

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि.२० फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयातील केंद्रावर दि.२१ फेब्रुवारीपासून दहावीची बोर्डाची परीक्षा सुरु होत आहे. याची केंद्रावर जय्यत तयारी झाली आहे.

या केंद्रावर कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, जवाहरलाल शेतकी विद्यालय, श्रीनाथ विदयालय तरंगफळ, संग्रामसिंह मोहिते-पाटील शिंगोर्णी या विद्यालयातील ४२४ विद्यार्थी परीक्षा देणार असल्याचे केंद्र संचालक शिवाजी कापसे यांनी सांगितले. परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्त, आरोग्य कर्मचारी पथक, लाईटची व्यवस्था तसेच इतर सर्व सोयीसुविधा पुरवणयात येणार आहेत. याठिकाणी ४२४ विद्यार्थ्यांची १७ ब्लॉक मध्ये बैठक व्यवस्था करणयात आली आहे. यापैकी ७ ब्लॉक पेट्रोल पंपावरील विदयालयातील तर उर्वरीत दहा ब्लॉक बसस्थानकावरील विदयालयात केली आहे. यावेळी उपकेंद्र संचालक एस.एस.कदम, डी.डी. माळी उपस्थित होते.



# माळशिरस तालुक्यात ६ हजार ३६ घरकुलांना मंजुरी

## ४ हजार १५६ लाभार्थ्यांना पहिला हप्ता जमा

## गटविकास अधिकारी आबासाहेब पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २० फेब्रुवारी-**

तालुक्यात २०२४-२०२५ साठी ६ हजार ३६ घरकुलाना मंजुरी मिळाली असून कागदपत्राची पूर्तता केलेल्या ४ हजार १५६ लाभार्थ्याच्या नावावर दोन दिवसात १५ हजार रुपयांचा पहिला हप्ता जमा करण्यात येणार असल्याची माहिती माळशिरस पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आबासाहेब पवार यांनी दिली.

जांबूड ४५, आनंदनगर ४७, बाभूळगाव ४४, बचेरी ५५, बागेचीवाडी ५२, बांगार्डे ५०, भांब ६४, भांबूर्डी ९५, बिजवडी २७,बोंडले ५३,बोरगाव २१२, चाकोरे ६१, चांदापुरी २९, सदाशिवनगर ४२, चौंडेश्वरवाडी ४३, दहीगाव ३६, दसूर ५४, देशमुखवस्ती ३, धानोरे ५८,धर्मपुरी ९८, डोंबाळवाडी (कु) ५१, डोंबाळवाडी (खु)२७, एकशिव ८७, फडतरी ४९, फलवणी ७३, फोंडशिरस ११६, गणेशवाडी ४९, गारवाड ५७, गिरवी ५७, गिरझनी ८८,गोरडवाडी ४९, गुरसाळे ६२, हनुमानवाडी ९, इस्लामपूर ५६, जाधववस्ती २८,जळभावी ५२, कचरेवाडी ५४,कदमवाडी ५९,कळंबोली ५४, काळमवाडी ५५, कण्हेर ७१, कारुंडे १०२,खळवे ५६, खंडाळी ६८, खुडूस ६६, कोळेगाव ८८, कोंडबावी ६४,कोंडारपट्टा २१, कोथळे ५१, कुरबावी ११०, कुसमोड ५०,लवंग ५४, लोणंद २९, लोंढे मोहितेवाडी ५२, मारकडवाडी ५१, माळखांबी १४५, माळेंवाडी (बो) २५, माळीनगर ५४,मळोली ६०, मांडकी ४८, मांडवे ७४, मेडद ६४, मिरे ५७, मोरोची ५६, मोटेवाडी ६४, नेवरे ५०,निमगाव ८७, पळसमंडळ ४६,पानीव ५७,पठाणवस्ती ४६, पिलीव ८१, पिंपरी ४७,पिरळे ४७, पिसेवाडी ५२, पुरुंदावडे ११९, रेडे ७९, संगम ६३, संग्रामनगर ९, सवतगव्हाण ५५, शेंडेचिंच ४७, शिंदेवाडी २०, शिंगोर्णी ४८, सुळेवाडी ४५,तांबवे ५५,तांबेवाडी ५८, तामशीदवाडी ६३, तांदुळवाडी ५४, तरंगफळ ८०, तिरवंडी ६६, तोंडले ५८, उघडेवाडी ७३, उंबरे (वे)६८, उंबरे (द) ६०, वेळापूर १४३, विजयवाडी १४, विठ्ठलवाडी ३२, वाफेगाव ५२, वाघोली १३३ येळीव १२३, यशवंतनगर १०, झंजेवाडी २२, झिंजेवस्ती ४५ अशी ६ हजार ३६ घरकुलांना मंजुर झाली आहेत.



> ज्या लाभार्थ्यांनी कागदपत्रांची पूर्तता केली आहे अश्या ४ हजार १५६ लाभार्थ्याच्या नावावर दोन दिवसात १५ हजार रुपयांचा पहिला हप्ता जमा करण्यात येणार आहे.उर्वरित लाभार्थ्यांनी कागदपत्रांची पूर्तता लवकरात लवकर करावी.
>
> **- आबासाहेब पवार, गटविकास अधिकारी पंचायत समिती माळशिरस**



> शासनाची ही योजना चांगली असून आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांना लोकांना स्वतःच हक्काच घर मिळू लागले आहे. त्याच घराच स्वप्न पूर्ण होत आहे परंतु घरकुलासाठी शासनाकडून १ लाख २० हजाराचे अनुदान दिले जात आहे ते अपुरे आहे. सदरचे अनुदान सन २०१६-१७ प्रमाणे आहे. तेव्हापासून या दहावर्षात सर्वच वस्तूंचे दर प्रचंड प्रमाणात वाढले आहेत. तसेच मजुरी मध्येही वाढ झाली आहे. त्यामुळे मिळालेल्या अनुदानात घरकुल पूर्ण करणे अशक्य होते. यासाठी शासनाने अनुदानात बदल करून अनुदान वाढवून देणे आवश्यक आहे. शहरी भागात नगर पंचायत लाभार्थ्यांना अडीच लाख अनुदान दिले जाते त्याप्रमाणे वाढ व्हावी.
>
> **- संतोष देवकर, घरकुल लाभार्थी रेडे ता. माळशिरस**

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिवजयंतीनिमित्त रामवरदायणी शाळेस सिलिंग फॅन भेट

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० फेब्रुवारी -**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या औचित्य साधून येथील राम वरदायणी शाळेत शाळेची माजी विद्यार्थी विजय भोसले यांनी सामाजिक बांधीलकी म्हणून विद्यार्थ्यांना उन्हाळ्यात उखड्याचा त्रास होऊ नये सेलिंग फॅन शाळेस भेट दिले.



यावेळी बोलताना विजय भोसले यांनी सांगितले की, ज्या शाळेने मला घडवले, सामाजिक ज्ञान दिले त्या रामवरदायणी शाळेचे उपकार कुठल्याही मदतीने फिटणार नाहीत. ज्या शाळेने आपल्याला घडवली त्या शाळेला प्रत्येक विद्यार्थ्यांनी शाळेचे ऋण फेडण्यासाठी आणि शाळेला बळकट बनवण्यासाठी शक्य होईल तेवढी मदत केली पाहिजे.

यावेळी श्रीमती शिवणे ए.बी., काजळे के.एम., पोद्दार पी.एम., हनमंते जे.डी., मुळे बी.पी., दंतकाळे एस.डी. यांच्यासह सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### वंचित बहुजनच्या वतीने शिवजयंती साजरी

**तुळजापूर, दि.२० फेब्रुवारी -**

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले यावेळी वंचित बहुजन आघाडीचे नेते मिलिंद रोकडे, जिवन कदम, सुधीर मस्के, रवी साखरे, प्रा. शिवाजी जेटीथोर, नागेश कदम, अशोक चव्हाण, कुमार चौधरी, धनंजय जानराव यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



### आलियाबादमध्ये शिवाजी महाराजांना अभिवादन

**जळकोट, दि.२० फेब्रुवारी -**

येथून जवळच असलेल्या आलियाबाद येथील ग्रामपंचायत कार्यालयात रयतेचे राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रकाश चव्हाण, माणिकराव चव्हाण, सरपंच सुर्यकांत चव्हाण, उपसरपंच अमृता चव्हाण, ग्रा.पं. सदस्य सुर्यकांत राठोड, माणिक राठोड, यशवंत राठोड, सिद्राम पवार, नेमिनाथ चव्हाण, विनायक चव्हाण, शिवाजी चव्हाण, हरीदास राठोड, बाबु राठोड, अरुण चव्हाण, मोतीराम राठोड, रेवाप्पा राठोड, विनोद चव्हाण, रतन चव्हाण, राम पवार, तानाजी राठोड, मनोज पवार आदि उपस्थित होते.



### जनहित संघटनेच्या वतीने पदफेरी

**तुळजापूर, दि.२० फेब्रुवारी -**

येथील जनहित संघटनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती जनहित मुख्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवरायांच्या मूर्तीची स्थापना पूजन करून महाआरती करण्यात आली. यावेळी मान्यवरांचे सत्कार समारंभ करून छत्रपती शिवाजी महाराज की जय, भवानी जय शिवराय जय जिजाऊ जय शिवरायचा जयघोष करत पद फेरी काढून छत्रपती शिवाजी महाराज चौकात जाऊन छत्रपती शिवरायांच्या अश्वरुढ पुतळ्यांस पुष्पहार अर्पण करून जनहित संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी उत्साहात जयंती साजरी केली. यावेळी जनहित संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



### जळकोटवाडीत शिवाजी महाराज जयंती साजरी

**जळकोट, दि.२० फेब्रुवारी -**

येथून जवळच असलेल्या जि.प.प्रा. शाळा जळकोटवाडी (नळ) येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शिवाजी महाराज यांचे महान कार्य आणि शिवरायांचे विचार याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक उमेश भोसले यांनी आपले विचार मांडले. शाळेचे सहशिक्षक अशोक राठोड यांनी छत्रपती शिवराय यांच्या चरित्राबद्दल सविस्तर माहिती सांगितली. जयंतीनिमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा धारण केली होती. विद्यार्थ्यांनी ही आपली मनोगते व्यक्त केली. विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित चित्रपट दाखविण्यात आला. शिवजयंतीच्या निमित्ताने शाळेमध्ये रांगोळी, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.




### 'नवोदय'त शिवाजी महाराजांची जयंती साजरी

**तुळजापूर, दि.२० फेब्रुवारी -**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात आदर्श राजा, श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यालयाचे प्राचार्य के.वाय. इंगळे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावरती एस.डी. खोब्रागडे, सी.एस. गोमारे, एच.जी. जाधव, डी. एस. देशमुख यांची प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमास विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक वृंद उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरी जाधव यांनी केले.

# लाडक्या बहिणी व भावांनी महायुतीचे २३७ आमदार निवडुन देऊन महाराष्ट्रात इतिहास घडविला : पालकमंत्री सरनाईक

**नळदुर्ग येथील ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालय, आरोग्य संस्थांचा पालकमंत्री प्रतास सरनाईक यांच्या हस्ते उद्घाटन..**




**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० फेब्रुवारी -**

आमच्या लाडक्या बहिणी व भावांनी महायुतीचे २३७ आमदार निवडुन देऊन महाराष्ट्रात इतिहास घडविला आहे, असे राज्याचे परिवहन मंत्री व धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी नळदुर्ग येथे ५० खाटाच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या लोकार्पण सोहळा कार्यक्रमात बोलतांना म्हटले.

नळदुर्ग येथे दि.२० फेब्रुवारी रोजी नळदुर्ग येथील ५० खाटाचे उपजिल्हा रुग्णालय व इतर आरोग्य संस्थांचा लोकार्पण व भुमिपुजन सोहळा कार्यक्रम पार पडला. धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर हे ऑनलाईन उपस्थित होते. त्याचबरोबर उमरग्याचे आमदार प्रकाश स्वामी, माजी खासदार प्रा. रवींद्र गायकवाड, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, भाजपचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, सुधीर पाटील, भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य नितीन काळे, शिवसेनेचे अनिल खोचरे, नितीन लांडगे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मोहन पनुरे, उपजिल्हा प्रमुख ज्ञानेश्वर घोडके, नळदुर्गचे माजी नगराध्यक्ष शहेबाज काझी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष शफीभाई शेख, भाजपचे सुशांत भुमकर, जि.प.चे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, युवा सेनेचे निखिल घोडके आदिजण प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. प्रारंभी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते रुग्णालयाच्या कोनशीलेचे अनावरण करण्यात आले. यानंतर रुग्णालयात प्रसुती झालेल्या महिलांना पालकमंत्र्यांच्या हस्ते आरोग्य किटचे वाटप करण्यात आले.यानंतर नळदुर्ग उपजिल्हा रुग्णालयाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले तर आरोग्य विभागांतर्गत धाराशिव जिल्ह्यातील सहा तालुक्यातील एकुन ११ मंजुर व काम पुर्ण झालेल्या संस्थांच्या इमारतीचे लोकार्पण व भुमीपुजन पालकमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाईन करण्यात आले.

यावेळी बोलतांना पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटले की हे महायुतीचे सरकार असुन हे सरकार लोकल्याणकारी कामात कुठेही मागे राहणार नाही. नळदुर्गकरांनी जागा उपलब्ध करून दिल्यास तात्काळ नळदुर्ग येथे बसडेपो निधीसह मंजुर करतो. त्याचबरोबर नळदुर्गकरांची मागणी लक्षात घेऊन नळदुर्ग शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभा राहावा यासाठी मी प्रयत्न करणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म महाराष्ट्रात झाला हे आपले भाग्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात निर्माण व्हायला पाहिजे या मताचा मी आहे. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य महान व लोकल्याणकारी असुन त्यांचे कार्य महाराष्ट्रापुरते मर्यादीत नसुन संपुर्ण देशभरात त्यांचे कार्य आहे त्यांचे नाव देण्याची मागणी याठिकाणी करण्यात आली असुन तोही प्रश्न मार्गी लावणार असल्याचे त्यांनी सांगितले. नळदुर्गचे उपजिल्हा रुग्णालय हे आता ७० खाटाचे होणार असुन हे रुग्णालया सर्व सोईनियुक्त असे असणार आहे. या रुग्णालयात आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत ५ लाख रुपयापर्यंतचे उपचार मोफत होणार आहेत.तुळजापुर येथे सुसज्य असे ३०० बेडचे अत्याधुनिक रुग्णालय उभारण्यात येणार असुन या रुग्णालयात महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत रुग्णांवर मोफत उपचार करण्यात येणार आहेत. नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्लयासंदर्भात लवकरच मोठा निर्णय घेण्यात येणार असुन किल्लयाचा भव्य परिसर पाहता याठिकाणी पर्यटकांसाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचा मी प्रयत्न करणार आहे. त्याचबरोबर धाराशिव जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणुन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमचे नेते व राज्याचे उपमुखमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्याने जिल्ह्यात जास्तीतजास्त सुविधा देण्याचा मी प्रयत्न करणार असल्याचेही पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा शल्यचिकित्स्क डॉ. धनंजय चाकुरकर यांनी केले तर आभार जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरीदास यांनी मानले.

या कार्यक्रमास आरोग्य सेवा परिमंडळ लातुरच्या उपसंचालिका डॉ. अर्चना भोसले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता डॉ. शेषेराव चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात आदिजण उपस्थित होते. या कार्यक्रमास नळदुर्ग शहरासह ग्रामिण भागातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

▶▶ ज्यांनी नळदुर्ग येथील उपजिल्हा रुग्णालय उभारण्यासाठी शासनदरबारी प्रयत्न केले. प्रसंगी शासनाशी झगडले व ज्यांच्या प्रयत्नामुळे हे उपजिल्हा रुग्णालय उभे राहिले ते राज्याचे माजी मंत्री व जेष्ठ नेते मधुकरराव चव्हाण यांना या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले नाही की साधे त्यांचे कार्यक्रम पत्रिकेत नाव छापले नाही याबद्दल उपस्थितांमधुन तीव्र संताप व्यक्त केला जात होता.

▶▶ नळदुर्ग शहरात इतका मोठा कार्यक्रम होत असतांना नळदुर्ग शहरातील एकाही प्रतिष्ठित व्यक्तीला किंवा राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना या कार्यक्रमाची माहिती देण्यात आली नाही किंवा त्यांना पत्रिकाही देण्यात आली नाही. याबद्दल जिल्हा आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांबद्दल नळदुर्गकरांनी तीव्र संताप व्यक्त करण्याबरोबरच या अधिकाऱ्यांचा जाहीर निषेध केला आहे.

## सिना कोळेगाव प्रकल्पातून भोत्रा बंधाऱ्यात पाणी दाखल : खा. ओम राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यातील रब्बी हंगामाकरीता पाण्याची गरज असून पाण्या आभावी शेतकऱ्यांची पिके सुकत आहेत. तसेच परांडा तालुक्यातील भोत्रा, रोसा व परंडा शहरासाठी पाणी पुरवठा भोत्रा येथील बंधाऱ्यातून होत असून सिना कोळेगाव प्रकल्पांतून पाणी सोडणेबाबत शिवसेना उबाठा जिल्हाप्रमुख रणजित ज्ञानेश्वर पाटील यांनी शेतकऱ्यांची व नागरीकांची मागणी अनुषंगाने खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी जिल्हाचे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्याकडे कालवा सल्लागार समितीची बैठक आयोजित करुन सिना कोळेगाव प्रकल्पातील भोत्रा बंधाऱ्यात पाणी सोडणेबाबत पत्राव्दारे विनंती करण्यात आली होती.



दि.१० फेब्रुवारी रोजी दुरदृष्य प्रणालीव्दारे पालकमंत्री यांनी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीचे आयोजन केले होते. रणजित पाटील व खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या पाठपुराव्यास यश आले असून सिना कोळेगाव प्रकल्पातील रब्बी हंगामाकरीता पाणी भोत्रा बंधाऱ्यात सोडण्यात आले आहे. यामुळे परीसरातील रब्बी हंगामातील व बागायती पिकांना जिवदान मिळाले असून यामुळे शेतकऱ्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जनावरांच्या व परीसरातील ग्राम पंचायतीस पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला असून परीसरातील नागरीकांकडून याबाबत समाधान व्यक्त करण्यात आले आहे.

## तेरखेडा गावात गूढ आवाज; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२० फेब्रुवारी -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा गावात दि.२० फेब्रुवारी रोजी अचानक गूढ आवाज आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घरावरील पत्रे आणि दुकानाच्या काचा थरथरले असल्याचे जाणून आले. हा आवाज नेमका कशाचा आहे? यामुळे तेरखेडा परिसरातील नागरिकांमध्ये चर्चा होती. गावातील नागरिक एकमेकांना फोन करून तिकडे कशाचा आवाज आला, हिकडे कशाचा आवाज आला अशी फोनवर जोरदार चर्चा सुरू झाली. गेले अनेक दिवसांपासून वारंवार तेरखेडा भागत असे गूढ आवाज ऐकू येत आहेत. मागील सहा महिन्यांपूर्वी देखील असाच काहीसा गूढ आवाज आला होता.

मात्र, हे आवाज नेमके कशामुळे येत आहेत त्याचे रहस्य आणखी उलगडले नाहीत. प्रशासनाकडून याचा कसलाच खुलासा होत नसल्याने प्रशासन याबाबत मौन बाळगून आहे.

## आरंभ प्रतिष्ठानच्यावतीने शिवजन्मोत्सव सोहळा विविध उपक्रमांनी साजरा



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२० फेब्रुवारी -**

शहरातील आरंभ प्रतिष्ठान तर्फे सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दि.१८ रोजी रात्री ९ वाजता छत्रपती शिवरायांचा पोवड्याचा कार्यक्रम महिला शिवशाहीर अनिताताई खरात (ऐवळे) आणि टीम यांच्याकडून सादर करण्यात आला. रात्री १२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांचा पाळणा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी धाराशिव लोकसभेचे माजी खा. रवींद्र गायकवाड, डी.के. माने, प्रा. सचिन शिंदे तसेच झांशी ग्रुपच्या उषा गायकवाड, सुलक्षणा शिंदे, डॉ. प्रतिभा सातपुते, डॉ. ज्योती सातपुते, जिजाऊ ब्रिगेडच्या संध्या शिंदे, साखरे आदी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. दि.१९ रोजी सकाळी जितेंद्र शिंदे, युवा नेते किरण गायकवाड, सचिन जाधव, रामकृष्ण बिराजदार, योगेश तपसाळे, शंतनु सगर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दुपारी १२ वाजता प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी ४ वाजता प्रतिष्ठानच्या वतीने शासकीय विश्रामगृह परिसरात वृक्षलागवड करण्यात आली. सायंकाळी ७ वा. प्रतिष्ठानच्या वतीने ५१ गरजू लोकांना रेशनकिटचे वाटप करण्यात आले.

## धाराशिव जिल्ह्याच्या खरीप २०२२ संदर्भातील नुकसान भरपाई; राज्य शासनाला जबाबदारी उचलावी लागणार

### सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्ह्याच्या खरीप २०२२ संदर्भात लागू झालेल्या ८०-११० सूत्रामुळे आता शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी राज्य शासनाला जबाबदारी उचलावी लागणार आहे. या संदर्भात १७ फेब्रुवारी रोजी मंत्रालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीत नुकसान भरपाई आणि पंचनाम्याच्या प्रती संबंधित मुद्दा चर्चिला गेला. सुरुवातीला पंचनाम्याच्या प्रती आणि नुकसान भरपाई कंपनीला देण्याचे आदेश होते, मात्र भारतीय कृषी विमा कंपनीने सांगितले की नुकसान भरपाई ११० टक्क्यांच्या पुढे जात असल्याने ती रक्कम राज्य शासनाने द्यावी लागेल. या मुद्द्याचे निराकरण करतांना प्रधान कृषी सचिव विकास रस्तोगी यांनी पंचनाम्याच्या प्रती आणि नुकसान भरपाईची आकडेमोड करून तातडीने विमा कंपनीला कृषी विभागाला प्रस्ताव देण्याचे आदेश दिले, जेणेकरून राज्य शासनाकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देता येईल.



▶▶ उमरग्याचे आ. प्रवीण स्वामी यांची मंत्रालयातील पहिलीच बैठक होती. त्यांनी शेतकऱ्यांसाठी मुद्देसुद मांडणी केली, आणि रक्कम देण्यास तसेच पंचनाम्याच्या प्रती द्याव्या अशी मागणी केली. पहिल्या बैठकीतच शेतकऱ्यांच्या बाजूने निर्णय झाल्याने ते सकारात्मक दिसले.

८०-११० सूत्रानुसार, पिक विमा कंपनीला देय असलेल्या रकमेपेक्षा नुकसान भरपाईची रक्कम ११० टक्यांपेक्षा जास्त झाल्यास ती देण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे.

उदाहरणार्थ, पिक विमा कंपनीला एखाद्या जिल्ह्याची विमा हप्त्यापोटी १०० कोटी रुपये देय असलेल्या परिस्थितीत, जर नुकसान भरपाई ११५ कोटी रुपये असेल तर विमा कंपनी ११० कोटी रुपये देईल आणि उर्वरित ५ कोटी रुपये राज्य शासनाने देणे आवश्यक आहे. धाराशिव जिल्ह्याच्या संदर्भात, पिक विमा कंपनीला ५०६ कोटी ५ लाख ८६ हजार रुपये देय होते, मात्र नुकसानीच्या रकमेची व्याप्ती ६३४ कोटी ८५ लाख ८८ हजार रुपये झाली आहे. यावरून स्पष्ट होते की, विमा कंपनीची जबाबदारी ५५७ कोटी रुपये इतकी होती, आणि अतिरिक्त ५०० कोटी रुपये पेक्षा जास्त रक्कम राज्य शासनाला द्यावी लागणार आहे.



▶▶ पंचनाम्याच्या प्रती व पिक विमा नुकसान भरपाई संदर्भात मी २० महिन्यांपूर्वीच याचिका दाखल केली होती, परंतु अंमलबजावणी अजूनही होत नाही. केंद्र आणि राज्यात एकाच पक्षाची सत्ता असताना भारतीय कृषी विमा कंपनी केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली कार्य करत आहे. तरीही राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीचे आदेश अंमलात आलेले नाहीत. यामुळे शेतकऱ्यांना पुन्हा पुन्हा अपील दाखल करावे लागतात. १७ फेब्रुवारीच्या बैठकीची एक महिन्याच्या अंमलबजावणी न झाल्यास मी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून गुन्हे नोंद करण्यास भाग पाडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देणारच.

**- अनिल जगताप,** सामाजिक कार्यकर्ते

## हुंड्याच्या त्रासाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या; पतीसह चौघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० फेब्रुवारी -**

हुंड्याच्या त्रासाला कंटाळून तुलसी दगडु शिंत्रे (रा. मेडसिंगा, ता. धाराशिव) या विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी तिच्या पतीसह सासरच्या चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी की, दि.१८ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ५ वाजता तुलसी शिंत्रे यांनी राहत्या घरी आत्महत्या केली. पती दगडु रामचंद्र शिंत्रे, सासू नंदाबाई शिंत्रे, सासरे रामचंद्र शिंत्रे आणि दीर विकास शिंत्रे यांनी लग्नात हुंडा न दिल्याच्या तसेच लग्नातील मानपान, डोहाळेजेवण आणि बारश्याचा कार्यक्रम छोटा केल्याच्या कारणावरून वारंवार शिवीगाळ, मानसिक आणि शारीरिक त्रास दिला. या छळाला कंटाळून त्यांनी टोकाचे पाऊल उचलले. या प्रकरणी मयत महिलेच्या नातेवाईक अंबिका भैरवनाथ भोंग (वय ३८, रा. समता नगर, औसा, जि. लातूर) यांनी बेंबळी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.



त्यावरून भा.दं.वि. कलम ८०(२), ८५, १०८, ३५२ आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# धाराशिव जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## निसर्ग प्रेमी ग्रुप उमरगा मार्फत दाळिंब येथे वृक्षारोपण




**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२० फेब्रुवारी -**

शिवजयंती निमित्त उमरगा शहरातील निसर्गप्रेमी ग्रुप च्या सदस्यांनी सकाळी ७ वाजता ज्ञानदीप विद्यालय दाळिंब येथे वृक्षारोपण केले.

यावेळी निसर्गप्रेमी ग्रुपच्या वतीने दाळिंब वाशी यांना निसर्गावर प्रेम करण्याचे संदेश दिले व प्रत्येकाने एक झाड लावावे व त्या झाडाचे पालन पोषण करावे निसर्गाला जपणं हे आपलं कर्तव्य आहे. संदेश शिवजयंतीच्या निमित्ताने दिले. याप्रसंगी सचिन माशाळकर, राहुल शिंदे, श्रीकांत भोसले, रवी अंकलकोटे, महेश कवठे, डॉ. उदय मोरे, डॉ. तानाजी दुधभाते, डॉ.सातपुते, ॲड. अरुण सूर्यवंशी, राजू पाटील, गणेश माने, सचिन खमीतकर, संतोष राठोड, परमेश्वर हेबळे, अजित अंबुलंगे, वैभव जाधव, संदीप पांचाळ, अशोक पाटील, विद्यालयाचे प्रिंसिपल गुंजोटे, शिक्षक वृद्ध व विध्यार्थी उपस्थित होते.

# ड्रग्ज तक्रारकर्त्यांनाच पोलीस उपअधिक्षकांची धमकी

### ▶▶ पालकमंत्र्यांसमोरच पोलिसांची पुजारी मंडळाच्या अध्यक्षांना धमकी... ▶▶ पोलिसांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह...



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० फेब्रुवारी -**

पालकमंत्र्याच्या दौऱ्या दरम्यान मंदिर प्रशासकीय कार्यालयात ड्रग्स संदर्भात तक्रार कर्ते पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे यांना येथील पोलिस उपविभागीय अधिक्षक निलेश देशमुख यांनी धमकावले म्हणून पोलीस अधीक्षक यांना तहसील कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करणार असल्याचा इशारा शिंदे यांनी दिलेल्या निवेदनात केला आहे.

शहारात अनेक वर्षांपासुन अंमली पदार्थ विक्री होत असलेबाबत पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे या अंमली पदार्थाबाबत तुळजापुर वासियांनी भेटुन तक्रार केली असता व मंत्री महोदयांनी मिटींगमध्ये ७२ तासात याचा अहवाल मागविला असता.

त्याच ठिकाणी तुळजाभवानी मंदीर कार्यालयात ऊ्धडझ निलेश देशमुख यांनी पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपीन शिंदे यांना तुम्ही खोटी माहिती देत आहात आणि मीच तुमच्यावर तरतुदी नुसार कारवाई करीन असे प्रत्यक्ष धमकी दिली आहे.

म्हणजेच एखाद्या नियमबाह्य गोष्टीची तक्रार दिल्यास तक्रारदाराचे खच्चीकरण करणे चालु आहे. म्हणजेच आम्ही जे आरोप पोलिस प्रशासन तुळजापुर यांच्या वरती केलेले आहेत की पोलिस तक्रारदाराचे म्हणने ऐकुन न घेता आरोपीस हमेशा पाठीशी घालते हे या वरील घटनेवरुन सिध्द होते. श्री. तुळजाभवानी मंदीर कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज मध्ये सदरील प्रकार चित्रीत झालेला आहे.

अशा प्रकारे न्याय मागणाऱ्यावरतीच कारवाई करणाऱ्याचे प्रयत्न व धमकी देणाऱ्या व असे प्रकार पुढे होऊन नयेत व या घटनेचा निषेध करण्यासाठी तुळजापुर तहसिल कार्यालयासमोर शुक्रवार दि.२१ फेब्रुवारी रोजी एक दिवसाचे संपूर्ण तुळजापुर वाशियांचे लाक्षणिक उपोषण करीत आहेत म्हणून सदरील निवेदनात इशारा दिला आहे.

तसेच तुळजापूर शहरामध्ये चोऱ्याचे प्रमाण वाढत असल्याने व तुळजापूर येथे तिर्थक्षेत्र असल्याने शहरात दररोज लाखो भाविक देविच्या दर्शनासाठी येत असतात.

त्यामुळे शहरातील अवैद्य धंदे, गुंडागर्दी, होणाऱ्या चोऱ्या यांना पोलीस प्रशासनाने आळा घालुन तुळजापूर शहर हे भयमुक्त करावे.

सदर प्रकरणी ड्रग्ज माफिया व त्यांच्या गुंडांकडुन तक्रारकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल होण्याची शक्याता आहे. तसेच प्राणघातक हल्ले व कुटुंबाना त्रास देण्याची शक्यता आहे.

तरी कृपया पोलीस प्रशासनाने याबाबत दक्षता घ्यावी अशी विनंती सदरील निवेदनात केली आहे.

### पालकमंत्र्यांनी पोलीस प्रशासनास खडसावले...

तक्रारकर्त्यांला धमकावण्याचे काम पालकमंत्र्यां समोरच करत असाल तर गुन्हेगारीला तुम्ही पण शामिल असताल तक्रारीची दखल घेऊन आरोपींना शोधून काढणे महत्त्वाचे असताना तक्रार करणाऱ्यालाच धमकावत असाल तर याद राखा तुमची तक्रार मला करावी लागेल. आरोपीला शोधून काढा कुणाची गय करू नका. आरोपी कोणीही असू द्या त्याला पकडा माझ्यासह मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी तुळजापूर ड्रग्स प्रकरण गांभीर्याने घेतले आहे. या भाषेत पोलीस प्रशासनास पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी खडसावले.

## धाराशिवमध्ये दोन युवकांकडून बेकायदेशीर शस्त्रे जप्त; शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० फेब्रुवारी -**

जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचे उल्लंघन करून बेकायदेशीररीत्या तलवार जवळ बाळगल्याप्रकरणी दोन वेगवेगळ्या कारवाईत दोन युवकांवर शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.




पहिल्या प्रकरणात आदित्य किशोर मुंढे (वय १९, रा. कोट गल्ली, धाराशिव) हा युवक माउली चौकात दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १ वाजता १,५०० रुपये किंमतीची तलवार बेकायदेशीररीत्या जवळ बाळगलेला आढळला.

धाराशिव शहर पोलिसांनी तलवार जप्त करत त्याच्याविरुद्ध शस्त्र कायदा कलम ४, २५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) अंतर्गत उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

दुसऱ्या प्रकरणात ऋषीकेश राजेश शिंदे (वय २०, रा. आरणी, ता. धाराशिव) हा युवक रामराजे चौक, भोसले हायस्कूल समोरील सार्वजनिक रस्त्यावर दुपारी २ वाजता बेकायदेशीर तलवारीसह आढळला. पोलिसांनी त्याच्याविरोधात धाराशिव शहर पोलीस ठाण्यात शस्त्र कायदा कलम ४, २५ सह मपोका कलम ३७(१) (३) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

या दोन्ही कारवाया पोलिसांच्या गस्तीदरम्यान करण्यात आल्या असून याप्रकरणी पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## इटकळ येथील जि.प. शाळेत शिवजन्मोत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२० फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील मौजे इटकळ येथील जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेत शिवजयंती निमित्त भव्य मिरवणूक आणि विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. सकाळी ९ वा. विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ आणि शिक्षकवर्ग यांच्या उपस्थितीत गावातून प्रभातफेरी व शिवरायांची घोड्यावर बसून मिरवणूक काढण्यात आली.

यात शिवरायांच्या, जिजाऊंच्या आणि मावळ्यांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. गावातील मुख्य चौकात मुलांनी बहारदार लेझीम नृत्य आणि शिवरायांच्या गीतावर नृत्ये सादर करण्यात आली. मुलांनी छत्रपती शिवाजी महाराज की जय..जय भवानी जय शिवाजी.. हर हर ..महादेव.. भारत माता की जय अशा घोषणांनी परीसर दणाणून सोडला. गावकऱ्यांनी उत्सफुर्तपणे कौतुक केले. यानंतर विद्यार्थ्यांची भाषणे आणि चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. शिवजन्मानिमित्त प्रत्यक्ष बाळाला आणून शिवरायांचा पाळणा मुलींनी सादर केला. कार्यक्रमाच्या शेवटी शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा फटाक्यांच्या आतषबाजीत विद्यार्थ्यांनी जिवंत देखाव्यासह सादर केला. यावेळी गावातील शिवप्रेमी तरुणवर्ग, महिला आणि ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच साहेबराव क्षीरसागर, शाळा प्रविण माशाळकर, विनोद सलगरे, तानाजी गायकवाड, श्रीकृष्ण मुळे, राहूल बागडे, उपसरपंच फिरोज मुजावर, दादा भोपळे, दयानंद गायकवाड, हैदर शेख, प्रिताप शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

## तुळजापूरात स्वाईन फ्लू आल्याची नागरिकांमध्ये भीती

### पुजारी नगर फाउंडेशनचे नगर पालिकेला निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० फेब्रुवारी -**

नळदुर्ग रोड परिसरातील पुजारी नगर, हनुमान नगर मस्के प्लॉटिंग परिसरात १५ दिवसात जवळपास ३० मृत डुक्कर (वराह) आढळून आले आहेत.

दैनंदिन मृत डुक्कर सोसायटीत नजरेस पडत असल्याने रहिवासी नागरिकांत भीतीचे वातावरण बनले असून शहरात स्वाईन फ्लूची साथ आहे का? याची खातरजमा करावी यासाठी पुजारी नगर फाउंडेशनतर्फे नगर पालिका मुख्याधिकारी यांना निवेदन दिले आहे.

पुजारी नगर, हनुमान नगर व मस्के प्लॉटिंग परिसरात मृत डुक्करांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. १५ दिवसात जवळपास ३० डुक्कर साथीच्या रोगाचे बळी ठरले असून या साथ रोगाचा परिसरातील रहिवासी नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे.




सदर परिसरात मोकाट सोडण्यात आलेल्या डुक्करांचा तात्काळ बंदोबस्त करावा तसेच डुक्कर पालक व्यवसायीकांना सूचित करावे. या साथ रोगाचा प्रादुर्भाव नागरिक वस्तीत वाढ होणार नाही याची दक्षता घ्यावी.

मोकाट डुक्करांचा लहान मुले व वयोवृद्ध नागरिकांना सातत्याने त्रास सहन करावा लागतो आहे. तरी याबाबत तात्काळ उपाययोजना करावी असे निवेदनात म्हंटले आहे.

या निवेदनावर पुजारी नगर फाऊंडेशन अध्यक्ष गणेश पुजारी, सोमनाथ पुजारी, बालाजी नरवडे, मल्लेश विभुते, विशाल शिंदे आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## मंगरुळ येथे शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२० फेब्रुवारी -**



तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथे यंदा शिवजन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची आरती व पूजन शालेय विद्यार्थिनींच्या हस्ते करण्यात आली.

आरतीनंतर मंगरूळचे प्रतिष्ठित नागरिक, सुलेमान भाई फकीर यांना श्रीफळ वाढवण्याचा मान देण्यात आला. या प्रसंगी मंगरूळचे प्रथम नागरिक महेश डोंगरे, उपसरपंच गिरीश डोंगरे, शिवसेना उपतालुकाप्रमुख विपिन खोपडे, रसिक वाले, गोविंद डोंगरे, सुनील जाधव, मंगरूळ पोलीस पाटील लक्ष्मण माळी, अनिल लबडे, दत्ता डोंगरे, अनंत उपासे, अरुण ढोकळे, अविनाश डोंगरे, मनोज डोंगरे, वालचंद्र जेटीथोर, श्याम पाटील, मकरंद लबडे, राजकुमार पारधे यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पत्रकार संघाच्या वतीने शिवजयंती उत्साहात साजरी

**तुळजापूर, दि.२० फेब्रुवारी -**

अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त तुळजापूर येथे पत्रकार संघाच्या वतीने एक भव्य उत्सव आयोजित करण्यात आला. या सोहळ्याचे आयोजन महाराजांच्या पुतळ्याजवळ करण्यात आले, जिथे पत्रकार संघाच्या सदस्यांनी उत्सव मूर्तीला पुष्पहार घालून अभिवादन केले.

## भोंजा येथे शिवजयंती विविध सांस्कृतीक उपक्रमांनी उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२० फेब्रुवारी -**

परंडा तालुक्यातील भोंजा हवेली येथे सालाबाद प्रमाणे याही वर्षी छत्रपती ग्रुप, भोंजा हवेली तालुका परंडा यांच्या वतीने दि.१९ फेब्रुवारी रोजी स्वराज्य संस्थापक, स्वराज्य रक्षक छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा शिव जयंती विविध उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

सर्व प्रथम शिव सप्ताह निमित्त मंगळवारी शालेय लेझीम स्पर्धा घेण्यात आल्या. यासाठी प्रथम, व्दितीय, व तृतीय बक्षिस देण्यात आले. या स्पर्धेसाठी तालुक्यातील अनेक शाळांनी सहभाग घेतला होता तर दि. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.३० वाजता रवि दादा मित्रमंडळ छत्रपती ग्रुप तसेच भोंजा ग्रामस्थाच्या वतीने छत्रप्ती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेची पुजा प्रमुख उपस्थित मान्यवरांच्या हस्ती करण्यात आली.

शिवव्याख्याते अमोल अंधारे यांचे जबरदस्त शिव व्याख्यान संपन्न झाले. तर शिवजन्मोत्सवा निमित्त अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी यांची भाषणे संपन्न झाली तसेच सायंकाळी ७.३० वाजता सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी रवि मोरे, शिवश्री अमोल अंधारे, गणेश नेटके, शिवशाहीर अरविंद घोगरे, बळीराम नेटके, सुब्राव मोरे, सचिन पाटील, मुख्याध्यापक बाळासाहेब घोगरे, शिक्षक वृंद अदिकराव शेळवणे, शहाजी कोकाटे, अविनाश विटकर, आप्पासाहेब शिंदे, संतोष शिंदे, शिवश्री प्रदीप नेटके, बागायतदार सागर भांदुर्ग, श्रीराम भांदुर्ग, नामदेव जाधव, सुधीर टमटमे, पै. उमाजी भांदुर्ग, बालाजी मोरे, जिवन मोरे, तसेच विद्यार्थी विद्यार्थीनी आणि छत्रपती ग्रुपचे सर्व सदस्य नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नळदुर्ग शहरात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० फेब्रुवारी -**

नळदुर्ग शहरात हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांच्या निवासस्थानी आयोजित मुख्य कार्यक्रमात शिवजनमोत्सव पाळणा आणि दुग्धआभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यामध्ये शहरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून फुलांनी सजविलेल्या पाळण्यात शिवाजी महाराजांचा पुतळा ठेवून शिवजनमोत्सव साजरा केला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यावर दुग्धआभिषेक करण्यात आला.

कार्यक्रमाच्या उद्घाटनात शफीभाई शेख यांनी नळदुर्ग शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य आश्वारूढ पुतळा उभारण्याची आवश्यकता व्यक्त केली. यावेळी त्यांनी म्हटले की, नळदुर्ग शहराला ऐतिहासिक महत्व असून, येथे शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात यावा. यासाठी सर्वांनी शासन दरबारी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमास शिवसेनेचे माजी उपजिल्हा प्रमुख कमलाकर चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष शफीभाई शेख, माजी नगरसेवक बसवराज धरणे, भाजपचे सुशांत भुमकर, आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.

## सांस्कृतिक कार्यक्रम, रक्तदान करुन येरमाळ्यात शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२० फेब्रुवारी -**

येरमाळा मध्यवर्ती सार्वजनिक शिवजन्मोत्सवात मंगळवारी (ता. १८) सायंकाळी विद्यानिकेतन विद्यालय येरमाळा व ज्ञानोद्योग विद्यालय येरमाळा या दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक व वक्तृत्व स्पर्धा कार्यक्रम पार पडला.यावेळी छत्रपती शिवाजी महाराज जीवन चरित्रावर विविध प्रकारच्या नाटिका, नृत्य व लोककला यांचे सादरीकरण विद्यार्थ्यांच्या माध्यमातून करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाने ग्रामस्थांचे मने उल्हासित केली.सायंकाळी ९ ते १२ च्या दरम्यान शिवकालीन कला वाघ्या मुरळी पथकाच्या माध्यमातून शिवचरित्र गायन कार्यक्रम संपन्न झाला. शिवजन्मोत्सव काळ पाळणा महोत्सवाने साजरा करण्यात आला.

यावेळी शिवजन्मावर आधारित पाळणे येरमाळ्यातील महिलांनी गायले. येरमाळ्याच्या प्रथम नागरिक सरपंच प्रिया बारकुल, उषा बारकुल, उज्वला बारकुल, सुषमा बारकुल, ज्योती बारकुल इतर महिला उपस्थित होत्या. शिवजन्मोत्सव साजरा करत असताना उपस्थित येरमाळा ग्रामस्थांनी जयघोषात फटाक्यांची आतिषबाजी करत छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव साजरा केला.



बुधवारी (ता.१९) येरमाळ्यात पालखी सोहळा उत्सवाचे आयोजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पालखीचे वाजत गाजत ढोल ताशाच्या गजरात व विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून गावच्या चौका चौकातून मिरवणूक काढण्यात आली.

रक्तदात्यांना येरमाळा पत्रकार बहुउद्देशीय संस्था यांच्या माध्यमातून रक्तदात्यास शिवप्रतिमा भेट म्हणून देण्यात आली. यावेळी अनेक तरुणांनी रक्तदान करून शिवजन्मोत्सव साजरा केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मध्यवर्ती शिवजन्मोत्सव सोहळ्याचे अध्यक्ष प्रवीण बारकुल आतिश बारकुल अमोल बारकुल, गोरख बारकुल काकासाहेब बारकुल,प्रितेश बारकुल, तेजस बारकुल, रामेश्वर चौधरी, शुभम बारकुल, बालाजी बारकुल, गणेश पवार समस्त येरमाळा ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

### तुळजापुरात शिवजयंतीनिमित्त शिवदिपोत्सव...

## माता-भगिनींच्या हस्ते १००१ दीप प्रज्वलित करुन शिवरायांना मानवंदना



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० फेब्रुवारी -**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कै. विश्वास इंगळे विचार मंच आणि जवाहर तरुण मंडळाच्या वतीने १००१ दीप प्रज्वलित करून शिवदीपोत्सव साजरा करण्यात आला. त्यानंतर शिवभक्तांना पेढे वाटप करण्यात आले.

जवाहर गल्ली येथून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत शिवभक्त महिला आणि पुरुषांची पदयात्रा काढण्यात आली होती. जय भवानी जय शिवाजी जय घोषणा देत पारंपारिक पद्धतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन व छत्रपती संभाजी महाराज यांच्या ही पुतळ्याचे पूजन करून सर्व माता भगिनी यांच्या हस्ते १००१ दीप साजरा करण्यात आला आहे.

लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## निलंगेकर कुटुंबाचे दिलीपराव देशमुख, बस्वराज पाटील यांच्याकडून सांत्वन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२० फेब्रुवारी -**



राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या पत्नी सुशीला पाटील-निलंगेकर यांचे वृद्धापकाळाने रविवार दि.१७ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्याबद्दल राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख व माजी मंत्री बस्वराज पाटील यांनी निलंगा येथे अशोका निवासस्थानी निलंगेकर कुटुंबाची भेट घेवून सांत्वन केले.

यावेळी प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस अशोकराव पाटील-निलंगेकर, डॉ. शरद पाटील निलंगेकर, आमदार संभाजी पाटील-निलंगेकर उपस्थीत होते. यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल्य उटगे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ॲड. प्रमोद जाधव शाम भोसले, राजकुमार पाटील, संभाजी सुळ, बालाजी बिराजदार, सचिन दाताळ, हरिराम कुलकर्णी, संभाजी रेड्डी, मुकेश राजमाने, चांदपाशा इनामदार, विजयकुमार पाटील, डॉ. अरविंद भातंबरे आदी उपस्थित होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

# सोयाबीनचा दर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर अवलंबून असतो : आ. अभिमन्यू पवार



### जागतिक कडधान्य दिनानिमित्त एडीएम ग्रोचे शेतकरी महामेळाव्याचे आयोजन...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२० फेब्रुवारी -**

गेल्या वर्षभरात १४५ कंपन्यानी १लाख ४२ हजार मेट्रिक टनाची विक्री एडीएम ग्रो कंपनीला केली असून जवळपास ८०० कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल झाली आहे. हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरातील उत्तम उदाहरण असून पंतप्रधानांच्या शेतकरी उत्पादक कंपण्यांच्या धोरणाशी संलग्न आहे. अशा या सोयाबीनचा दर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर अवलंबून असतो, असे मत आ. अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केले.

एडीएम शाश्वत शेती उपक्रमाअंतर्गत जागतिक कडधान्य दिनाचे औचित्य साधून एडीएम अग्रो इंडस्ट्रीज इंडिया प्रा.लि, लातूर आणि रोबेल अग्रो औसा यांच्या संयुक्त विद्यमाने वाघोली पाटी, औसा-निलंगा रोड, चलबुर्गा येथे शेतकरी महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी उद्घाटक म्हणुन आ. अभिमन्यू पवार बोलत होते. एडीएम इंडिया कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अमरेंद्रा मिश्रा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

तर इंडो पल्सेस डेव्हलपमेंट असोसिएशनचे अध्यक्ष नारायण नन्नावरे, डॉ.डी.एल. जाधव, प्रा.डॉ. बाबासाहेब ठोंबरे, एम.बी. गाजरे, तालुका कृषी अधिकारी संजय ढाकणे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. प्रा.डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी चे मराठवाड्यातील शेतीतील योगदान व पुढील वाटचाल याविषयी सविस्तर अशी माहिती दिली तर डॉ.डी.एल. जाधव यांनी शेतकरी उत्पादक कंपनीची सद्यस्थिती व पुढील वाटचाल यावर भाष्य केले.

इंडो पल्सेस डेव्हलपमेंट असोसिएशनचे अध्यक्ष नारायण नन्नावरे यांनी शासकीय योजनांचा उल्लेख करताना एडीएमचे कार्य केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कार्यरत असल्याचे सांगितले. प्रा. गुट्टे यांनी कडधान्य पिकांची लागवड तसेच व्यवस्थापन याबद्दल माहिती दिली. यामध्ये त्यांनी दोन झाडातील अंतर हे जेवढे जास्त असेल तेवढे उत्पन्न जास्त येईल असे सांगितले.

तसेच कायम जुन्या वाणांची निवड यामुळे उत्पन्नात घट येत असल्याचे मत व्यक्त करुन नवीन वाणांची निवड करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एडीएम अग्रोचे व्यवस्थापक अमोल ढवण यांनी केले तर रोबेल ग्रोचे संचालक सादिक सय्यद यांनी उपस्थित सर्व शेतकऱ्यांचे आणि मान्यवरांचे आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दयानंद माने यांनी केले. लातूर, धाराशिव, नांदेड जिल्ह्यातील सुमारे १,५०० पेक्षा अधिक शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एडीएम आणि रोबेल अग्रो च्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## डॉ. अरविंद्र भातांब्रे यांनी घेतली उपोषणकर्त्यांची भेट



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२० फेब्रुवारी -**

तालुक्यातील शिवूर व नदीवाडी येथील शेतकरी शिवूर, नदीवाडी पाणंद रस्त्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहेत. या उपोषणकर्त्यांची कॉंग्रेसच्या डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. अरविंद भातांब्रे यांनी बुधवारी उपोषण स्थळी जावून भेट घेतली.

शिवूर नदीवाडी पाणंद रस्त्यावर अतिक्रमण झाल्याने व काटेरी झुडपे वाढल्याने शेतकऱ्यांना आपल्या शेताकडे जाण्यासाठी प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

नदीवाडी व शिऊर या दोन्ही गावच्या ग्रामस्थांना ये-जा करण्यासाठीही अडचण येत आहे. मंजूर असलेल्या या पाणद रस्त्याचे काम गेल्या एक वर्षापासून बंद आहे. या रस्त्याचे काम तात्काळ करून देण्यात यावे या साठी जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे आमरण उपोषण सुरू आहे.

या उपोषण स्थळी निलंगा विधानसभा मतदार संघाचे नेते, आरोग्यदूत डॉ. अरविंद भातांब्रे यांनी उपोषण कर्त्यांना भेट दिली व त्यांना पाठिंबा दिला.

यावेळी अरुण अष्टुरे, भरत सूर्यवंशी, दिलीप सूर्यवंशी, आत्मराम सूर्यवंशी, संजय सूर्यवंशी, नामदेव तुगावे, श्रीमंत काथे, सुशीला अष्टुरे, भारता काळे, सुलोचना तुगावे, सरोजा अष्टुरे, ग्रामस्थ, शेतकरी उपस्थित होते.

### महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**लातूर, दि.२० फेब्रुवारी -**

छत्रपती शिवाजी महाराज हे द्रष्टे राजकारणी आणि आदर्श व्यवस्थापन गुरु होते. पर्यावरण वेळेचे व्यवस्थापन, मनस्थितीचे व्यवस्थापन, विज्ञाननिष्ठा, जलव्यवस्थापन मानवी संस्था व्यवस्थापन आणि न्याय व्यवस्थापन नेतृत्व गुण अधिक विकासात महाराजांचा हातखंडा होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे रूपांतर स्वराज्यात केले. स्वराज्यावरील अनेक संकटावर मात करून शिवरायांनी नवा मार्ग काढला. त्यामुळे त्यांच्या विचाराची प्रत्यक्ष कृती दैनंदिन जीवनात होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन इतिहास अभ्यासक डॉ. सदाशिव दंदे यांनी केले.

## जानकी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२० फेब्रुवारी -**

अखंड महाराष्ट्राचे आराध्यदैवत, श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवजयंती महोत्सव १९ फेब्रुवारीला सर्वत्र भव्य साजरा करण्यात आला अहमदपूर च्या जानकी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांना मानाचा मुजरा करत उत्साहात शिवरायांची जयंती साजरी करण्यात आली.

संस्थेच्या उपाध्यक्षा शितल खोमणे, प्राचार्य डॉ. केतन खोमणे यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर महाविद्यालयातील प्राध्यापकांनी महाराजांची दुर्गनिती, गनिमी काव्यात वापरलेली युद्ध निती, प्रशासकीय शिस्त, सामान्य जनतेला मिळनारा न्याय या संदर्भात आपले मत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्राध्यापक दीक्षा लामतुरे व प्राध्यापक जगताप आकांक्षा यांनी केले तर आभार प्रा. अजय स्वामी यांनी मानले.

कार्यक्रमास प्रा. आगलावे वैष्णवी, प्रा. गिरी प्रदीप, प्रा. देशमुख जोहरा, गोपाळ म्हेत्रे, प्रसाद गुंडरे, प्रसाद सूर्यवंशी, विद्यासागर धुळगुंडे, कांबळे श्रीकांत, मुरकुटे वामन, गायकवाड उमादेवी, विद्यार्थी उपस्थित होते.

## धनेगावच्या मांजराकाठावर शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा



### प्रेरणादायी व्याख्यानाने उपस्थितांना दिली नवी ऊर्जा!

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२० फेब्रुवारी -**

देवणी तालुक्यातील धनेगावच्या मांजराकाठावर प्रसन्न वातावरणात महादेव विद्यालयाच्या प्रांगणात यंदाचा शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिवशक्ती, गुणशक्ती आणि राष्ट्रसेवेच्या विचारांचा जागर करीत, शिवगर्जनेने संपूर्ण परिसर दणाणून गेला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पांडुरंग बिरादार होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त कर्नल गिरीधर धोंडीराम कोल्हे, लेफ्टनंट कर्नल सचिन रडाळे, पोलिस निरीक्षक माणिकराव डोके, प्राचार्य रामलिंग मुळे, डॉ. विद्यासागर बिरादार, सरपंच विजयकुमार पाटील, चेअरमन शेषेराव पाटील, अनिल पाटील जवळगेकर, किशोर बिरादार आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज आणि शहीद श्रीरंग बिरादार यांच्या प्रतिमांचे पूजन आणि पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. तसेच विविध क्षेत्रांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या सोहळ्यात युवा व्याख्यात्या भाग्यश्री मोहिते-पाटील यांनी शिवचरित्रावर प्रकाश टाकत शिवाजी महाराजांचे आदर्श युवकांनी आपल्या जीवनात कसे अवलंबावेत, समाजातील माता-



भगिनींचा सन्मान कसा राखावा आणि इतिहासातून प्रेरणा घेऊन राष्ट्र उभारणीसाठी योगदान कसे द्यावे यावर प्रभावी विचार मांडले.

त्या म्हणाल्या, वाईट विचारांना ठेचून महाराजांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार केल्यास भविष्यातील पिढीतील भगतसिंग, राजगुरू, सुखदेव घडतील. तसेच, आधुनिक युगातील स्त्रियांनी राजमाता जिजाऊंच्या विचारांचा अंगीकार केल्यास उत्तम अभियंते, समाजसेवक, शिक्षक, अधिकारी, शेतकरी आणि आदर्श नागरिक घडतील.

शहाणी माणसं इतिहास फक्त वाचतात, पण वेडी माणसं तो घडवतात. जो समाज इतिहास विसरतो, त्याला इतिहास धडा शिकवतो, असे सांगत त्यांनी इतिहासाचे महत्त्व अधोरेखित केले.

उत्कृष्ट नियोजन आणि मोठ्या संख्येने उपस्थिती या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रविंद्रकुमार पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन अक्षय पाटील यांनी मानले.

शिवजयंती उत्सवाच्या निमित्ताने धनेगाव परिसरातील शिवप्रेमी, ग्रामस्थ, विद्यार्थी, शिवभक्त प्रेम नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लालबहादूर शास्त्री विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२० फेब्रुवारी -**

लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे पर्यवेक्षक कृष्णा मारावार उपमुख्याध्यापक अरुण पत्की अभ्यासपूरक मंडळ प्रमुख आशा गौतम प्रमुख पाहुणे म्हणून मनोज कराड यांची उपस्थिती होती. याप्रसंगी कविता मिरकले या विद्यार्थिनीने शिवाजी महाराजांचा तर सृष्टी हरणे या विद्यार्थिनीने तानाजी मालुसरे यांचा पोवाडा सादर केला. तसेच विश्वजीत जाधव व अक्षरा दुरूगकर या विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकला. याप्रसंगी वक्ते मनोज कराड यांनी मनोगतातून शिवाजी महाराजांचा इतिहास त्यांचे व्यक्तिमत्व व गनिमी कावा या सर्व गोष्टी सांगत असताना महाराज सर्वगुणसंपन्न असे राजे होते असे विचार व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात कृष्णा मारावार यांनी शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपण जीवन जगले पाहिजे असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व स्वागत परिचय श्रीया महामुनी तर आभार मयुरी वट्टमवार या विद्यार्थिनीने मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष गजलवार, किरण नेमट माधव मठवाले, विजया गोविंदवाड व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## रामानंद कदम यांची कार्यकारी संचालक पॅनलवर निवड

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२० फेब्रुवारी -**

मांजरा साखर परिवारातील सदस्य असलेल्या तळेगाव येथील जागृती शुगर अ‍ॅन्ड अलाइंड इंडस्ट्रीज लिमिटेड येथे कार्यरत असलेले मुख्य शेतकी अधिकारी रामानंद कदम यांची साखर आयुक्तालय पुणे यांच्यावतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत यश मिळवले असून त्यामुळे कार्यकारी संचालक पॅनल वर त्यांची निवड झाली आहे. त्याबद्दल जागृती शुगरचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची भेट घेवून त्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.



यावेळी जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे जनरल मॅनेजर गणेश येवले, मांजरा साखर शुगरचे जनरल मॅनेजर वाकडे उपस्थित होते. याप्रसंगी रामानंद कदम यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी शुभेच्छा दिल्या.

रामानंद कदम मुख्य शेतकी अधिकारी रामानंद कदम यांची कार्यकारी संचालक पॅनल वर निवड झाल्याने जागृती शुगरच्या अध्यक्षा तथा कार्यकारी संचालक गौरवी भोसले यांनी अभिनंदन केले आहे.

# निलंगा शहरात विविध उपक्रमांनी शिवजन्मोत्सव साजरा; शिवजन्माच्या पाळण्यास हजारो महिलांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२० फेब्रुवारी -**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या पूर्वसंध्येला शहरात शिवजयंतीनिमित्त जिजाऊ चौक येथून मशाल रॅली काढण्यात आली. या रॅलीत जय जिजाऊ, जय शिवराय अशा जयघोषासह, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयघोष करण्यात आला व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास सुधीर पाटील व प्रभात पाटील यांच्या हस्ते दुग्धअभिषेक करून रॅलीची सांगता करण्यात आली.



सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समिती तसेच नगर पालिका कर्मचारी यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात ध्वजारोहण करून अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले. मैत्री ग्रुपच्या वतीने शिवप्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी जयश्री दापके व रिषा अजित नाईकवाडे या महिलांनी रक्तदान करून शिबिराची सुरुवात केली. ८१ शिवभक्तांनी रक्तदान करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीदिनी सहभाग नोंदवला. यावेळी भालचंद्र ब्लड बँकेचे कर्मचारी यांनी रक्त संकलन केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास सजावट, रोषणाई करून सजावट करण्यात आली होती. दिवसभर अबालवृद्ध फोटो काढुन पुतळ्यासमोर अभिवादन करत मोठी गर्दी केली. सायंकाळी महाराष्ट्र विद्यालयच्या विद्यार्थिनींनी 'मी जिजाऊ बोलते' ही एकांकिका सादर केली. सद्गुरु इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थिनींनी झाशीची राणी, गोंधळ मांडियेला भवानी गोंधळाला ये, शिवरायांच्या वाघीणी आम्ही शिवकन्या या गीतांवर नृत्य सादर केले, शिव तांडव नृत्य सादर केले. ज्ञानदीप इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी गणनायका गणरायाच्या गीतावर नृत्य सादर केले. या नंतर महिलांनी शिवजन्माचा पाळणा व गाणे गायले.

यावेळी ईश्वर पाटील, विशाल जोळदापके, अजित नाईकवाडे, अभय साळुंके, संतोष बरमदे, सतीश फट्टटे, हमीद शेख, अविनाश रेशमे, प्रमोद कदम, विनोद सोनवणे, राजाभाऊ सोळंके, प्रदिप कदम, किरण पाटील, राहूल बिराजदार, धिरज शिंदे, रितेश तांबोळे, लाला पटेल, दत्ता शाहीर, अंबादास जाधव, महेश ढगे, हारीभाऊ सगरे, अमर पाटील, बाळू मणीयार, सचिन पवार, दिगंबर पवार, फारुख देशमुख, इस्माईल लदाफ, नाना आकडे, माधव वाडीकर, नसीम खतीब, दिपक चोपणे, सुधाकर पाटील आदींनी परिश्रम घेतले.

येथील दापका वेस जिजाऊ चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक ते आनंदमुनी चौकपर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. धर्मरक्षक ढोल पथक व डॉल्बीच्या तालावर तरुणांनी ठेका धरला होता. यावेळी तरुणांची प्रचंड गर्दी होती. हातात छत्रपती शिवाजी महाराजांचे फलक घेऊन तरुणांनी प्रचंड घोषणाबाजी केली व छत्रपती शिवाजी महाराज चौकत मिरवणूक येताच महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आतिषबाजी करण्यात आली. मिरवणूक यशस्वीतेसाठी दत्ता मोहळकर, राणा आर्य, सागर पाटील, अमोल सूर्यवंशी, बबलू ढवळे, गजानन बऱ्हाणपूरे, भरत चव्हाण, आदित्य कमले, पृथ्वीराज निंबाळकर आदींनी परिश्रम घेतले.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वडार समाज संघाच्या वतीने शिवजंयती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२० फेब्रुवारी -**
अतुलनीय व्यक्तीमत्त्व म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज, चारित्र्याचा मापदंड म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय. जगातल्या कोणत्याच व्यक्ती वा काल्पनिक पात्रांशी ज्यांची तुलनाच करता येऊ शकत नाही. असे एक आदर्श, प्रगल्भ नेतृत्व म्हणजे जिजाऊ पुत्र छत्रपती शिवाजी महाराज होय. अशा या आदर्श नितीवंत राजाची जंयती दरवर्षी हर्षोल्लासाने साजरी करण्यात येते.

त्याचेच औचित्य साधून वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य लातूर जिल्ह्याच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शिवजंयती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भटक्या-विमुक्तांचे नेते हरिभाऊ गायकवाड यांची उपस्थिती लाभली. त्याचसोबत अतिथी म्हणून बहुजन नेते भारत काळे, पद्माकर वाघमारे, रंगनाथ घोडके, ॲड. अंगदराव सूर्यवशी, सुदर्शन बोराडे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी श्रीकांत मुद्दे म्हणाले की, ज्या समाजात आपण जन्मलो, वाढलो त्या समाजाच्या विकासासाठी आपण काहीतरी देणे लागतो. या भावनेतून समाजासाठी काहीतरी करणे गरजेचे आहे. यातूनच जबाबदारी आणि कर्तव्यभावनेतून समाजासाठी योगदान दिले पाहिजे. शिवछत्रपतींना घडवणाऱ्या राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ यांचा आदर्श समोर ठेवून महिलांनी आपल्या मुलांना शिक्षण दिले पाहिजे, तरच समाजाच्या विकासाचा रथ पुढे जाण्यास मदत होईल, असेही यावेळी वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे म्हणाले. याचे आयोजक वडार समाज संघ, महाराष्ट्र राज्य लातूर जिल्हाध्यक्ष रमाकांत मुद्दे यांच्या हस्ते सर्व शिवप्रेमींचे स्वागत करण्यात आले.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## ‘राजमाता जिजामाता’ला रावळेंनी दिली पुस्तके भेट

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२० फेब्रुवारी -**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील शैक्षणिक संलग्नीकरण विभागाचे सहाय्यक अधीक्षक सुनील सीताराम रावळे यांनी



येथील राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी अवांतर वाचनाची जवळपास दहा हजार रुपये किमतीची पुस्तके स्वखर्चातून भेट दिली.

यावेळी राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी ही पुस्तके स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांच्या हस्ते स्विकारली. यावेळी विद्यापीठातील सहाय्यक अधीक्षक विजय कदम, सहाय्यक अधीक्षक सुनील ढाले, अजिजखान पठाण, ओमकार साळुंके आदी उपस्थित होते. सुनील रावळे हे उपक्रमशील व्यक्तिमत्त्व आहे. अनाथ व गरजू विद्यार्थ्यांना ते शिक्षणासाठी मदत देतात. आतापर्यंत त्यांनी अनेक महाविद्यालयांना स्वखर्चातून पुस्तके भेट दिली आहेत. याबद्दल प्राचार्य केंद्रे यांनी पुष्पगुच्छ देवून त्यांचा सत्कार केला.

## दयानंद विज्ञानमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२० फेब्रुवारी -**
येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी प्र.प्राचार्य डॉ. श्याम इबाते यांनी श्रीमंतयोगी,हिंदवी स्वराज्याचे संस्थापक,जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या.
याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षिका डॉ.वैशाली पाटील,डॉ. संध्या वाडीकर,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,प्रा.अनिलकुमार माळी, डॉ.अमोल ठोसर, प्रा.कविता जाधव,दिवाकर ढोले,सुदाम सातपुते, सुनील राक्षे, सचिन सूर्यवंशी यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## प्रधानमंत्री आवास योजनेचे बांधकाम लवकरात लवकर पुर्ण करावे

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२० फेब्रुवारी -**
लातूर शहर महानगरपालिका प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांसाठी शासनामार्फत २२ कोटी निधी प्राप्त झालेला आहे.
सर्व लाभार्थी यांना आवाहन करण्यात येत आहे की मनपामार्फत मिशन मोड मध्ये दोन दिवसामध्ये निधी वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. लातूर शहर महानगरपालिका प्रधानमंत्री आवास योजना लाभार्थी यांनी महापालिकेच्या संबधीत आधिकारी यांच्याशी संपर्क साधुन आपल्या जागेची पाहणी करणे करीता कळवावे. नविन बांधकामाकरीता १ लक्ष रू. प्लेंथ पर्यंत बांधकाम केल्यास १ लक्ष रू व तसेच बांधकाम पुर्ण करूण प्रधानमंत्री आवास योजनेचा लोगो व नाव पेंट केल्यानंतर उर्वरीत ५० हजार रू हप्ता तात्काळ वितरीत करण्यात येईल. तरी सर्व लाभार्थी यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

## अंकुर बालविकासमध्ये विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२० फेब्रुवारी -**
येथील अंकुर बालविकास केंद्रात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला. अध्यक्षस्थानी जनक गायकवाड उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून अनिल सूर्यवंशी, सोमनाथ सोरटे, ॲड. योगेश सिरसाट, मुख्याधापक तथा सचित व्यंकट दापेगावकर यांची उपस्थिती होती.
विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टिकोन बाळगून, योग्य दिशेने वाटचाल करून यशस्वी व्हावे, असे आवाहन मुख्याधापक व्यंकट दापेगावकर यांनी मुलांना केले.

# हजारोंच्या उपस्थितीत झुलला शिवबांचा पाळणा

## शाहीरांनी जागवले चैतन्यः गगनभेदी जयकारात शिवजयंती साजरी





**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२० फेब्रुवारी -**
भगव्या पताका, विद्युत रोषणाईचा झगमगाट, फटाक्यांचा कडकडाट, मराठमोळ्या पेहरावात भगवे फेटे बांधून आलेल्या माता-भगिनी आणि शिवरायांचा अखंड जयकार अशा उत्साही वातावरणात लातुरकरांनी बुधवारी शिवजन्माचे स्वागत केले. मध्यरात्री जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, डॉ. बावकर, डॉ. श्वेता काटकर-पवार व महिलांनी बाळ शिवबांचा पाळणा झुलवला आणि सर्व परिसर पुन्हा शिवरायांच्या गगनभेदी जयकाराने निनादून गेला.

यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, महापालिका उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, हंसराज जाधव, ॲड. उदय गवारे, वैजनाथ जाधव, कालिदास माने, धनंजय शेळके, डी. एस. पाटील, डॉ. अभय कदम, दत्तात्रय जाधव, सतीश साळुंके आदींची उपस्थिती होती. पाळणा उत्सवाचे व्यापक नियोजन केले होते. शिवशाहीर राजेंद्र कांबळे, खुडूसकर यांचा पोवाड्याचा कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांनी लेझीम सादर केले. स्नेहा लोखंडे हिने शिवकार्यावर मनोगत व्यक्त केले. दरम्यान, रात्री पावणेबारा वाजेच्या सुमारास शिवबांचा पाळणा झाला. फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. साखर वाटून या उत्सवाचा समारोप करण्यात आला.

### शिवराय ही अखंड प्रेरणा : जिल्हाधिकारी

कार्यक्रमाला लाभलेली महिला, मुली व नागरिकांची विलक्षण उपस्थिती पाहून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी सर्वांचे मुक्तकंठाने कौतुक केले. जिजाऊ माँसाहेब व छत्रपती शिवराय हे चिरंतन प्रेरणेचा स्त्रोत आहेत. महाराजांना महिलांबाबत नितांत आदर होता. सर्वसामान्यांचे समाधान हाच महाराजांचा ध्यास होता. शिवरायांचा विचार आपण जगवला पाहिजे. मुलींनी कणखर आणि आर्थिक आत्मनिर्भर व्हायला हवे. चांगले करीअर करा. आई-वडीलांना अभिमान वाटेल अशीच तुमची ओळख बनवा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## गुरु रविदासांच्या समतावादी विचारांचा धागा मनामनात रूजला पाहिजे : प्रा.राऊत

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२० फेब्रुवारी -**
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान निर्माण करून क्रांती घडवून आणली. ७५ वर्षात आपल्या देशात प्रतीक्रांती सुरु झाली. प्रतीक्रांतिकारी शक्ती विजयी होऊन संविधानाच्या आधारे सत्तेत बसलेली आहे. अशा पार्श्वभूमीवर आपल्या परम्परेतील गुरु रविदासाच्या समतावादी विचारांचा धागा मनामनात रुजला पाहिजे, यासाठी प्रचंड काम करावे लागेल. असे प्रतिपादन संविधानाचे अभ्यासक प्रा. डॉ. अनंत राऊत लातूर येथे केले.

गुरु रविदास, छत्रपती शिवाजी महाराज व संत सेवालाल महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात आयोजित व्याख्यान मालेत प्रा. डॉ. अनंत राऊत हे गुरु रविदास यांच्या विचारांचे भारतीय संविधानात उमटलेले प्रतिबिंब : एक आकलन या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. डी. निटुरकर हे होते. तर उदघाटक म्हणून सेवा निवृत्त सेल्स टॅक्स निरीक्षक डी. एस. सूर्यवंशी होते. तसेच श्रीमती महानंदा शेवाळे, प्रा. हर्षवर्धन कोल्हापुरे, नरशिंग घोडके, इंजि. श्रीधर शेवाळे, प्रा. यू. डी. गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती.
डॉ. अनंत राऊत म्हणाले, आपणास गुलाम करणारी, अस्पृश्य आणि दारिद्र्यात ठेवणारी व्यवस्था गुरु रविदासानी नाकारली. आपणासही ही प्रतीक्रांतीकारी व्यवस्था नाकारता आली पाहिजे. भारतीय संविधानाच्या १५ व्या अनुच्छेदमध्ये जात, धर्म, पंथ, लिंग,जन्मस्थान या पैकी कोणत्याही कारणावरून भेदाभेद करता येणार नाही. असे सांगितले आहे. सरळ सरळ हा गुरु रविदासांच्या विचारांचा प्रभाव आहे. येत्या काळात संविधान जागृतीपर कार्यक्रम घ्यावे लागतील. एक व्यापक अभियान प्रत्येक शाळा -महाविद्यालय घ्यावे लागेल. सामाजिक परिवर्तनासाठी प्रचंड काम करावे लागेल. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.



## राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२० फेब्रुवारी -**
येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेज, तुळजाभवानी विद्यालय व संगमेश्वर विद्यामंदिरात बुधवारी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती साजरी करण्यात आली.

प्रारंभी संस्थेचे संस्थापक सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य केंद्रे यांनी छत्रपती शिवरायांच्या जीवन कार्याला उजाळा दिला.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, राजीव मुंढे, प्राचार्य जी. आर. मुंडे, प्रा. बी. बी. खटके, पर्यवेक्षिका सुनीता जवळे, मदन धुमाळ, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते यांच्यासह अन्य प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## भाजप नेते कराड यांनी केले छत्रपती शिवरायांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२० फेब्रुवारी -**
रयतेचे राजे, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून भाजपचे नेते तथा श्री संत गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याचे चेअरमन राजेश कराड आणि भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ऋषिकेश रमेश कराड यांनी अभिवादन केले.

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा मोठा प्रभाव आहे. शिवाजी महाराज हे मराठी लोकांच्या अस्मितेचा एक अविभाज्य भाग आहेत. बुधवारी (दि. १९) भाजपच्या ‘संवाद’ कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी भाजप नेते राजेश कराड आणि ऋषिकेश कराड यांनी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी भाजप किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम शिंदे, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, ओबीसी मोर्चाचे डॉ. बाबासाहेब घुले, बन्सी भिसे, वसंत करमुडे, संभाजी वायाळ, प्रताप पाटील, प्रसिध्दी प्रमुख चंद्रकांत कातळे, गोपाळ शेंडगे, संतोष चव्हाण, दिलीप पाटील, लक्ष्मण खलंग्रे, उध्दव कुसंगे, बाबूराव कस्तुरे, बालाजी गवळी, भूषण काळदाते आदी उपस्थित होते.

## आम्ही संघात का आहोत? पुस्तकाचे शनिवारी प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२० फेब्रुवारी -**
साप्ताहिक विवेकचे दीर्घकाळ संपादक राहून आता हिंदुस्थान प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष असणारे रमेशराव पतंगे यांनी लिहिलेल्या आम्ही संघात का आहोत? या पुस्तकाचे प्रकाशन शनिवार दि. २२ फेब्रुवारी रोजी संपन्न होणार आहे.

रमेशराव पतंगे हे ६० वर्षांपासून संघकार्यात गुंतलेले आहेत. त्यांनी संघ व राष्ट्रीय विषयावर विविध माध्यमातून लेखन केले आहे. कृतिशील विचारवंत म्हणून त्यांना ओळखले जाते. आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संबंधित संस्था, संघटना देशाच्या समाज जीवनात महत्त्वाच्या स्थानी आहेत. म्हणूनच संघ कार्याला विरोध वाढला आहे.या पार्श्वभूमीवर रमेशराव पतंगे यांनी आपल्या संघ जीवनातील प्रत्यक्ष अनुभव आम्ही संघात का आहोत? या पुस्तकाच्या माध्यमातून शब्दबद्ध केले आहेत. शनिवार दि.२२ रोजी सायंकाळी ६ वाजता राजस्थान विद्यालयाच्या खुल्या सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या अध्यक्षतेत हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी रमेश पतंगे हे मार्गदर्शनही करणार आहेत.

## शिवरायांनी स्वराज्यासह स्वराष्ट्र निर्माण केले :हबीब

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२० फेब्रुवारी -**
हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती कृषि महाविद्यालय व विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय जिमखाना विभागाच्या वतीने संयुक्तरित्या उत्साहात साजरी करण्यात आली.





विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालय व विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ विचारवंत अमर हबीब, अतिथी म्हणून ख्यातनाम साहित्यिक गोरख शेंद्रे, कृषि महाविद्यालय व कृषि व्यवसाय व्यवस्थापन संस्था जीरेवाडी चे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.दिनेशसिंह चौहान, डॉ. व्यंकट जगताप, जिमखाना उपाध्यक्ष डॉ.अच्युत भरोसे हे उपस्थित होते.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी तर संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ.भगवान आसेवार यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी विविध क्रीडा, सांस्कृतिक स्पर्धांमध्ये विजेत्या स्पर्धकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात डॉ.बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, शेतकरी व महिलांचा विकास या विचारांवर वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ मुल्यवर्धनाचे कार्य करीत आहे. शेतकरी देवो भव: हा विचार आज विद्यापीठाचा आत्मा आहे.

तसेच आज आपल्याला लाभलेले पाहुणेसुद्धा शिवरायांच्या विचारांशी बांधिलकी जपणारे आहेत. असे सांगून ते म्हणाले की, कृषि पदवीधर विद्यार्थी हेच शिवरायांचे खरे मावळे आहेत. यानंतर प्रमुख मार्गदर्शक अमर हबीब म्हणाले की, शिवरायांनी ऐषोआरामासाठी महाल बांधले नाही तर स्वराज्यासाठी गडकिल्ले बांधले. जो स्त्रियांचा सन्मान करेल त्यानेच भगव्याला हात लावावा. शिवरायांनी शेतकऱ्यांची व स्त्रियांची लुबाडणूक होणार नाही याकडे विशेष लक्ष दिले. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठासही हात लावू नका असे आज्ञापत्र काढणारे शिवराय एकमेव राजे होते. सर्जक म्हणून स्त्रिया व शेतकरी व गुणवत्ता म्हणून मावळ्यांना चालना दिली.

राज्य तेच जिथे शेतकरी व स्त्रियांना सन्मान मिळतो असे सांगून शिवरायांनी स्वराज्यासह स्वराष्ट्र निर्माण केले असेही ते म्हणाले. प्रमुख अतिथी श्री. गोरख शेंद्रे आपल्या मनोगतात म्हणाले की, शिवजयंतीच्या निमित्ताने आज आपण सर्वजण एक होत असतो ही शिवरायांच्या विचारांची ताकद आहे. शिवरायांकडे मावळे कमी होते परंतु जे होते ते निष्ठावंत होते त्यांना शिवरायांनी एकत्र आणण्याचे काम केले. यावेळी डॉ.दिनेशसिंह चौहान यांना जीरेवाडी येथील दोन महाविद्यालयांचा पदभार प्राप्त झाल्याबद्दल तसेच डॉ.मनीषा बगाडे यांचा पदोन्नती झाल्याबद्दल तर सुर्यकांत चिंताले व श्रीमती शांताबाई राठोड यांचा सेवानिवृत्त झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला.

## विमा योजना बंद करून थेट शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान द्या

### राज्य बाजार समितीचे उपसभापती सोमवंशी यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२० फेब्रुवारी -**
केंद्र, राज्य सरकार तसेच शेतकरी हिस्सा ही रक्कम कोट्यवधी रुपयांत आहे. त्या तुलनेत शेतकऱ्यांना मिळणारी भरपाई अत्यल्प असून विमा कंपनी व शेतकऱ्यांमध्ये भरपाईच्या मुद्द्यावरून वादही उद्भवतात त्या पार्श्वभूमीवर विमा योजना बंद करीत थेट शेतकऱ्यांनाच दरवर्षी सानुग्रह अनुदान देण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे केली.



केंद्र आणि राज्य सरकारकडून सुरुवातीला विमा कंपन्यांना ५०-५० टक्के हिस्सा विमा हप्ता म्हणून दिला जात होता. त्याबरोबरच शेतकऱ्यांकडून देखील विमा हप्ता भरून घेण्यात येत होता. त्यानंतरच्या काळात या तरतुदीत बदल करून केंद्राने आपल्या हिश्शात वाढ केली.

या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा निधी विमा कंपन्यांना मिळत असताना पीक नुकसानी नंतर भरपाई संदर्भातील मुद्दे निश्चितच चिंतनीय आहेत. विमा भरपाई आणि इतरही सारे निकष आणि अटी सध्या कंपन्या पूरक आहेत. कंपन्यांनी नियम ठरविताना स्वतःचे जास्त हित जपण्यावर भर दिला आहे. त्यामुळे कंपन्यांऐवजी सरकार पातळीवर निकष निश्चित करून या अटी मान्य असलेल्या कंपन्यांनाच पीकविमा क्षेत्रात उतरविण्याची गरज आहे किंवा विमा हप्त्याऐवजी सरसकट शेतकऱ्यांना मदतीचा प्रस्तावही योग्य आहे. शेतकऱ्यांचा छळ कंपन्यांद्वारे होतो. अक्षरशः त्यांना वेठीस धरले जाते.

जिल्हाधिकारी तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना देखील कंपन्या जुमानत नाहीत. त्यामुळे शासनाने पुढाकार घेत केंद्र आणि राज्य सरकारचा विमा हप्ता तसेच शेतकरी विमा हप्ता गृहीत धरत थेट शेतकऱ्यांच्याच खात्यात दरवर्षी ठरावीक रक्कम जमा केली तर शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी यांनी केली आहे.